
ते साम्राज्य आता लयाला गेले !



# माणूस

२८ जून १९६९ : चाळीस पैसे

२८ जून १९६९

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : नववे : अंक : चवथा

संपादक : श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

१०२५ सदाशिव पुणे २ : दूरध्वनी : ५७३५९

किंमत : ४० पैसे  वार्षिक वर्गणी : वीस रुपये  परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

स. नं.


दिनांक ७ जूनच्या अंकातील 'वन्ना पार्टी,' हा लेख वाचला. कम्युनिझमवर अंधश्रद्धा असणाऱ्यांना तो निश्चितच मार्गदर्शनप्रद ठरेल. कोणतेही तत्त्व स्थल, काल व परिस्थितीनुसार बदलुन घेतले व त्याची व्यवहाराशी सांगड घातली तरच अमलात आणता येते. सविस्तर आणि सर्वांगपूर्ण विवेचन हे या लेखाचे वैशिष्टच होय.

**१६, जून** **मेघराज गोठी**, घोटी.

'झुंड' लेखांक पंधरामध्ये श्री. दळवी यांनी भारतीय लष्कराच्या परिस्थितीची दिलेली माहिती फारच मननीय आहे. त्यात राजकीय नेतृत्वाचे दोष वाचल्यानंतर मनास असे वाटते की, एवढी भयंकर परिस्थिती असताना भारतीय लष्करातला एकही अधिकारी, की जो ह्या गोष्टी जाणत आहे त्याने राष्ट्राच्या हिताकरिता पुढे येऊन, स्वतःच्या पदाचा राजीनामा देऊन, भारतीय नेत्यांचे दोष व निर्णय जनतेसमोर ठेवण्याचा प्रयत्न का केला नाही ?

**जून, १७** **डाह्याभाई शहा**, घाटकोपर,

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.



# प्रचंड

नोकरीसाठी माझा मित्र अण्णा फणसे मला घेऊन एक दिवशी सकाळी दादर शिवाजी पार्कवरच्या आपटे हाऊस-वर गेला. वरच्या मजल्यावरच्या एका फ्लॅटच्या एका खोलीत एक मैदानी आवाज जोरजोराने घुमत होता. हा आवाज मी त्यापूर्वी ऐकला होता. आवा-जाचा धनीही त्यापूर्वी व्यासपीठावर पाहिला होता. त्याच्या विषयी पुष्कळ काही ऐकले वाचले होते. अण्णामागून मी आत गेलो तो दबूनच, आणि ‘ बसा ’ या हुकमासरशी कोपऱ्यातल्या एका खुर्चीत बसलो.

आमच्या येण्याने समोरच्या उघडया-बंब पठाणी देहाच्या माणसाचे बोलणे जराही खळले नव्हते. एक उशी मोठया मोठया दंडाना आधार म्हणून गरगरीत पोटाशी घेऊन तो जणू भल्या प्रचंड सभेत मागल्या बाजूला दोन आणखी श्रोते

# विजय तेंडुलकर

येऊन बसावेत तेवढीच आमची नाममात्र दखल घेऊन पुढे बोलत राहिला. समोर आमच्या आधी येऊन बसलेले आणखी दोन श्रोते होते; ते ऐकत होते. विषयावरून विषयावर याचे बोलणे लीलया उडत होते. याला आणि याच्या बोलण्याला सारखाच ऐसपैसपणा होता. जुन्या प्रसिद्ध माणसांच्या आठवणी झाल्या, राजकारण झाले, कुणाची तरी अतिशय खासगी भानगड जाहीर स्वरात तपशीलवार सांगून झाली, साहित्यचर्चा झाली. सगळ्याला सारखाच रसभरितपणा होता. मधूनच नाकावरचा चष्मा वरखाली केला की गप्पांची गाडी नव्या ज़ोमाने पुढे चालू होई. पुन्हा त्या बंदिस्त दालनाच्या भिंती आमच्या कानांच्या पडद्यांबरोबर हादरत आहेत असे वाटे. इतक्या दांडग्या आवाजात इतक्या रसाळ आणि चित्रविचित्र गोष्टी मला कांहीतरी नवीन आणि विलक्षणच वाटत होत्या. अजून ऐकत रहाव्यात असे वाटत होते. चार श्रोत्यांच्या प्रचंड सभेतला हा अगडबंब उघडाबंब वक्ता व्यासपीठावरच्या आचार्य अत्रे नामक वक्त्यासारखेच हावभाव आणि चेहरे करीत होता, नाट्यपूर्ण 'पॉज' घेत होता, नकला करीत होता, मधूनच पंजाने ओठ निपटीत होता, पण या साऱ्याला एक विलक्षण अनौपचारिकपणा आता होता. आमचे याच्याकडे काम आहे आणि त्यासाठी आम्ही आलो आहोत हेही मी विसरलो होतो.

मध्येच वक्त्याने आमच्याकडे वळून प्रथमच आमच्याकडे पाहिल्यासारखे विचारले, काय आहे ?

काही नाही, तुम्ही बोला असेच मी म्हणालो असतो पण अण्णाने घाई करून

तेवढ्यात म्हटले, हे ते तेंडुलकर.

असे. एवढे म्हणून आचार्यांनी मला न्यहाळले.

यांच्याबद्दल आपण बोललो होतो.

हूं. नजरेत अजून तोच शून्य भाव.

तुम्ही म्हणाला होतात पुण्याहून बोलवून घे म्हणून.

नाकावरचा चष्मा बोटांनी जरा वरखाली. शून्य नजर माझ्यावरच.

त्याप्रमाणे आणले आहेत.

चष्म्याआडच्या त्या नजरेत प्रश्नार्थक चिन्ह.

नाही बुवा, आपल्या काही एक लक्षात येत नाही. सरळ सरळ कबुली. कशा-बद्दल आले आहेत हे ?

मला मनाशी लाज वाटली. इतक्या छान रंगलेल्या बैठकीत माझ्यामुळेच केवढे हे विघ्न ! अण्णाने मग खुलासा केला; तो क्षणात योग्य तिथे पोचला. पुढचे काय ते ठरले. अण्णा उठला. मीहि अगदी मनाविरुद्ध उठलो.

बैठक सोडून बाहेर आलो तेव्हा मनात एकच घोळत होते, मराठात नोकरी करण्याच्या निमित्ताने हा जंगी माणूस पुष्कळ पहायला मिळणार.

नोकरीवर दाखल झालो. संयुक्त महाराष्ट्र साकार झाल्यानंतरचा हा काळ. पहिल्या दोन चार दिवसातच माझा पुरता अपेक्षाभंग झाला. कळले की हा फार महाग आहे. हा सदा प्रवासात, लिहिण्यात नाहीतर भाषणात असतो. असला की झुलत झुलत वरच्या त्याच्या कार्यालयवजा खोली मध्ये जातो, पुन्हा केव्हा तरी तसाच निघून जातो. कित्येकदा रात्री उशीरसीर बसून राहतो. याच्याकडे माणसांची वर्दळ अष्टौप्रहर चालू असते. हा एकटा कधी असतच नाही. माणसांना याचे वेड आहे आणि यालाही माणसांचे वेड आहे. प्रत्यक्ष भेटत नाहीत त्या माणसांना भेटण्यासाठीच हा जणू लिहित असावा. असे त्या वेळी माझ्या मनात येऊन गेले.

मधूनच दिवसाकाठी केव्हा तरी खालच्या कचेरीतल्या इंटरकॉमच्या यंत्रातून ती परिचयाची गर्जना एकदम घो घो ऐकू येऊ लागे. बैठकीपेक्षा हा शब्द, सूर पार वेगळाच असे. त्यात थरकाप उडविणारा करडेपणा आणि उग्रपणा असे. ऐकून काही समजण्याआत प्रथम वाटे ते भय; मग इतर सर्व. बैठकीतला तो रसाळ ऐसपैस माणूस आता कुठे भासेनासाच झाला होता. त्याऐवजी दिसे तो त्याच्याच धिप्पाड रूपाचा, चिडचिडा, रागीट 'बॉस'. कधी चिकण्या रंगीबेरंगी बुशशर्ट आणि छाकट्या स्ट्रॉहॅटमध्ये तर कधी पूर्ण सूटबूट टायसह डोक्यावर कलती फेल्ट मारदस्तपणे ठेवून, साहेबी चष्कीत पोट सांभाळीत चालताना.

इंटरकॉमवरून मला बोलावणे येत नव्हते पण कधी येईल याचा नेम वाटत नसे. कल्पनेनेही दबकायला होई. दुसऱ्याला आले तरी आपल्यालाच आले असे वाटे.

आणि एक दिवशी खरेच ते आले. एका इंग्रजी लेखाचे भाषांतर माझ्याकडे

सोपवण्यात आले होते. ते करून 'साहेबां'कडे मी सूचनेबरहुकूम पाठवून दिले. भाषांतर म्हणजे मला तेव्हा हातचा मळ वाटे.

आणि काही वेळाने इंटरकॉम दणाणला, तेंडुलकर आहेत का तेंडुलकर ? वर पाठवा.

पोटातला गोळा आवरीतच मी कसाबसा वर गेलो. खोलीत शिरलो. ही मोठाली होती. कमी प्रकाशाची आणि रहस्यमय वाटणारी होती.

हे तिसरेच रूप. टेबलावर पुढ्यात कसले तरी लिहिलेले कागद आणि हाती पेन. बाजूला नवयुगचीच एक जुनी उघडी फाइल. मुद्रेवर व्यग्रता. प्रथम माझ्याकडे लक्षच गेले नाही. मग गेले.

मला बोलावले होते—मी धाकधुकत.

हूं. या. नाराज मुद्रा, नाराज स्वर. टेबलावर जरा शोधाशोध. हे तुमचे भाषांतर. हे काय हे, हे सगळे चुकले आहे. अगदी चूक. ही काय वाक्ये. हे शब्दप्रयोग काय. हे कुणाला कळणार ?

मला घाम फुटू लागला.

मग एकेक लाल खूण केलेले उदाहरण घेऊन चूक पदरात घालण्याचा कार्यक्रम. भाषांतराचे एक पान या पद्धतीने एकदाचे उलटले गेले. अजून बरीच बाकी होती आणि माझ्या जिवाने ठाव सोडला होता.

बसा. भाषा कशी पाहिजे ? सोपी पाहिजे. ईव्हन अ चाइल्ड शुड फॉलो इट. म्हणजे भाषा. ती कळली पाहिजे. तर उपयोग ! नाहीतर हे– ( मजकुरावर नजर. माझ्या पोटात नवा खड्डा. पण चूक उगाळणे तसेच सोडून ) सोपे लिहीत चला. छोटी छोटी वाक्ये. सुंदर सुंदर साधे शब्द. सुंदर शब्द मराठीत पुष्कळ आहेत. गाथेत आहेत. आपल्या जुन्या बायका बोलतात. बहिणाबाई वाचा. असे शब्द जगात दुसऱ्या भाषेत नाहीत. तसे लिहिता आले पाहिजे. जे कळत नाही ते बोंबलायला कशासाठी लिहायचे ? तेव्हां कळले पाहिजे. हे तुम्हीच पुन्हा पाहून पाठवा. जा.

मनात वाटले, इतक्या लौकर ? आता तर कुठे मजा येत होती. कुणी तरी प्रथमच असे कांहीतरी जिव्हाळ्याने सांगत होते. पुन्हा कसे शाळेत जाऊन बसावे तसे वाटत होते. छान वाटत होते.

सक्तीने उठलो. खाली आलो. मग तुरळक का होईना, संबंध येऊ लागला. माझा 'हिरो' कामानिमित्ताने मला अधिक भेटू लागला. इंटरकॉमवरची गर्जना तेवढी भयप्रद वाटेनाशी झाली.

एकदा ते वर जाण्याआधी बाहेरून सरळ खालीच कचेरीत आले. 'हरामखोर हे संबोधन आपल्याशिवाय कोणीही मराठात वापरायचे नाही असा वटहुकूम त्यांनी काढला. त्या शब्दाचा उपयोग कधी कसा करावयाचा त्याचे शास्त्र आहे आणि ते फक्त आपल्यालाच ठाऊक आहे, बाकी कोणाला नाही असे त्यांनी तळतळून जाहीर केले. कालच्या अंकात अमूकतमूकाला हरामखोर म्हणणारा कोण आहे तो हराम-

खोर ? असे त्यांनी ओरडून विचारले. त्याला दहा पयेये दंड करा असे वर न्यूज एडिटरना सांगून गेले.

मग एकदा काळया दगडावरची रेघबद्दलही त्यांनी उपसंपादकांना असाच दम भरला होता. जो उठतो तो आपण लिहितो म्हणून काळया दगडावरची रेघ लिहितो; हे बेअक्कल काळें दगड ऑफिसात आहेत तरी किती ? त्यांना डिसमिस करा असा नवा आदेश या खेपेस सुटला.

असले आदेश मनावर घेण्यासाठी नसतात असा जुना अलिखित नियम तिथे होता असे मला मग कळले. त्याबद्दल ते देगाराही चुकून देखील पुन्हा कांही विचारीत नसे. दिवसाकाठी असे अनेक जण डिसमिस होत, अनेकांना दंड ठोठावले जात, अनेकांच्या पगारातून दहा ते शंभर रुपयांच्या रकमा कापण्याचे आदेश सुटत आणि तरी यातले काही होत नसे. या माणसाच्या पदरचा माणूस जाई तो बहुधा आपल्याच पावलांनी.

एकदा कचेरीतल्या एका जबाबदारीच्या जागेवरच्या गृहस्थांनी परिस्थितीपोटी कचेरीतच पैशाचे काही प्रकरण केले. ते उघडकीस आले. त्यातच त्या गृहस्थांचे नशीब वाईट म्हणून आणखी एक दोन प्रकरणे त्यांच्याविरुद्ध तेवढ्यातच सप्रमाण सिद्ध झाली. हा सर्व पुरावा अण्यांच्या समोर नेऊन ठेवण्यात आला. या बदमाष माणसाला हाकलून दिला पाहिजे असे तावातावाने सांगण्यात आले. त्या माणसाची तर पाचावर धारण बसली होती. मी कामासाठी खोलीमध्ये गेलो तेव्हा हे प्रकरण नुकते संपले होते. अण्यांनी पुरावा ठेवून घेऊन बाकी सर्वांना बाहेर पाठविले होते. ते थोडे अस्वस्थ होते. विचारात होते. मग माझ्याकडे शून्य नजरेने पाहात म्हणाले, महामूर्ख कुठले. त्या माणसाला दोन बायका आणि त्यांची अनेक पोरे पोसावी लागतात. त्याच्या पगारात हे कसे शक्य आहे ? मी म्हणतो त्याने कमीच पैसे खाल्ले. भिकार ! पैसे खाण्यातसुद्धा महत्त्वाकांक्षा नाही. आणि नंतर त्या माणसाला बोलावून, जा, पुन्हा असे करू नका–महामूर्ख कुठचे ! असे सात्त्विक संतापाने म्हणून त्यांनी सोडून दिले आणि लागलीच ते सर्व विसरून ते दुसऱ्या विषयात शिरले आणि रमले. तुलनेने, कचेरीतील कोणी दारू पितो किंवा बाईबाजी करतो याविषयीचा त्यांचा उद्वेग एकेकदा फार आतला आणि सहजी न शमणारा असे. पैसे खातो यापेक्षा दारू पितो किंवा बाईबाजी करतो या कारणांनी माणसांविषयीचे त्यांचे मूल्यमापन खाली घसरत असे. हे करणारा वाया गेला असे त्यांना कधी कधी मनापासून वाटे आणि त्याच्या काळजीने ते क्षणिक विषण्ण देखील होत.

एकदा मला इंटरकॉमवर बोलावणे आले. मी हातचे काम संपवून वर गेलो. तेव्हां साप्ताहिक नवयुगचे काम र. गो. सरदेसाई पहात. ते वाटेत भेटले आणि म्हणाले, कशाला जाता ? जाऊन काम होणार नाही.आत बाबुराव आले आहेत. मी म्हणालो, बोलावले आहे तर जाऊन आलेले बरे.

मी दार उघडून खोलीत शिरलो तेव्हा ' साहेबां 'च्या टेबलामागची खुर्ची रिकामी होती. बाजूच्या आसनावर बाबुराव पेंढारकर बसलेले होते.

खोलीच्या आतही एक खोली होती. ' साहेब ' तिकडे गेले असावेत म्हणून मी दाराशीच किंचित थांबलो तर टेबलाच्या मागे खाली टेबल आणि खुर्ची यांच्यामध्ये कांही हालचाल मला दिसली.

तो परिचयाचाच अजस्त्र देह त्या चिंचोळ्या जागेत आडवा कुशी विसावला होता आणि पार नाकाच्या शेंड्यावर घरंगळलेल्या चष्म्याच्या भिंगामागून दोन मूढ डोळे दारापासच्या मला धूसरपणे न्याहाळीत होते. एका लुळ्या हाताने खुणा करीत 'साहेब' मला कांही सांगण्याचा प्रयत्न करीत होते. पुढे होऊन, वाकून, प्रयत्न करूनही ते मला कांही केल्या कळू शकेना. माझी कळवून घेण्याची धडपड बाबुराव पेंढारकर बाजूच्या आसनातून काळ्या चष्म्यामधून निर्विकार चेहऱ्याने पहात होते. कामासाठीच कांही वेळामागे इंटरकॉमवर पाचारण आल्यामुळे तसेच परत जाणेही बरे वाटत नव्हते.

माझे हे चालू होते आणि मागे केबिनच्या माझेकडून उघड्या राहिलेल्या दारा-वाटे एकदम मराठा कचेरीतले एक अधिकारी आत घुसलें आणि म्हणाले, या. हेच आचार्य अत्र्यांचे ऑफिस. त्यांच्या मागोमाग सहा की सात आबालवृद्ध स्त्री पुरुष पहातापहाता आत आलेलें मी पाहिलें.

दार उघडे आणि खुर्चीत साहेब न दिसल्याने ते अधिकारी अधिकच पुढे येऊन म्हणाले, इथेच बसून आचार्य अत्रे संयुक्त महाराष्ट्राचा लढा चालवतात.

हे म्हणताना साहाजिकच त्यांचा हात टेबलाच्या दिशेने झाला आणि त्यांनी ' मराठा ' कार्यालय दाखवण्यासाठी आणलेल्या पाहुणे मंडळीचा घोळका माझ्या मागेच टेबलाकडे नीट पाहण्यासाठी अत्यादराने उभा राहिला.

या वेळी बाबुराव पेंढारकर स्वतःला आणि आलेल्यांना उगीच अप्रशस्त वाटू नये म्हणून की काय, अक्षरशः एखाद्या पुतळ्यासारखे निश्चल आणि निर्विकार बसून होते.

पाहुण्यांपैकी वृद्ध गृहस्थांचे लक्ष प्रथम टेबलामागच्या आडव्या चिंचोळ्या जागे-कडे आणि त्या जागेत पसरलेल्या प्रशस्त देहाकडे गेले.


आचार्य अजूनही मला खुणावून काही सांगू पहात होते.

मी पूर्ण स्तंभित होतो.

वृद्ध आश्चर्याने अनावरपणे वाकून पाहत एकदम म्हणाले, हे काय हो ? हे असे काय झाले आचार्यांचे ? ते बघा कसे करताहेत ते !

यासरशी बाबुराव पेंढारकर त्याही परिस्थितीत प्रसंगावधान ठेवून जागचे संथ-पणे उठले. जागच्याजागी जरा डळमळत ते गंभीरपणे म्हणाले, काही नाही, संयुक्त

( पृष्ठ ५८ पाहा



# मुंबई समाचार

सु. ल. सोमण

## समिती आणि संपूर्ण महाराष्ट्र

आचार्य अत्र्यांच्या दु:खद देहावसानानंतर अवघ्या दोनच दिवसांनी संपूर्ण महाराष्ट्र समितीनं सीमा लढयाचं शींग फुंकलं आहे. प्रचंड व यशस्वी 'धडक-मोर्चा' सचिवालयावर नेऊन अजूनही आमची ताकद कायम आहे हेच जणू समितीनं दाखवायचा प्रयत्न केला आहे. आता सत्याग्रहाचं पर्व चालू असून लवकरच महाराष्ट्र पेटवून द्यायचा निर्धार समिती नेत्यांनी व्यक्तविला आहे. 'मुंबई' आणि 'महाराष्ट्र' बंदच्या जाहिरातीही नेहमीप्रमाणे फडकू लागल्या आहेत. समिती आता तशी, तिच्या १९५७ अवस्थेइतकी बळकट नाही. जनसंघ, प्रसोपा बाहेर आहेतच, तर शेकापदेखील समितीबरोबरच्या संबंधात फारसा उत्सुक नाही. थोडक्यात डावे–उजवे कम्युनिस्ट, संसोपा व इतर काही सटर फटर पक्ष ह्यांची आघाडी हेच समितीचं आजचं खरं स्वरूप उरलेलं आहे. त्यातच आचार्य अत्र्यांसारखा भरभक्कम आधार काळानं ओढून नेलेला! शिवाय गेल्या चार-पाच वर्षांपासून तरी किंवा संपूर्ण महाराष्ट्र समितीच्या निर्मितीपासूनच ह्या सर्वच कारणांमुळे समिती लोकांच्या मनातून उतरलेलीच होती. त्यातच शिवसेनेने सीमाप्रश्नांत लक्ष घालून, ९–१० फेब्रुवारीला मुंबई अक्षरश: पेटवली. अर्थातच अशावेळी काहीतरी करून जाऊ लागलेली पत सावरायची धडपड करणं समितीला विशेषत: त्यातल्या लाल नेतृत्वाला आवश्यकच होतं. ह्याच विचारसरणीतून शेवटी हे रणशिंग फुंकणं समितीला भाग पडलं आहे. झालाच त्यातून फायदा तर ठीकच, न पक्षी आंदोलनातून जनमत तरी आपल्याकडे झुकवता येईल असा हा साधा

हिशोब आहे! एरवी शिवसेनेने ह्या प्रश्नांत शिरण्याची वाट बघत थांबायचं समितीला कारणच नव्हतं.

समितीचं राजकारण असं. सीमाप्रश्नापेक्षा, तिच्या अस्तित्वासाठीच असलं तरी तिच्या आंदोलनातून कुठले प्रश्न निर्माण होतील हे सांगणं कठीण आहे. पण एकंदर अनुभव बघितला तर आंदोलनातून परिस्थिती चिघळण्याचीच शक्यता जास्त आहे. पेटलेल्या मुंबईची धग आजही मुंबईकरांना जाणवत आहे. त्याची पुनरावृत्ती होता कामा नये याची खबरदारी शासनाने तशीच समिती नेत्यांनीही घेतली पाहिजे. आणि मुख्य म्हणजे सीमा प्रश्नांचा घोळ लवकरात लवकर संपुष्टांत आणण्यासाठी महाराष्ट्र, म्हैसूर व केंद्र सरकारांनी निकडीचे प्रयत्न केले पाहिजेत. नुसती आश्वासनं, कमिशन्सच्या नेमणूका हे फार्स ताबडतोब बंद केले पाहिजेत. देशातल्या साऱ्याच सीमा प्रश्नांनी, भाषिक प्रश्नांनी देशाचं आधीच फार मोठं नुकसान झालेलं आहे. 'राष्ट्रीय–एकात्मता' वगैरे साऱ्या शाब्दिक थोतांडाच्या जबरदस्त थोबाडीत ह्या सीमा चळवळींनी मारलेली आहे. ह्या साऱ्या राष्ट्रीय हानींच्या मुळाशी खराखुरा गुन्हेगार कुणी असेल तर तो केंद्र व राज्य सरकार. त्यांना गुन्हेगारीत मदत केली आहे विरोधी पक्षियांनी. हे सारे फार्स बंद करून सीमा प्रश्न वेळीच सोडवून देशाच्या सीमांकडे लक्ष केंद्रित केलं पाहिजे.

# सायगांवमध्ये पर्यायी सरकार

गेल्या कित्येक वर्षापासून चालू असलेल्या विएतनाम प्रश्नाला परवा अचानक वळण लागलं. कुठल्याही पूर्व अटीविना, अमेरिकेनं २५,००० सैन्य द. विएतनाम-मधून काढून घ्यायची घोषणा केल्यानंतर, पॅरिस वाटाघाटींच्या दृष्टीने ही उत्साह-जनक बाब आहे, असे कम्युनिस्ट गोटांतील राष्ट्रे सोडून इतर सर्वांनी प्रतिपादले. परंतु अमेरिकेच्या ह्या पावलाचा वाटाघाटींवरील प्रभाव पडताळायला वेळच मिळाला नाहीं. कारण तत्पूर्वीच द. विएतनाममधील की–सरकारविरोधी नॅशनल लिबरेशन फरंटने स्वत:चे भिन्न शासन प्रस्थापित केल्याची घोषणा केली. गेल्या काही दिवसांत नॅशनल लिबरेशन फरंट व दक्षिण विएतनामधील इतर पुरोगामी गट ह्यांचे संमिश्र सरकार, सार्वत्रिक मतांच्या बळावर सायगावमध्ये प्रस्थापित करायचा प्रयत्न चालू होता. ह्या वाटाघाटींना बऱ्याच अंशी यशही प्राप्त होऊ पाहात होते. ह्याचवेळी अमेरिकाही की–सरकारच्या विरोधाला न जुमानता, विएतनाम प्रश्नाच्या जंजाळातून सन्मानपूर्वक बाहेर पडण्याच्या दृष्टीने हालचाल करू लागलेली होती. निदान प्रे. निक्सन ह्यांची वक्तव्यं तरी तेच सूचित करीत

होती. अर्थातच काही सन्मान्य तडजोड होऊन, पॅरिस वाटाघाटीत हा प्रश्न सोडवला जाण्याची शक्यता बऱ्याच जणांना वाटू लागली होती. आणि नेमक्या ह्याचवेळी, नॅशनल लिबरेशन फरंटने पर्यायी सरकार प्रस्थापनेची घोषणा करावी हे खरोखरच आश्चर्यजनक होय.

ह्या पर्यायी सरकारच्या घोषणेनंतरही, अमेरिका व द. विएतनाम सरकारांनी पॅरिस वाटाघाटी चालू ठेवावयाचे धोरण स्वीकारले असले तरी, नॅशनल लिबरेशन फरंटच्या ह्या हालचालीमुळे वाटाघाटींवर परिणाम होणार हे उघड आहे. ह्या नवीन सरकारला, हनोई सरकारचा उघड पाठिंबा आहे, चीन आदि कम्युनिस्ट राष्ट्रांनी देखील ह्या सरकारला 'कायदेशीर' म्हणून मान्यता दिली आहे. ह्या नवीन सरकारच्या स्थापनेची घोषणा करताना खुद्द सायगावच्या काही भागासह, इतर कित्येक महत्त्वाच्या प्रदेशावर ह्या नवीन शासनाचा अंमल सुरू असल्याचे हनोई (उत्तर विएतनाम) रेडिओने घोषित केले आहे. ह्या शासनाने की–सरकारातल्या कित्येक अधिकाऱ्यांना, विएतनामी सैनिकांना आपल्याकडे वळवून घेतलेले आहे; तर इतरांना अनेक सवलती जाहीर केलेल्या आहेत. त्याच प्रमाणे इतर पुरोगामी गटांशी वाटाघाटींसाठी नॅशनल लिबरेशन फरंटचे नेते केव्हाही व कुठेही भेटण्यास तयार आहेत शक्य असल्यास सायगावमध्ये संमिश्र सरकार प्रस्थापित करण्यासही तयार आहेत व असेही हनोई रेडिओने जाहिर केले आहे. हे सर्व खरे मानले तरी, फरंटच्या ह्या घाई घाईने उचललेल्या पावलामुळे की–विरोधकांच्या एकत्रिकरणांतही अडथळे निर्माण होणार आहेत आणि पॅरिस वाटाघाटींवरही त्याचा परिणाम होणार आहे. की–राजवटीप्रमाणेच, 'फरंट'लादेखील, अनेक विएतनामींचा विरोध आहे आणि म्हणूनच, संमिश्र सरकारचे प्रयत्न विएतनाममध्ये चालू होते. ह्या संमिश्र सरकारचाही अमेरिकन वर्चस्वाला विरोध राहणार होता. परंतु त्यात फ्रंटला कदाचित पुरेसे महत्त्व मिळाले नसते. आणि म्हणूनच, अमेरिकन–जागतिक मताच्या दडपणाखाली अमेरिका विएतनाममधून माघार घेऊ लागलेली दिसताच, की–सरकार व इतर विएतनामी पुरोगामी गट ह्यांना हात देण्यासाठी, फरंटनं हे पाऊल उचललेले असावे. कारण निर्विवाद बहुमताचा पाठिंबा मिळून शासनावर येण्याची त्यांना खात्री वाटत नसावी. ■■



# मुक्ताफळे

## जकार्तांची वार्ता

इंडोनेशियाची राजधानी जकार्ताच्या उपनगरात, केलाथोरान या गावात, माळरानावर एकीकडे एक प्रचंड वाडा उभा आहे. या वाड्यात आता माणसांची वर्दळ दिसत नसली तरी एकेकाळी हा प्रासाद गजबजलेला होता. सुंदर ललनांचे पदन्यास होत असताना दागिन्यांची होणारी मंजुळ किणकिण येथे ऐकू येत असे. मदिरा आणि मीनाक्षी यांच्या उपभोगात रंगलेला एक विलासी जीव येथे मोठ्या ऐश्वर्यात राहत होता. आज ही वास्तू जवळजवळ ओसाड आहे.

या आता भयाण वाटणाऱ्या बंगल्याच्या कंपाऊंडवर चढून कुणी आत डोकावून पाहिले, तर तिथल्या इमारती भोवतीच्या उजाड बागेत एक झपाट्याने म्हातारा होणारा इसम हुंदके देत बसलेला दिसतो. कधी शून्यात दृष्टी लावून तो स्वतःशीच बडबडतो. कधी आकांत करू लागला की अंगावरचे कपडे फाडू लागतो. देवडीवरचे दोन पहारेकरी त्याच्याजवळ जाताच तो अधिकच किंचाळतो. मग ते त्याला घरात नेऊन सक्तीने खुर्चीवर बसवून ठेवतात. तो फारच त्रास देऊ लागला तर डॉक्टर येतात, नर्सेस येतात, एखादी नर्स त्याची शुश्रूषा करण्याकरता थांबते. मग तो निपचित पडून राहतो. नर्स त्याला थोपटते आणि तो लहान मुलासारखा ओक्साबोक्शी रडू लागतो.

सकाळ होते. नर्स पहारेकऱ्यांकडून टेबलावर एक पुष्पपात्र ठेवते. विझून गेलेलो भडक रंगाची गावरान फुले पहारेकरी त्यात ठेवतो. आणि त्या निर्माल्य होत गेलेल्या पुष्पांशी हा प्राक्तन हरवलेला मानव बोलू लागतो. "मला हंसता आहांत? खुशाल हंसा. मी सत्तेने आंधळा झालो होतो. स्वतःशिवाय मी कुणाचाही विचार केला

नाही. सत्ता, मान मरातब, विलास, परदेश दौरे यांची माझ्यावर नशा चढली होती. सुंदर स्त्री दिसली की मी तिला जवळ करत होतो. माझी शेवटची बाहुली जपानी होती.तिनेच हा प्रासाद हौसेनं बांधला. आज मला प्रतिष्ठा नाही, सत्ता नाही, म्हणून मला सोडून तीदेखील निघून गेली. रत्ना ऽऽ रत्ना ऽऽऽऽ."

जवळ आलेली नर्स रत्ना नाही हे पाहताच तो खवळतो. ओरडतो. "गेट आऊट ! गेट आऊट."

यांना ओळखता ?

चाचा नेहरूंच्या पंचशीलेतला हा एक संगमरवरी दगड—! इंडोनेशियाचा भाग्य-विधाता सुकर्ण...वाटल्यास सोकार्नो म्हणा. पंडितजींनी याला चाऊ-एन-लायच्या पायावर घातला ! माओने याला जवळ केला. चिनी कम्युनिस्टांनी विश्वासघात करून पाठीत दोन वार करताच नेहरू सावध झाले; कारण मुळचे ते सावध पुरुष होते. दोन लढाया हरले असले तरी त्यांनी युद्ध सुरू तरी केले ! सुकर्णाला मुळची अक्कल कमी. इंडोनेशियांत कम्युनिस्टांनी उठाव केला. संरक्षणमंत्री जनरल नासुशनची तरुण मुलगी हातांत सापडली तिलाच कम्युनिस्टांनी गोळ्या घातल्या. जनरल नासुशन व जनरल सुहार्तो निसटले. त्यांनी सुकार्नोला सल्ला दिला—देश बांधवांशी इमान नसलेल्या कम्युनिस्टांचा काटा वेळीच काढा. इंडोनेशियन लोकांनी समतेसाठी क्रांति केली तर त्याला अर्थ आहे. परंतु माओच्या शस्त्रास्त्रांनी उठाव करणाऱ्या आणि देशांत वर्ग—विद्वेष माजवणाऱ्यांना दया दाखवू नका. सुकार्नोने तिकडे लक्ष दिले नाही. त्याने एक नवी बायको आणली. नवा प्रासाद बांधला आणि चौथा मधुचंद्र सुरू केला.

अखेर इंडोनेशियात यादवी झाली. जनरल सुहार्तोने सुकार्नोला अटकेत टाकले. वास्तविक चौकशी करून सुकार्नोला फासावर चढवणे सुहार्तोला शक्य होते. परंतु सुहार्तोला ठाऊक होते की हा इसम मूळचा फक्त विलासी ! मनाचाही दुष्ट नाही. माओच्या नादाने जकार्तात तिसरी जागतिक शक्ती निर्माण करण्याचा कीलोत्पाटी उद्योग याने केला नसता तर उरलेली हयातही बरी जाती. या बुद्धिभ्रंश झालेल्या लंबकर्णाला असाच अटकेत जिवंत तरी ठेवला पाहिजे. परंतु याला जिवंत ठेवणे म्हणजे रशिया व चीनची हांजीं हांजी नव्हे. इंडोनेशियातील घरभेद्यांची सुहार्तोने कत्तल उडवली. या लोकांना दया दाखवावी यासाठी कोसिजीनने दबाव आणून पाहिला. काही वळले नाही. इंडोनेशियात सुकार्नोला कुणी कम्युनिस्ट समजत नाहीत ! कम्युनिस्टांबद्दल माफक प्रेम ठेऊन समाजवादी म्हणून मिरवणारा तो एक विलासी, भंपक आणि डरपोक माणूस होता.

सुहार्तोपुढचा आजचा प्रश्न निराळा आहे ! सत्तरीजवळ आलेला इंडोनेशियाचा हा विदुषकी नेता आता लवकरच मरणार आहे. डॉक्टर म्हणतात हा फार दिवस काढणार नाही. नजरकैदेतच हा मेला तर त्याच्या अंत्यदर्शनाचा आणि पुरण्याचा

सोहळा किती भव्य प्रमाणावर करायचा ? त्याला शाही इतमाम द्यायचे की नाही ? त्याचा स्टॅम्प काढायचा का नाही ? का त्याला सामान्य नागरीक म्हणून नातेवाईकांच्या ताब्यात देऊन मोकळे व्हायचे ? शाही इतमामाने पुरला तर थडग्यावर काय लिहायचे ? पुतळा केला तर त्याखाली काय लिहायचे ?

सुकार्नोच्या या कठीण दिवसांत निदान आपण त्याला का बरे विसरावे ? कसे झाले तरी नेहरूंच्या पंचशीलेतला तो एक प्रमुख दगड होय. सुकर्णींना भारतात बोलवावे अशी आमची सूचना आहे. त्याच्या अंत्यविधीची टोलेजंग मिरवणूक इथे निघू शकेल. इथले काही पुढारी या देशाचे भवितव्य ठरविण्यासाठी मॉस्कोवाऱ्या करतात. आमचे सरकार त्यांना मुक्तहस्ताने परकीयचलन वगैरे देते. इथे माओच्या नावाने राजकीय पक्षदेखील आहेत. आणि मुख्य म्हणजे सरकारी अनुदानाने निघणाऱ्या प्रेतयात्रांना कामधाम सोडून गर्दी करणे, दोन-तीन दिवस जल्लोष करणे इथल्या लोकांना फार आवडते. पुतळ्याबाबत बोलायचे तर इतके पुतळे आता गल्लोगल्ली झालेले आहेत की सुकार्नोचे चारदोन पुतळे या अवाढव्य देशात सुखाने राहतील. जकार्ताच्या या वार्ता दिल्लीकरांना अस्वस्थ कशा करीत नाहीत ?

# कुस्ती आणि राष्ट्रीय एकात्मता

भारतकेसरी चंदगीराम याला सादीक पंजाबीने खुबीदार पेच घालून जेव्हा पाडला तेव्हा महाराष्ट्राने शांतपणे सादीकचे कौतुक केले. महिनाभरांत हिंदकेसरी मारुती माने यांनी सादीकला चीत केला. कुस्ती आणि निवडणूक म्हटले की कुणीतरी पडायचेच ! या खेळात अगदी निर्मळ आनंद असा नसतो. यामुळे अर्थात फारसे बिघडत नाही. परंतु परवा इंदूरांत जी भयानक कुस्ती झाली ती पाहून आम्हीदेखील चीत झालो आहोत. भारतकेसरी चंदगीराम याने कुणाला तरी कुस्तीत पाडले. लगेच चंदगीरामच्या चाहत्यांनी त्याची मोठी मिरवणूक काढली. ही मिरवणूक 'बॉम्बे बसाद' या वस्तीतून जात असताना मिरवणूकीवर अल्पसंख्याकांनी गोळीबार करून हल्ला चढवला व रक्तपात सुरू झाला.

चंदगीराम याने कुणाला पाडले हे वृत्तपत्रांतील बातम्यांवरून आम्हाला कळेना. बारकाईने शोध घेतां मेहेरदीन नांवाच्या मुसलमान पहिलवानाला चंदगीराम याने पाडले व म्हणून जातीय दंगल उसळली असे दिसते. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री श्यामाचरण शुक्ल यांनी नभोवाणीवर जे भाषण केले त्यांत 'अल्पसंख्याकांना सर्वांनी संरक्षण द्यावे' अशी खास विनंति केलेली होती. आता अल्पसंख्याकांनी जर मिरवणुकीवर गोळीबार केला तर संरक्षण मिरवणुकीतील लोकांना द्यायचे की गोळीबार

करणाऱ्यांना आणि सोडावॉटरच्या बाटल्या फेकणाऱ्यांना ? वार्ताहरांचा घोटाळा उडाला. त्यांनी श्यामाचरण शुक्लांना विचारलें– "तुम्ही नभोवाणीवर जी विनंति केलीत त्यावरून दंगा सुरू का झाला, कुणी केला याची आपल्याला काही माहिती दिसत नाही." यावर श्यामाचरण शुक्ला म्हणाले– "आता नाही मी बोलत !" [ He refused to reply to questions about causes that led to riots — Indian Express. 12-6-69]

श्यामाचरण शुक्लांची अशी पंचाईत वार्ताहरांनी का बरे करावी ? परंतु हा प्रश्न मुळी त्यांच्या कक्षेतला नव्हताच. राष्ट्रीय एकात्मकता निर्माण करण्यासाठी जी मंडळी जमतात त्यांच्यापुढे हा प्रश्न जायला हवा.

या प्रश्नावर खात्रीचा उपाय म्हणजे या देशांत या पुढे हिंदु पहिलवान व मुसलमान पहिलवान यांच्या कुस्तीवर बंदी घालण्यात यावी. हिंदूंच्या पोटजातीत कुस्त्या झाल्या तरी जातीवाद फोफावण्याची शक्यता असल्याने कुस्ती ही विवाहाप्रमाणे जाहिरात देऊन खेळण्यांत यावी. याही जाहीरातीत वय, उंची वगैरे लागेलच.

जयपुरातही परवा असाच प्रकार घडला. एक १३ वर्षाचा अल्पसंख्याकाचा मुलगा अल्पसंख्याकांच्या वस्तीत अपघातात ट्रकखाली सापडला. ट्रक ड्रायव्हर हा बहुसंख्य जातीचा असल्यामुळे वातावरण तंग झाले. ट्रक ड्राइव्हर तूर्त अत्यवस्थ आहे. शहरात ठिकठिकाणी कडेकोट पोलिसबंदोबस्त आहे. अशा प्रकारांनी देशाची एकात्मता धोक्यात येत असेल तर प्रत्येक ट्रक सारख्या वाहनावर दोन ड्रायव्हर नेमण्याची आवश्यकता आहे.

अल्पसंख्यांक वस्ती लागली की लगेच अल्पसंख्याक ड्रायव्हरने ट्रक चालवावा. वस्ती–वस्ती प्रमाणे ड्रायव्हरने चाक धरावे किंवा सोडावे.

अशा तऱ्हेची बारीक सारीक उपाययोजना ताबडतोब करणे आवश्यक आहे. मुंबईचे चौरंगी सामने महात्माजींच्या आग्रहाने बंद झाले. गांधी जन्मशताब्दी वर्षात असे लहानसहान कायदे होणे अतिशय आवश्यक आहे.


पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे २

एकवेळ आपण तालमीचा नाद सोडू, कुस्ती सोडू परंतु राष्ट्रीय एकात्मकता टिकली पाहिजे. घटनेने कुणालाही कुणाशीही कुस्ती करण्याचा अधिकार दिलेला असल्याने, कुस्ती विषयक कायदा करणे मध्यवर्ती सरकारला अशक्य असल्यास, त्यांनी कुस्तीच बेकायदा ठरवावी !

---

# नवे गिर्यारोहण !

---


गेल्या महिन्यात ३० मे १९६९ ला मद्रास येथे तामिळ लेखक संमेलन भरले होते. या संमेलनाचे उद्घाटन करताना हंगामी राष्ट्राध्यक्ष व्ही. व्ही. गिरी म्हणाले " लेखक हे स्वातंत्र्याचे अग्रदूत आणि शांती व समृद्धतेची नवी क्षितिजे दाखवणारे पाईक असतात. तामिळ वाङ्मयांत ही परंपरा आजतागायत निष्ठेने पाळली गेलेली आहे. निरनिराळ्या लेखकांनी तामिळ भाषा समृद्ध केलीच. परंतु इथल्या जनतेच्या जीवनात उदात्तता व मनाच्या श्रीमंतीचा प्रत्यय आणून दिला. आपण जीवनसमृद्धतेसाठी लोकशाहीचा मार्ग पत्करलेला आहे व प्रत्ययकारी लेखकांनी आपला वाटा उचललेला आहे.

आता लेखकाची निर्मितीक्षमता कशी वाटचाल करते यासंबंची टेनेसी वुल्यमस् सांगतो–" सत्याचा व मानवी जीवनातील नव्या अनुभवांचा अखंड ध्यास लेखकाला लिहिण्यास लावतो : "

लोकशाहीच्या वाटचालीत तामिळ लेखकांनी श्री. गिरी म्हणतात तशी खरोखर कामगिरी केलेली आहे का अशी शंका आम्हास येते. केली असल्यास श्री. गिरींनी त्यांचा गौरव करावा काय ? तामिळनाड मधून काँग्रेस नाहीशी झाली व द्र. मु. क. चे राज्य तिथे आले. या लोकशाही बदलात तामिळ लेखकांचा असलेला वाटा श्री. गिरी यांना कौतुकास्पद वाटतो की काय ? शांति व समृद्धीची क्षितिजे काँग्रेस नेस्तनाबूद केल्याशिवाय दिसणार नाहीत असा याचा अर्थ होत नाही काय ?

आचार्य अत्रे यांच्या दुःखद निधनानंतर महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी आचार्यांनी पत्रकार म्हणून थोर कार्य केले आहे असे मोघमपणे प्रत्यक्ष कार्याचा आढावा न घेता म्हटले. परंतु ती आपली मृताचा गौरव करण्याची एक पद्धत झाली ! श्री. गिरी यांनी तामिळ लेखकांना जीवंतपणीच असे 'सर्टिफिकेट' देण्यात काय बरे साधले ? त्यांना राष्ट्रपति करावे का नाही याची चर्चा चालू असताना त्यांनी अनवधानाने तामिळी लेखकांची केलेली स्तुती महागात पडण्याचा संभव आहे. हे गिर्यारोहण त्यांना शिखरापर्यंत नेणारे नाही ! ■■

—ग्यानबा



# कलकत्ता डिनाक

'पटियाँ बांधिये और सिगारेट आदि वुझाइये—थोडेही देरमें हमारा जहाज डमडम हवाई अड्डेपर उतरनेवाला है—धन्यवाद'

हवाई सुंदरीच्या या निवेदनाने मला जाग आली आणि मी सीटबेल्ट बांधू लागलो. पण आमचा सीटबेल्ट आम्ही सोडलेलाच नव्हता, तेरा हजार फूट वर हवेत गेलो तरी ! स्वतःच्या या मध्यमवर्गीय सावधगिरीकडे एक कौतुकास्पद काल्पनिक कटाक्ष टाकून मी विमानातून खाली बघू लागलो.

जमीन जवळजवळ येत होती. जिकडे तिकडे सरोवरेच सरोवरे दिसत होती. सरोवर! पुण्याला असताना ज्या शब्दाने माझा पिच्छा पुरवला होता—शेकडो छोटी-छोटी सरोवरे पाहताना वाटले, यातच कोठेतरी रविंद्र सरोवर असेल किंवा यातले प्रत्येक सरोवर रविंद्र सरोवर बनू शकेल !

चंद्रशेखर

# १ सरोवर

रविंद्र सरोवर प्रकरणाने देशात इतिहास घडविला. आणि इतिहासात ज्याप्रमाणे अनेक वादस्थळे असतात तशी या प्रकरणातही वादस्थळे आहेत. या प्रकरणाची रीतसर चौकशी चालू आहे. चौकशीमध्ये रविंद्र सरोवर स्टेडियमवर सहा एप्रिलच्या रात्री काय घडले याचे तपशीलवार वर्णन उपलब्ध होईलच !

पण जेथे ' शील ' गुंतलेले असते तेथे तपशील अनावश्यक ठरतो. त्यामुळे कलकत्त्याहून लिहित असलेल्या या पहिल्याच लेखात मी सरोवराची स्टोरी मला कशी मिळाली, ती स्टोरी काय आहे व तिचे कलकत्त्याच्या आयुष्याशी काय नाते आहे, हे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.

खरे तर एखादी गोष्ट वाचण्याअगोदर तिचे परिक्षण वाचावे, तसाच माझ्याबाबतीत प्रकार झाला. मी कलकत्त्याला निघण्यापूर्वी चार दिवस आधी सरोवरप्रकरणी योजलेल्या एका बैठकीला हजर होतो. या बैठकीत एकही स्त्री दिसली नव्हती हे सहज जाताजाता नमूद करायला हवे. जे काही विचार यावेळी व्यक्त झाले ते असे–

–ज्योतिला गुंडांनी निवडणुकीत मदत केली. त्यांना पारितोषिक द्यावयासाठी ज्योतीने हे काळेकुट्ट प्रकरण घडवून आणले.

–स्त्रियांची अब्रू हा या राष्ट्राचा मानबिंदू आहे. त्याच्याशी खेळणारांना अभय देणारे सरकार खाली खेचले पाहिजे.

–महाराष्ट्र सरकारवर दडपण आणून त्याला केन्द्रसरकारकडे या विषयावर शोडाऊन करायला भाग पाडले पाहिजे.

–रविंद्र सरोवर कलकत्त्यापुरते मर्यादित नाही. सर्व देशभर अनेक ज्योति आहेत व त्यांच्या हाती स्त्रीची अब्रू सुरक्षित नाही. म्हणून पहिला मुकाबला कम्युनिस्टांशी केला पाहिजे.

–' असे झाले असेल ' तर ज्योति सरकारला जरूर खाली खेचले पाहिजे. पण काय घडले हे अगोदर निश्चित करा. त्यासाठी एक शिष्टमंडळ कलकत्त्याला पाठवा.

–काहीतरी झाले हे निश्चित. त्याचा निषेध करण्याचा एक सुसूत्र व सुस्वरूप (!) कार्यक्रम महाराष्ट्रात सर्व ठिकाणी अंमलात आणावा. त्यासाठी संघटना बांधावी. युवक संघटनांचा उपयोग करून घ्यावा, वगैरे वगैरे !

वरील सर्व प्रतिक्रियांअगोदर ' सकाळ 'मधली रक्तरंजित वार्तापत्रेही मी वाचली

होती. त्यातील काही विशिष्ट उल्लेख वाचून, लोकांनी मारलेल्या मिटक्या पाहून मी सर्द झालो होतो. 'सोनार' या विषयातील स्वारस्य संपल्यावर सकाळने 'नार' या विषयाला हात घालावा हे स्वाभाविक. पण अजून एक विषय बाकी आहे. 'कोनार' हा तो विषय. मी हरेकृष्ण कोनार यांच्याबाबत बोलत आहे. त्यांच्या रूपाने अस्तित्वात येत असलेल्या ग्रामीण क्रांतिवादी प्रेरणांचा सकाळकारांनी जरूर पत्ता काढावा.

अर्थात, त्यासाठी कलकत्त्याला जायचीही गरज नाही. आज उद्या किंवा नजिकच्या काळात त्या आपल्या अवतीभवतीही आढळून येतील.

कोनारांची प्रतिक्रिया मात्र नोंदवून ठेवतो. रबिश ! बंगाली जनता अशा प्रचाराला परस्पर उत्तर देईल. आमचा वेळ मौल्यवान आहे. त्याचा उपयोग आम्हाला अधिक महत्त्वाच्या कामासाठी केला पाहिजे.

कॉम्रेड एस. वाय. कोल्हटकर यांचा ब्लिटझ्मधला या प्रकरणावरचा लेखही मी निघण्यापूर्वी वाचला होता.

कलकत्त्याला जाण्यासाठी आगगाडीने मुंबईला जात असता एका मराठी तरुणाशी ओळख झाली. २० वर्षे वय. अमेरिकेला जाण्याची अँबिशन वगैरे. त्याला विचारले, रविंद्र सरोवर प्रकरण तुला ठाऊक आहे ? आमचा संवाद साधारण असा झाला—

'हो पेपरमध्ये वाचले खरे.'

'मग तुझ्या मित्रात काही चर्चा वगैरे झाली ?'

'तशी विशेष काही नाही. आमचा त्याच्याशी तसा संबंध काय ?'

'भले ! लेका. तरुणींशी तरुणांचा संबंध नाही, तर कुणाचा ?'

'ते ठीक आहे. पण असल्या प्रत्येक राजकीय कटकटीत तरुण कसं लक्ष घालणार ?'

'हे प्रकरण राजकीय आहे काय ? एवढे मोठे रामायण घडले. त्याला अनेक 'मिनी वाल्मिकी' भेटले. आणि तू म्हणतोस जाऊ द्या ?'

'हे पाहा चंद्रशेखर, मला अमेरिकेला जायचेय. तिथे मी सेटल् होणार आहे. मला या तुमच्या भानगडीशी कर्तव्य नाही.'

संपली चर्चा ! इंडियन एअरलाईन्सच्या कोचने त्यांच्या सिटी बुकींग ऑफिसात आलो. माझ्याच विमानाने नागपूरची एक एअर होस्टेस आली होती. तिची कलकत्त्याला नुकतीच बदली झाली होती. तिला राहावयाला जागा हवी होती. तिचा व ड्युटी ऑफिसर दासगुप्ता यांचा संवाद मी ऐकला. पोरगी मराठी होती. आम्ही मायमराठीचे नाव घेऊन तिला सांगितले—

'तुम्ही माझ्याबरोबर महाराष्ट्र निवासात का येत नाही ?'

'थँक्यू अँड सॉरी ! मला एखाद्या लेडीज होस्टेलमध्ये गेल्याशिवाय सेफ वाटणार नाही.'

'ठीक आहे. तूर्त तुम्ही निवासात चला. तेथून फोन वगैरे करून, रूम रिझर्व

करून मग लेडीज होस्टेलमध्ये जा.'

'थँक्यू अगेन. मी येथून सरळ होस्टेलवरच जाईन.'

'बाई, कोठेही जा!' असे मनात म्हणून मी निवासाचा रस्ता धरला.

रविंद्र सरोवरच्या स्टोरीच्या अगोदरची ही स्टोरी मुद्दाम सांगत आहे. पुण्याहून निघाल्यापासून या प्रकरणाची सावली माझा पाठलाग असा करीत होती.

कलकत्त्याला स्थिरस्थावर झाल्यावर एका सकाळी नऊ वाजता टॅक्सी पकडली. टॅक्सीवाला सरदार होता. 'चलो चौरंगी' असे सांगून मी सिगारेट ओढीत स्वस्थ बसलो. वाटेत त्याला विचारले,

'सरदार' यहाँ वो रविंद्र सरोवर स्टेडियम कहाँ है ?'

'यहाँ नजदीक तो है साब। देखेंगे ?' सरदाराने विचारले.

'वैसे हमें कोई खास दिलचस्पी नहीं। अगर रास्तेपर है तो चलो। उसमें क्या देखना है ?' मी म्हणालो.

पुढील संवाद मराठीत देतो. यामुळे संवादाचा लुत्फ कमी होईल. पण असू द्या.

'साहेब, तिथे जे पाहिलं ते पाहण्यासारखं नव्हतं.'

'का हो ? झालं काय ?'

'काय सांगू ! चाळीस वर्षं मी कलकत्त्यात आहे. असं कधी पाहिलं नाही की ऐकलं नाही. बंगालको शर्म आनी चाहिये.'

'झालं काय ?' मी मख्खपणे.

'बायकांची अब्रू लुटली साहेब. दागिने लुटले. ज्योतीच्या राज्यात हे असंच चालायचं. हे कम्युनिस्ट देशाची वाट लावणार. जनाना का बहोत बेइज्जती हुवा साब। हमें शर्म है के मर्द होते हुवे हम चूप है। ज्योतिसे कौन क्या कहेगा ?'

या वेळपर्यंत आम्ही रविंद्र सरोवर स्टेडियमवर येऊन पोहोचलो. सरदार सर्व हकीकत सांगत होता. त्याच्या पिकलेल्या दाढीवरून विषण्णपणे हात फिरवत होता. एकदोनदा तर त्याच्या डोळ्यात पाणीही दिसले !

सरोवर स्टोरी कशी मिळाली हे मिनीट बाय मिनीट सांगण्यासारखे आहे. पण तो मोह आवरून मी केवळ ढोबळ गोष्टी सांगतो. त्या सरदाराने जवळून जाणाऱ्या एका शीख पोराला हटकले. तो पोरगा स्टेडियमच्या मागे कलकत्ता रोव्हिंग क्लब गेटच्या पलिकडे राहतो. अशोककुमार नाईटच्या रात्री तो अगदी स्टेजवळ बसला होता. रात्री बारापर्यंत तो क्लब गेट–भागात होता. त्याच्याशी अर्धा तास बातचीत केली.

त्यानंतर सरदाराने रासविहारी ॲव्हेन्यूवरील एका पंजाबी हॉटेलात मला नेले. तेथे आणखी एका सरदाराशी 'वाहेगुरू' वगैरे रीतसर करून त्याला माहिती देण्यास भाग पाडले. त्या सरदाराला टॅक्सीत घालून आम्ही अर्धातास पुन्हा यूंही टॅक्सी फिरवली. त्याने स्टोरीमागची स्टोरी सांगितली.

ते संपल्यावर आम्ही तिघे आणखी एका सरदाराच्या घरी गेलो. त्याला बाहेर

काढला. मुंडेछाट अंगरखा चढवीत तो टॅक्सीपाशी आला. कीं गले – सतश्री अकाल वगैरे पंजाबी आतषबाजी झाली आणि तो आमच्या टॅक्सीत चढला–

टॅक्सी पुन्हा रविंद्र सरोवर स्टेडियमवर ! तेथे हिरवळीवर बसून एक तास पुन्हा ऑपरेशन व्हेरिफिकेशन. हा तिसरा सरदार आपल्या बायकोला आणि छोट्या मुलाला घेऊन अशोककुमार नाईटला गेला होता.

'सोचा के थोडा साजवाज सुनेंगे, नाच–नचैय्या देखेंगे – की गले ?' इति तिसरा सरदार !

हा सरदार रात्री साडेआठपर्यंत स्टेडियममध्ये होता. गॅलरीत बसला होता. बाहेरून आत दगडविटा येऊ लागल्या तसा तो अस्वस्थ झाला. पण अशोककुमारच्या मोहाने तो तसाच बसून राहिला. अश्रूधूर सोडल्यावर मात्र सरदार तडक उठला आणि आपला कबिला घेऊन साडेआठ वाजता साउथ गेट अॅव्हेन्यूने बाहेर पडला अन् चालत घरी गेला.

सकाळी नऊ वाजता सुरू झालेली माझी 'सरोवर–यात्रा' दुपारी एकला संपली. टॅक्सीवाल्या सरदाराला तीस रुपये देऊन आणि गरमगरम 'शिंगाडे' खायला देऊन त्याचा निरोप घेतला.

अशोककुमार नाईटला हजर असलेल्या किमान दहा स्त्री-पुरुषांशी मी अत्यंत चिकाटीने बोललो.

स्टेडियमपासून फर्लांगभर अंतरावरील 'कृष्णा विहार' या आठ मजली इमारतीच्या आठव्या मजल्यावर राहणाऱ्या एका महाराष्ट्रीय बिजनेस्मनशी मी बोललो. त्याच्या मिसेस्‌शीही बोललो.

सदर सद्‌गृहस्थ रात्री दहापासून दुर्बिणीतून हा सर्व प्रकार पाहत होते. सकाळी साडेचारला ते उठून स्टेडियमवर गेले व नंतर गोव्याला गेले. साडेचार वाजता स्टेडियमवर काय स्थिती होती, ती त्यांनी पाहिली आहे. त्यांच्या मिसेस्‌नी बरीच माहिती दिली. स्टेडियममधल्या शाळेतील एक शिक्षिका दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता नेहमीप्रमाणे स्टेडियमवर आल्या होत्या. त्यांनीही नंतरची परिस्थिती प्रत्यक्ष पाहिली.

रविंद्र सरोवर प्रकरणी मी किमान शंभर लोकांशी बोललो आहे–पोलिस, टॅक्सी ड्रायव्हर, वेटर्स, लेखक, पत्रकार, गृहिणी, सरकारी अधिकारी, मंत्री, मेसेंजर असे असंख्य लोक.

स्टेटस्मन, अमृतबझार यांच्या फाईली चाळलेल्या आहेत. स्टेटस्मनचे चीफ प्रेस फोटोग्राफर एस्. रॉय यांच्या एका साहाय्यकाने घेतलेला फोटो मिळवण्याचा मी फार प्रयत्न केला. पण जमले नाही.

दंगल सुरू झाल्यावर आपली एक मैत्रिण व मित्र यांच्याबरोबर शिताफीने बाहेर पडून टालीटोलापासून हरीष मुकर्जी रोडवर चालत आलेल्या एका कॉलेज विद्यार्थिनीशी मी या विषयावर तासन्‌तास बोललो आहे.

एवढ्या सगळ्या लटपटीनंतर मी रविंद्र सरोवराची हकीकत प्रिय मराठी माणसांस सादर करीत आहे. ही हकीकत शंभर टक्के सत्य आहे, असा माझा दावा नाही. सत्य हे नग्न असते पण; नग्न हे सत्यच असते असे नाही ! येथे तर एका 'नग्न सत्याशी' आपला मुकाबला आहे. तेव्हा ऐका—

रविंद्र सरोवरावरील अशोककुमार नाईटचा कार्यक्रम प्रथम १५–१६ मार्चला ठरला होता. कार्यक्रम दोन दिवसांचा होता. कार्यक्रमाचे संयोजक तुलू मुकर्जी हे होते. 'यांनी आजवर असे दोन ओपन एअर कार्यक्रम घडवून आणले आहेत.

मार्चमधील पहिल्या आठवड्यात कलकत्त्यामधील दोन विख्यात दादांच्या टोळ्यात आपसात काही बेबनाव झाला. तुलूबाबू हे कलकत्त्याच्या अंडर वर्ल्डचे अनभिषिक्त सम्राट ! तेव्हा त्यांनी असा विचार केला की आपली माणसे आपसात झगडत राहिली तर आपले 'कार्य' थंडावेल. तेव्हा या दोन टोळ्यांच्या दादांचा समझोता घडावा यासाठी त्यांनी आपल्या गॅरेजमध्ये एक इमर्जन्सी मिटिंग बोलावली. मिटिंगला तीन टोळ्यांचे दादा हजर होते—दसु, नंदन व प्रतिम हे ते दादा होते.

एरवी या बैठकीत समझोता झाला असता. पण दादा मंडळींचा राजकीय पुढाऱ्यांशी नको तेवढा संबंध आल्याने समझोता करण्याची त्यांची वृत्ती थोडी कमी झालेली दिसते. बैठक उधळली. दसु व नंदन यांच्या लोकांची तुलूबाबूंच्या गॅरेजमध्येच मारामारी झाली. नंदनची दोन बोटे तुटली. संतापाने बेभान झालेल्या नंदनने तुलूबाबूंना आव्हान दिले की, तुमची अशोककुमार नाईट कशी होते ती बघतो. शहाणे असाल तर ती रद्द करा. !

या आव्हानाची बातमी सर्वत्र पसरली. मुंबईला अशोककुमार वगैरे कलावंतांनाही कळली. तुलू बाबूंनी पेपरला जाहिराती देऊन ठेवल्या होत्या. अशोककुमारनी मुंबईहून आनंदी बझार-पत्रिका या वर्तमानपत्राला तार केली—मी कार्यक्रम करण्याचे मान्य केलेले नाही—कृपया तसा खुलासा करा.

आनंदीबझारचे असिस्टंट ॲडव्हर्टाइजमेंट मॅनेजर बी. गुप्तो भाया यांनी आपल्या मुंबई कार्यालयाशी संपर्क साधला—तार अशोककुमार यांनीच केलेली होती.

तुलू बाबू अस्वस्थ झाले. तिकिटे विकलेली, जाहिरात केलेली, नाईलाजाने त्यांनी हा कार्यक्रम पुढे ढकलल्याचे जाहीर केले.

सरोवर प्रकरणाचा पहिला अंक समाप्त झाला. या माहितीवरून हे लक्षात येईल की, ६ एप्रिलच्या कार्यक्रमाला गेलेल्या स्त्री पुरुषांना तेथे गडबड होणार याची पूर्ण कल्पना होती. चौकाचौकात नंदनच्या आव्हानाची चर्चा चालत असे !

आता ६ एप्रिलची संध्याकाळ. कार्यक्रम सात वाजता सुरू व्हावयाचा होता. प्रेक्षक तेथे दुपारपासून येऊन बसले होते. साडेआठ वाजले तरी स्थानिक कलावंतांचे रडगाणे थांबेना. कोणी 'मुंबईवाली' प्रेक्षकांना दर्शन देईना. लाऊडस्पीकर मधून-

मधून बंद पडत होते. बसण्याची सारी व्यवस्था कोलमडली होती. गॅलरीतले लोक स्टेजजवळ व स्टेजवरचे लोक गॅलरीत जाण्याची वेळ आली. स्वयंसेवक सांगत ––जागा मिळेल तेथे बसा ! आणि चूप बसा !

स्टेडियममध्ये चाळीस हजार प्रेक्षक होते. बाहेर पंधरा हजार प्रेक्षक होते. (अखेरीस या बाहेरच्या प्रेक्षकांचे रूपांतर नटमंडळीत झाले व त्यांनी जो प्रयोग सादर केला त्याचे नाव 'ऑपरेशन डिस्मस्ट' ! )


कलकत्त्यात बिघनबाबूंपासूनची परंपरा अशी, की कोठेही कोणताही कार्यक्रम बंदिस्त जागेत असला, तर बाहेरच्या लोकांना ऐकू जाण्यासाठी, बाहेर लाऊड-स्पीकर्सची व्यवस्था करावयाची. येथे तर आतले लाऊडस्पीकर्सही चालेनात, बाहेरचे लोक अस्वस्थ झाले. त्यांनी आत दगड मारण्यास सुरूवात केली. आतल्या लोकांनीही स्टेजवर अनेकवस्तू फेकण्यास सुरूवात केली. आतले लोक स्टेज व बाहेरचा जमाव या दोघांशी दुहेरी लढत देत होते. साहजिकच ते लौकर संघटित झाले.

स्टेजजवळ काही अंतरावर नंदनचे तीनशे 'अपनेवाले' तश्रीफ रखून बसले होते. त्यांना हवा तसा अनुयायी वर्ग तेथे उस्फूर्तपणे तयार झाल्यावर त्यांनी दुहेरी लढ्याचे रुपांतर तिहेरी लढ्यात केले. म्हणजे पोलिसांनाही लढ्यात ओढले. या सुमारास वीज गेली. पण स्टेडियमचे छपरावरचे सर्चलाईट अखेरपर्यंत चालू होते. (हे मुद्दाम नमूद करतो–अंधाराचा फायदा वगैरे बोलणारांसाठी !

ही वीज गेली कोठे ? ती तेथल्या हजारो 'नरांच्या' काळजातून दौडू लागली. खुर्च्यांची मोडतोड, जाळपोळ सुरू झाली. स्टेडियममधले नव्वद टक्के लोक आंधळेपणाने दारांच्या दिशेने जाऊ लागले. दहा टक्के लोकांनी त्यांचा डोळसपणे पाठलाग केला. दागिने पळवणे, अंगचटी जाणे, कपडे फाडणे वगैरे प्रकार सुरू झाले. खुर्च्यांच्या हलकट होळीभोवती होळकरांचा नंगानाच सुरू झाला. ते स्वतःच्याच नंगेपणावर संतुष्ट नव्हते. 'आपणासारखे करिती तात्काळ' या उदात्त हेतूने त्यांनी नंगेपणाची व्याप्ती वाढविण्यास सुरुवात केली. अनेक स्त्रियांची वस्त्रे फाटली, विस्कटली.

स्टेडियममधील प्रेक्षकांची कोंडी झाली. बाहेरचा जमाव तर त्याहून खवळलेला. पोलिसांनी प्रेक्षकांना विनंती केली की त्यांनी धीर धरावा. परिस्थिती आटोक्यात आली की सर्वांस बाहेर जाता येईल. सुमारे दोन तास स्टेडियममध्ये चाळीस हजार व्यक्तिचा जमाव जागच्याजागी हेलावत होता.

तिथे पाऊल हलवण्यासही वाव नव्हता. कोणालाही काही दिसत नव्हते. अश्रु-धुरामुळे सगळ्यांचे डोळे बंद झाले होते. याहि गर्दीत कांही मंडळी सटकली. मला भेटलेली तरुणी व तिची मैत्रीण यांना अक्षरशः एकेका हातात धरून त्यांच्या तरुण मित्राने क्लबगेटाच्या बाजूने टालटोला रस्त्यावर आणले. त्यावेळी या तिघांना ब्रह्मांड आठवले. एक आरपार घुसणारी पाशवी प्रतिक्रिया अशी– "यार एक



**सरोवर प्रकरणी कलकत्त्याच्या वृत्तपत्रातून फक्त अशा जाळपोळींचे फोटोच प्रसिद्ध झाले.**

लडकेको दो दो लडकियाँ मिली– हमें कुछ भी नही ?" या तिघांपैकी दोघे बहीण भाऊ होते !

मी जेवढयांना भेटलो तेवढे सारेजण ' काहीही न पाहता ' सुखरूप घरी पोहचले होते. हे लोक राजकीय नव्हते--ज्योतिबाबूंचे व त्यांचे काही ऋणानुबंध नव्हते. त्यांच्या हकीकतीस ब्रायस्ड म्हणणे कठीण आहे.

मग, नक्की झाले तरी काय काय ? माझ्या माहितीप्रमाणे गोंधळ झाला. मोटारी जाळल्या, खुर्च्या मोडल्या-जाळल्या, पोरींचे कपडे फाडले. त्यांच्या शरीरावर हात फिरवले गेले. कांही जणींना कांही आणखी थोडी पशुता सहन करावी लागली असण्याची शक्यता आहे !

पण एवढेच ! बलात्कार, अत्याचार, एकेका स्त्रीवर पाच-पाच गुंड तुटून पडले, नागड्या उघड्या स्त्रियांनी तळ्यांत जीव दिला, सरदारांनी आपले फेटे काढून विवस्त्र स्त्रियांची लाज राखली वगरे वगैरे हकीगती कपोलकल्पित आहेत. केवळ दाबादाबीपेक्षा आणखी काही करणे त्या परिस्थितीत गुंडांच्या तीर्थरूपांनादेखील शक्य नव्हते.—

ज्या सरदाराने आपली पगडी (फेटा) देऊन जनान्याची इज्जत वाचवली असेल

त्याने आम्हाला भेटावे. त्यास योग्य बक्षीस देण्यात येईल, अशी जाहिरात सतत पाच दिवस शीख लोकांच्या दोन वर्तमानपत्रात येत होती. एकही सरदार पुढे आला नाही.

दुसरी गोष्ट. मी प्रत्येकाला हा प्रश्न विचारला की तुम्हाला स्त्रियांच्या किंकाळ्या, हुंदके, रडणे, वगैरे ऐकू आले काय? 'नाही-नाही' असेच याचे उत्तर मला मिळाले. दुसऱ्या दिवशी सकाळी वर उल्लेखिलेल्या शिक्षिकेला काही कपडे दिसले. त्यात काही बॉडया होत्या; चड्डया नव्हत्या!!– ७ एप्रिलला सकाळी रविंद्र सरोवर शांत होते.

बलात्कार वगैरे झाले नाहीत हे खरे. पण जे झाले तेही वाईटच आहे. नेहमीच्या छेडाछडीपेक्षा सरोवर प्रकरणी काही जास्त झाले हे निर्विवाद. पण यामुळे जे सरकार दोन महिन्यांपूर्वी प्रचंड बहुमत मिळवून लोकशाही मार्गाने अधिकारारुढ झाले आहे त्याला टिकेने भाजून काढण्यात कसलाही पुरुषार्थ नाही. असल्या चेष्टितांनी सध्याचे संयुक्त आघाडीचे सरकार आपण खाली खेचू शकू असे कोणाला वाटत असेल तर तो भ्रम आहे.

रविंद्र सरोवराच्या प्रकरणी राजकीय बाजूपेक्षा सामाजिक बाजू अधिक महत्त्वाची आहे. रविंद्र सरोवरापेक्षा अनेक महत्त्वाच्या घडामोडी प. बंगालमध्ये घडून राहिल्या आहेत. त्यांचा अन्वय लावणे मोठे कठीण काम आहे. पण रविंद्र सरोवरा वर लक्ष केंद्रित केले तर या घडामोडी घडत आहेत हेच कळणार नाही. त्यासाठी दुसऱ्या सरोवराचा ठाव घेतला पाहिजे.

सबंध प. बंगाल हेच सरोवर! स्वतःमध्ये हरवलेले. दूरवरच्या सागराच्या चिंतनात मग्न असलेले. जवळच्या सरितेलाही खुणावणारे. हे सरोवर काव्यात्म आहे. कावेबाज आहे. पण उभ्या आकाशाचे प्रतिबिंब आपणात पडते म्हणून आपण सागर होऊ शकू असे मानण्याइतके खुळेही आहे!!—— (क्रमशः)

# मुदत

**माधव अत्रे**

रुपेरी केसांची ती म्हातारी काठी टेकतटेकत आत आली आणि त्या टेबलासमोर बसली. त्या टेबलावर आता मी बसतो. इथे मी नवीनच आलो आहे. नव्याने खाती उघडणारी चौकशी करतात. काही मालकाच्या ऐटीत वागतात. काही आपण अज्ञानी आहोत, साहेब करतात ते बरोबर या भावनेने वागतात. आम्हाला साऱ्यांशीच गोड बोलावे लागते. बँक ही अखेर व्यापारी संस्था. केवळ पैशाची देवघेव असली तरी त्यात आपुलकीचा स्पर्श हवा असतो. आपण अधिकाधिक सवलती देत आहोत असा आविर्भाव आणावा लागतो. नाहीतर काहीजण इतर बँकांशी तुलना करतात. येवढ्या तेवढ्या कारणावरून आमच्या ठेवी जातीलच असं नाही. तरीपण आपल्याकडून अधिकाधिक तत्परता दाखवावी लागते. स्वतःला त्यात त्रास झाला तरी त्रागा करून चालत नाही. समोर बसलेल्या ह्या रुपेरी केसांच्या म्हातारीचे काम काय असावे हे तसे सांगता येणे अवघड नव्हते. कारण, ती हातात एक पावती घेऊन आली होती. हातात नोटांचे पुडके घेऊन येणाऱ्या व्यक्ती नव्यानेच पैसे ठेवायला आलेल्या असतात. हातात पावती घेऊन येणारांच्या ठेवीची मुदत संपलेली असते. कदाचित त्यांना ती वाढवायची असते. कदाचित तेथेच गुड बाय करून मिळालेल्या व्याजासकट सारी ठेव काढायची असते. काहींनी अडचणींवर मात करून वर्षभर त्या पैशांना हात लावलेला नसतो. काहींना दीर्घकाळ आपले पैसे ठेवण्याच्या मार्गात अडचणी आलेल्या असतात व अगतिकतेने ते मुदतीपूर्वीच पैशांची मागणी करायला आलेले असतात. त्यांना अधिक व्याजाचा लोभ करून चालणार नसते. त्या तयारीनेच ते आलेले असतात.

त्या म्हातारीच्या चेहऱ्यावरून ती चांगली सुखवस्तू वाटत होती. आणि मुद्रेवर एक प्रकारचा ममतेचा भाव होता. तिथे बसताच तिने एक प्रसन्न हास्य केले. मी पण हसलो. हातातल्या पावतीकडे पाहत विचारले,

'यस—व्हॉट कॅन आय डू फॉर यू?'

काहींना घाई असते. ते भरभर आपली कामे उरकण्यासाठी आमच्यावर हुकूम



सोडतात. आम्हाला काही बोलता येत नाही. काही सावकाश–संथपणे काय सांगायचे ते सांगतात. आमचेही ऐकतात. त्या बाईने इकडेतिकडे नजर फिरवली आणि रिसीट, ठेवी वगैरेंबद्दल बोलण्याऐवजी विचारले,

'तुम्ही नवीनच आहात वाटतं?'

'होय. का?'

इथे जे होते ते कुठे गेले! बदली झाली का?'

त्यांनी ज्यावेळी पैसे ठेवले तेव्हा तिथे असलेल्या व्यक्तिची व त्यांची कदाचित चांगली ओळख असेल. मी पण त्या व्यक्तिबद्दल ऐकले होते, पण प्रत्यक्ष पाहिले नव्हते. ती व्यक्ती खूप गोड बोलणारी–कष्ट करूनही सतत हसतमुखाने वावरणारी अशी होती. मी त्या शाखेत बदलून येण्यापूर्वीच काही दिवस आधी तिथला तो तरुण सहकारी तडकाफडकी गेला होता. हृदयविकाराने. आमच्या ब्रँचमध्ये कळले तेव्हा ती व्यक्ती पाहिली नसतानाही आम्ही हळहळलो होतो. तिच्या सहवासात आलेल्या काही सहकाऱ्यांनी तिचे गुण गायिले होते. नंतर नेमका त्याच शाखेत

योगायोगाने मी आलो होतो व त्याच्याच रिकाम्या जागेवर मी बसलो होतो. आता ती गोष्ट जुनी झाली होती. सहकारी मधूनमधून आठवण काढीत. बँकेच्या खातेदारांपैकी ज्यांच्याशी संबंध येई ते पण हळहळले होते. पण बँकेत तशी अनेक माणसे येतात. कुणाच्या बदल्या होतात. कोणी तितकेसे मिसळणारे नसतात. कोणी मिसळणारे असले तरी प्रत्येक खातेदाराशी संबंध येतोच असे नाही.

मी सहज त्या बाईच्या हातातली पावती घेतली. त्या बाईने वर्षापूर्वीच मुदत वाढविली होती. कदाचित वर्षभर ती इकडे फिरकली नसेल. तिला या घटनेचे काय वाटणार कळले तरी? सांगावे का तिला? आणि तो सहकारी गेला तरी बँकेचे काम थोडेच अडून राहिले आहे? दिवसामागून झपाट्याने जाणारे दिवस... पैशाचा अविरत चालणारा ओघ...कित्येकांच्या बदल्या–कित्येकांची सेवानिवृत्ती, नवी भरती–मृत्यू–हें चक्र कशामुळे तरी थांबले आहे का? थांबणार आहे का? थांबावे का? न पाहिलेल्याच पण माझ्या सारखेच काम करणाऱ्या त्या तरुणाच्या आठवणीने मी जरा गहिवरलो आणि मी म्हटले,

'त्यांच्यावद्दल वाईट वातमी सांगावी लागत आहे. आमचा तो सहकारी आता आमच्यात नाही. सहा महिन्यांपूर्वीच तो गेला. त्याच्याच जागेवर मी आहे.'

अशी अनपेक्षित बातमी ऐकली की अनोळखी माणसालाही धक्का बसतो. तिला थोडा वेळ तो बसेल व पुन्हा दुसऱ्या क्षणी 'फार वाईट झालं' असं म्हणत ती आपल्या कामाकडे वळेल, असं वाटले होते. पण चट्कन तिने आपल्या सोनेरी फ्रेमचा चष्मा काढला. तिच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या होत्या. ती सहज उद्गारली,

'What a smart boy he was! Never dreamt it.'

आणि पुढे ती सांगू लागली. एका छोट्याशा प्रसंगाने तिचे त्याच्याशी नाते जडले होते. ती त्याला विसणार नव्हती. तो पण तिला ओळखून तिच्याकडून कॉफी घेणार होता. दोघेही एक प्रकारचा छोटासा आनंदोत्सव साजरा करणार होते. त्यांची तशी पैज लागली होती. ती सांगत होती.

'मी अशी वर्षावर्षाच्या मुदतीने पैसे ठेवते. वर्ष झालं की व्याज नेते. ठेव तशीच एक वर्षाच्या मुदतीने ठेवते. दरवर्षी मी त्याला भेटत असे. मी दिसताच तो म्हणायचा,

'हॅलो ममी! पैसे ठेवणार ना आणखी वर्षासाठी? तुमची रिसीट तयार करतो भरभर'

त्यावर मी म्हणायची 'कर सावकाश. बाकीची कामे होऊ दे. मला म्हातारीला कुठे जायचं आहे घाई गर्दीने? आल्यासरशी वसते जरावेळ इथेच. पण तो सगळी कामे भराभर उरकत असायचा. पुन्हा, कामाने त्रासलेला असा कधीच दिसायचा नाही. सतत हसतमुख.'

आमच्या कामाबद्दल कौतुक करणारे, थोडीफार कृतज्ञता व्यक्त करणारे भेटले की जरा बरे वाटते. मी ऐकत होतो. कामे पुष्कळ होती. आणि तो असणारच. पण आपल्या एका जुन्या सहकाऱ्याबद्दल एवढ्या आपुलकीने आठवणी सांगत असताना तिचा विरस करणेही मला अशक्य होते.

ती म्हणाली, ' मागच्या वर्षी मी निराश झाले होते. का कुणास ठाऊक. माझे मिस्टर पूर्वीच गेले—तेव्हापासून धीर धरला. परिस्थितीशी झगडले. जेनीला लहानाची मोठी केली. मागच्यावर्षी बरोबरची वहीण गेली. आणि मला वाटलं आपणही आता थोड्याच दिवसांचे सोबती. सारी निरवानिरव करायला हवी. अशातच मी रिसीट-वरची तारीख पाहिली. मुदत संपलेली आढळली. मी बँकेत आले आणि नेहमीप्रमाणे तो वर्षाची मुदत वाढवू लागला तेव्हा मी म्हटले.

'नको रे बाबा' माझी काही शाश्वती नाही. काय करावं सुचतच नाही. पैशाचा मला लोभ नाही. पण आपल्या मागे पैसे घेण्यात अडचण पडू नये असे वाटते. माझ्यामागे जेनीला, माझ्या मुलीला येवढ्याशा पैशासाठी कोर्टकचेऱ्या, वकील वगैरे भानगडी करायला नकोत. असं वाटतं—की सगळेच्या सगळे पैसे काढून तिला द्यावेत. म्हणावं काय वाटेल ते कर या पैशांचं. माझा काही भरवसा नाही. उद्या कदाचित मी असेनच असे नाही. काहीतरी मार्ग काढायला हवा. बरं-आपल्यासमोरच तिला सगळे पैसे मिळाले आणि तिचे प्रेम संपले—तिला जबाबदारीची जाणीव झाली नाही आणि आपणही लौकर डोळे मिटले नाही, तर तिच्या हातातील पैसा, बदलती वृत्ती, तिच्या पैशावर डोळा ठेवून प्रेमाचं नाटक करायला टपलेले लोक, यासारखं कल्पना-चित्र डोळ्यापुढे येतं व मन खचून जातं.

मी मनाने खचले होते. या पैशाचं आता काय करावं काढावेत की ठेवावे या संभ्र-




मातच मी बँकेत आले व त्याला मनस्थिती सांगितली. त्याने पावतीवर दोघींची नावे घालण्याचा सल्ला दिला. दोघींपैकी एकीला मृत्यू आल्यास ह्यात असलेल्या दुसऱ्या व्यक्तिला पैसे मिळतील असं सांगितलं. त्याप्रमाणे मी केले. जेनीनेही सही केली. भविष्याबद्दलची सावधगिरी बाळगताबाळगताच आपण भविष्य माहीत असल्याने ही निरवानिरव करीत असल्याची मला जाणीव होत होती.

'मी नसले तर जेनीला पैसे मिळतील ना? त्यात काही त्रास होणार नाही ना?'

मी विचारले. तेव्हा क्षणभर गंभीर होऊन दुसऱ्याच क्षणी तो म्हणाला होता–

निश्चितच. पण एवढी काय निरवानिरव चालली आहे. माझी खात्री आहे. तुम्ही पुढच्या वर्षी स्वतःच अशी काठी टेकतटेकत इथे येणार. खुर्चीत बसणार आणि सांगणार,

'I Survived my boy! Renew it for one year more'

'कशावरनं म्हणता तुम्ही? तुम्हाला भविष्य कळतं का?'

'नाही. पण माझी मनोदेवता सांगते. तुम्ही जगणार. बघा, पुढच्या वर्षी तुम्ही इथे आलात तर तुमच्या खर्चाने इथे कॉफी मागवणार मी. पैज आपली. यू आर गोइंग टू सर्व्हाइव्ह!'

'आयुष्याचा काय भरंवसा आहे रे पोरा? त्यात आम्ही पिकलं पान. तुमची गोष्ट वेगळी.'

'एवढं कशाला? डोंट बी सो पेसिमिस्टिक. ममी–यू वुइल डेफिनेटली लिव्ह लाँग!'

पावती हातात देतादेता तो म्हणाला होता.

आज इथे येताना मला तो आठवत होता. मोठ्यांचे आशीर्वाद लहानांना उपयोगी पडतात. इथे या तरुणाच्या इच्छाशक्तिने मी पुन्हा काठी टेकतटेकत का होईना, इथे येऊन बसणार होते. आणखी एक वर्षाची मुदत माझ्या ठेवीला आणि मला स्वतःला मागणार होते. त्याला कॉफी पाजणार होते. घरी येण्याचे पण आमंत्रण देणार होते. पण भरंवसा खरोखर कशाचाही नसतो. कुणाच्याही जीवाचा नसतो. असं का होतं?......व्हाऽय?......


हाताने क्रॉसची खूण करून म्हातारी उठली. मी पावतीबद्दल विचारले तेव्हा ती म्हणाली.

'आय वुइल सेंड जेनी. आय अॅम नॉट इन ए मूड नाउ.'

जाताजाता पुन्हा एकदा तिने खुर्चीकडे पाहिलं. हवेत क्रॉस केला व काहीतरी पुटपुटत बँकेच्या बाहेर पडली.

■■

# पुस्तके



। । । । ।

## नवे साहित्य

**मराठी नियतकालिकांची सूची**

**ज्ञानदेव वाङ्मय सूची**

**विविधविज्ञान विस्तार लेख सूची**

आज ज्या तीन पुस्तकांचा परिचय करून घ्यायचा आहे ते तीनही सुचीग्रंथ आहेत. केवळ सुचिस्वरूपाचे ग्रंथ तयार करण्याची कल्पना आपल्याकडे नवीनच आलेली आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील अंगोपांगाविषयी जे जे लेखन झाले असेल, त्या सर्वांची भावी अभ्यासकाच्यासाठी विषयवारीने नोंद करून ठेवायची हा उपक्रम पाश्चात्य देशामध्ये फार पूर्वीपासून चालू झालेला आहे, आणि तिकडील विचारवंतांनी विशेषत: ग्रंथपालन क्षेत्रातील मंडळींनी तर या सुचिकरणाचे एक पद्धतशीर शास्त्रच निर्माण केले आहे. आपल्या प्राचीन वाङमयात कोश वाङमयाची निर्मिती फार पूर्वीपासून होत आलेली आहे आणि ज्ञानाच्या निरनिराळ्या शाखेनले समृद्ध असे कोषभांडार आज उपलब्धही आहे. परंतू, सुचिशास्त्राची निर्मिती ही त्यापेक्षा वेगळ्या स्वरूपाची असून इंग्रजीवाङमयाच्या परिचयानंतरच तिचा आपल्याकडील विद्वानांनी स्वीकार केलेला आहे आणि ती आता चांगली स्थिर झालेली आहे असे म्हणावयास हरकत नाही. सुचिकरणामुळे पुढच्या अभ्यासकांचे किती श्रम वाचतात हे लक्षात आल्यापासून वैचारिक स्वरूपाच्या ग्रंथातून सुचीला स्थान मिळणे अत्यावश्यक झालेले आहे.

ग्रंथाच्या अखेरीस शब्दसुची, विषयसुची, स्थलसुची इत्यादींची जोड देण्याचा

**' आकाशवाणी ' पुणे केंद्राच्या " नवे साहित्य " या सदरासाठी दि. २१।२।६९ रोजी डॉ. म. श्री. कानडे यांनी केलेले समीक्षणात्मक भाषण.**

उपक्रम गेली काही वर्षे सतत चालू असला तरी शास्त्रीय पद्धतीने सुचीची रचना करण्याच्या बाबतीत अद्यापही अनेक उणीवा आढळून येतात.

ग्रंथांची किंवा नियतकालिकांची वर्णनात्मक किंवा नुसती यादी तयार करण्याचे प्रयत्न १९ व्या शतकाच्या उत्तरार्धापासूनच सुरू झालेले दिसतात. हे प्रयत्न करणाऱ्या मंडळींपैकी न्या. रानडे, डॉ. केतकर, दंडवते, य. रा. दाते, रा. गो. कानडे यांचे कार्य विशेष उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. तथापि, सुचिकरणाचा शास्त्रीय पद्धतीने विचार करून त्या पद्धतीने सुचिग्रंथ निर्माण करण्याचे श्रेय कै. शं. ग. दाते यांनाच दिले पाहिजे. मराठी ग्रंथसुचीचे दोन खंड प्रसिद्ध करून कै. दाते यांनी सुचिकरणाचे मानदंडच निर्माण करून ठेवले आहेत, याविषयी दुमत नाही. त्यानंतरच्या काळात निरनिराळ्या विषयातील सूचो करण्याचे जे जे प्रयत्न झाले ते कै. दात्यांच्या प्रेरणेने आणि अनुकरणानेच झालेले आहेत असे निश्चितपणे म्हणता येईल.

याच प्रकारात समाविष्ट करता येईल असा पहिला प्रयत्न म्हणजे सौ. पुष्पा भावे यांनी तयार केलेली विविधज्ञान विस्तार या मासिकातील लेखांची सुची हा होय. आपल्या पी. एच. डी. च्या प्रबंधाची पूर्वतयारी म्हणून सौ. भावे यांनी वि. ज्ञा. विस्ताराच्या ६८ वर्षांच्या प्रदीर्घकालखंडातील सर्व लेखांची सुची तयार केलेली आहे. मराठी नियतकालिकांच्या इतिहासात या मासिकाने स्वतःचे असे एक युग निर्माण केलेले आहे. ज्ञानाच्या सर्व शाखांचा सारख्याच आपुलकीने आणि अभ्यासाने परामर्श घेऊन विविधज्ञान-विस्ताराने ज्ञानाची एक पाणपोईच उघडली होती असे म्हणावयास हरकत नाही. अशा विख्यात आणि भारदस्त मासिकातील ज्ञानकण अभ्यासकांना पुन्हा परिचित करून देण्याचे महत्त्वाचे कार्य सौ. भावे यांच्या सुचीने चांगल्या तऱ्हेने केलेले आहे. मराठी व संस्कृत वाङ्मय, कथा, नाटके, व्याकरण, इतिहास असे ३६ वर्ग करून त्यात त्यांनी सर्व लेख अंतर्भूत केलेले आहेत. सुचीची रचना विषयानुसार आणि लेखनप्रकारानुसार अशा दोन्ही पद्धतींनी केलेली आहे. त्या ऐवजी ती केवळ विषयानुसारच केली असती तर, अभ्यासकांची अधिक सोय झाली असती. तशी ती भावे यांच्या सुचीत होत नाही. कारण, कोणत्याही विषयाचा जिज्ञासू आपल्याला पाहिजे असलेली माहिती एकत्र मिळावी या अपेक्षेने सुचीचा उपयोग करीत असतो. उदा.–प्राचीन वाङ्मयाच्या विद्यार्थ्यालाच एखाद्या कवीसंबंधी माहिती हवी असेल तर त्यासाठी त्याला सौ. भावे यांच्या सुचीमधील मराठी वाङ्मय, साहित्यचर्चा, संशोधन, स्फुटे, समीक्षणे, पत्रव्यवहार आणि संपादकीय इतकी सदरे शोधावी लागतील. सर्व लेखांची शेवटी एकत्रित अकार विल्ह्याने उल्लेख–सुची दिली असती तर तिचीही आवश्यकता होती. तथापि या उणीवा असूनही भावे यांची सुची अभ्यासकांना उपयुक्त ठरेल, यात शंका नाही.

डॉ. म. प. पेठे यांनी संकलित केलेली ज्ञानदेव व ज्ञानेश्वरीविषयक सुची हा त्यांच्या पी. एच्. डी. प्रबंधाचाच एक भाग आहे. ज्ञानदेवाचे जीवन, वाङ्मय,

तत्त्वज्ञान आणि कार्य याविषयी आजपर्यंत केवळ मराठीतच नव्हे तर अन्य भाषांतून जे काही लिखाण झालेले आहे, ह्या सर्वांचा या सुचीमध्ये अत्यंत संक्षेपाने आणि तितक्याच शास्त्रीय पद्धतीने समावेश झालेला आहे. ज्ञानदेवविषयक लिहिले गेलेले संपूर्ण ग्रंथ, अन्य ग्रंथातील भाग, लेखमाला, स्फुटमाला, स्फुट लेख, प्रासंगिक पत्रव्यवहार आणि बारीकसारीक टिपणे अशा सर्व तऱ्हेच्या प्रकाशित वाङ्मयाची ही जंत्री डॉ. पेठे यांनी अत्यंत परिश्रमाने सिद्ध केलेली आहे. दोनशे पृष्ठांची ही सुचिबखर चाळून पाहणारालाही ज्ञानदेवाविषयी केवढे ज्ञानभांडार निर्माण झालेले आहे त्याची कल्पना येते.

सुचीतील प्रत्येक संदर्भ देताना लेखकाचे खरे किंवा टोपणनाव, ग्रंथाचे या लेखाचे शीर्षक, संपादक व प्रकाशक, मुद्रणसंस्था व मुद्रणकाल, पृष्ठसंख्या, मूल्य आणि अखेरीस त्या साधनाचे आजचे उपलब्धिस्थळ एवढी विपुल माहिती डॉ. पेठे यांनी पुरविली आहे. केवळ मथळ्यावरून आशयाची संपूर्ण कल्पना येणार नाही म्हणून प्रत्येक नोंदीचा ३–४ ओळींत सारांशही दिलेला आहे. त्या बाबतीत मात्र अधिक काटेकोरपणा ठेवणे आवश्य होते. कारण डॉ. पेठे यांनी उदार धोरण ठेवल्यामुळे चिरकालीन महत्त्वाचा ग्रंथ आणि प्रासंगिक स्वरुपाचे लहानसे टिपण या दोघांनाही सारखीच जागा मिळालेली आहे. हे अनौचित्य टाळणे अवश्य होते. तथापि हा दोष विशेष महत्त्वाचा नाही.

हात लावला तर तुकडा पडेल अशा जुन्यापुराण्या वर्तमानपत्रापासून तो डीलक्स पद्धतीने छापलेल्या ग्रंथराजापर्यंत ज्ञानदेवविषयक सर्व साहित्याची माहिती एकत्र करून डॉ. पेठे यांनी शास्त्रशुद्ध सुचिकरणाचा एक नमुनाच निर्माण केलेला आहे असे म्हणावयास हरकत नाही.

" मराठी नियतकालिकांची सुची " या ग्रंथाने मराठी सुचिवाङ्मयात आणखी एका वेगळ्या सुचिकरणाचा भरभक्कम पाया घातला आहे. कै. दाते यांनी १९५० पर्यंतच्या मराठी पुस्तकांची सुची तयार केली; त्याचवेळी ह्या काळातील नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखांचीही सुची करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले होते आणि सुमारे १५ वर्षे अविश्रांत मेहनत घेऊन त्या सुचीची बव्हंशी पूर्वसिद्धताही केलेली होती. परंतु दाते यांच्या अकाली निधनामुळे ते सुचिकार्य अपूर्णच राहिले. तरीही त्यांनी आपल्या ग्रंथसुचीत जे विचार व्यक्त करून ठेवले होते व त्या कार्याची जी पद्धत आखून दिलेली होती त्याचाच मागोवा घेऊन व त्यामधील न्यून पूर्ण करून श्री. दि. वि. काळे आणि श्री. शं. ना. बर्वे यांनी दाते यांनी संकल्पित केलेल्या नियतकालिकांच्या सुचिचा पहिला खंड अभ्यासकांच्या हाती दिला आहे. या खंडात इ. स. १८३२ पासून १९५० पर्यंतच्या काळात पाक्षिकापासून वार्षिकापर्यंत जी नियतकालिके संपादकांना प्रत्यक्ष पाहावयास मिळाली त्यांची वर्णनात्मक सुची आलेली आहे. पुढील खंडामध्ये या नियतकालिकातील लेखांची विषयवार सुची येणार

असल्यामुळे तो खंड अभ्यासकांच्या दृष्टीने अधिक उपयुक्त होईल हे उघडच आहे. तथापि ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिले तर प्रस्तुतच्या खंडाचेही महत्त्व यत्किंचितही, कमी नाही. या खंडाला संपादकांनी कालिकावर्णन कोष असे नाव दिलेले आहे. कै. दाते यांनी जमवलेल्या माहितीची परिपूर्तता करून आणि अनेक उपयुक्त व माहितीपूर्ण अशी परिशिष्टे जोडून सुचीला पूर्णत्व आणण्याची कामगिरी काळे व बर्वे या संपादकद्वयाने समाधानकारकपणे पार पाडली आहे. विशेषतः मूळ सुचीत नोंद झालेल्या नियकालिकांच्या सुमारे ८०० वर संपादकांची संक्षेपाने दिलेली चरित्रपर माहिती आणि सर्व नियतकालिकांचे, अभ्यासकांच्या सोयीच्या दृष्टीने केलेले कालानुसार, स्थलानुसार, जीवनमानानुसार आणि विषयानुसार असे चतुर्विध वर्गीकरण संपादकांच्या निरलस परिश्रमाची ग्वाही देणारे आहे. सुचीचे हे स्वरूप पाहिल्यानंतर प्रस्तुत सुचीमध्ये केलेली नियतकालिकांची नोंद ही आजपर्यंत कोठेही झालेली आढळत नाही.

१९५० पर्यंतच्या नियतकालिकांची ओळख करून दिल्यानंतर त्या काळातील मराठी नियतकालिकांच्या इतिहासातील काही वैशिष्ट्यांचा संपादकांनी जो परामर्श घेतलेला आहे, तो संपादकांच्या अभ्यासू दृष्टीची साक्ष पटवणारा तर आहेच, पण; मराठी वाचकवर्गाच्या नियतकालिकविषयक अभिरुचीचाही आलेख रेखाटणारा आहे. त्या प्रस्तावनेतील अनेक निष्कर्ष सुजाण वाचकाला अत्यंत मनोरंजक व विचारप्रवर्तक असे वाटल्याशिवाय राहाणार नाहीत. या सुचीत एकूण १३७० नियतकालिकांना स्थान मिळालेले आहे. संख्येच्या दृष्टीने हा आकडा भरपूर वाटला तरी त्यापैकी जवळजवळ निम्मी नियतकालिके ३ वर्षांच्या आतच बंद पडली ही माहिती वाचल्यानंतर संख्येचा फुगवटा हा महत्त्वाचा नसल्याचे कळून येते. ४ पासून १९ पर्यंतचा आयुष्यक्रम लाभलेली सुमारे ३०० नियतकालिके आहेत २० ते २३ वर्षांपर्यंत ४१ मासिकांनी टिकाव धरला. ३३ पेक्षा अधिक परंतु जास्तीतजास्त ७४ वर्षांपर्यंत मजल गाठणारी फक्त १८ नियतकालिके आहेत. मराठी नियतकालिकांचे हे जीवनमान पाहिले म्हणजे त्या क्षेत्रातील सातत्य किती दुर्मिळ आहे याची तीव्रतेने जाणीव होते. वऱ्हाड शालापत्रक या नियतकालिकाने ७४ वर्षांपर्यंत वाटचाल केली तर, ६८ वर्षांची अविस्मरणीय कामगिरी करून विविधज्ञानविस्ताराने मराठी वाचकांचा निरोप घेतला.

प्रकाशनस्थळाचा विचार केला तर महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरच्या १६८ ठिकाणांहून मराठी नियतकालिकांना जन्म मिळालेला आहे. त्या संख्येवरून नियतकालिके काढण्याची मराठी माणसाला केवढी जबरदस्त हौस आहे आणि तो कुठेही असला तरी ती हौस कशी पुरवून घेतो याची ओळख पटते. मुद्रणाच्या सोयीमुळे मुंबई व पुणे या दोन शहरात नियतकालिकांचे केन्द्रीकरण झाल्यासारखे दिसते. एकूण नियतकालिकांच्या ५४ टक्के नियतकालिके या दोन शहरातच निघालेली आहेत.

मराठी नियतकालिकांची एकंदर १३७० ही संख्या पुरेशी वाटली तरी त्यांचे लोकसंख्येशी असलेले दर लाखास २६ हे प्रमाण पाहिले म्हणजे एकूण संख्येचेही दारिद्रच दृष्टीस पडते.

अशा प्रकारचे विविध निष्कर्ष पाहत असताना सुचिच्या संपादकांनी माहितीचा बारकावा आणि रचनेचा पद्धतशीरपणा, यासाठी घेतलेल्या अपार कष्टाची सतत जाणीव होते. किंबहुना असेही म्हणता येईल की प्राचीन वा अर्वाचीन मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रातील कोणत्याही विषयाचा अभ्यास करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला या तीनही सुचिग्रंथांची चाळणी केल्याशिवाय पुढे पाऊल टाकता येणार नाही. हे सुचिग्रंथ निर्माण करणाऱ्या सुचिकारांनी मराठी वाचकाला निरंतर उपकृत ठेवले आहे.

—पुणे आकाशवाणीच्या सौजन्याने.

१. "**मराठी नियतकालिकांची सूची**" (१८०० ते १९५०) प्रथमखंड : कालिक-वर्णनकोश (पृ. ६२८, मूल्य २५ रु.) संपादक – शंकर गणेश दाते, दिनकर विनायक काळे, शंकर नारायण बर्वे.

२. "**ज्ञानदेव वाङ्मय सूची**" (पृ. २५९, मूल्य २० रु.) संकलक– डॉ. मधुसूदन परशुराम पेठे.

३. "**विविधज्ञानविस्तार लेख-सूची**" (पृष्ठ ८४, मूल्य ६ रु.) संकलक–सौ. पुष्पा भावे.

**तिन्ही ग्रंथांचे प्रकाशक** – वासुदेव विष्णु भट, प्रमुख कार्यवाह, मुंबई-मराठी ग्रंथ-संग्रहालय, मुंबई १४.



लेखक — ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

अनुवाद — ॲडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक — सतरा

जनरल सेन आणि जनरल उमराव यांच्यात घडून आलेल्या मतभेदांच्या दुर्दैवी अपघातानंतर दिल्लीत नेहमीप्रमाणे सभांची आणि भेटाभेटींची वावटळ उठली. भारतापुढचे प्रश्न सोडवण्याचा (काल्पनिक ?) रामबाण उपाय काय ? तर मिटींगा ! आणि सभा !

३० सप्टेंबरला व्ही. के. कृष्णमेनन हे न्यूयॉर्कवरून परत आले होते. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू लाओस–नायजरिया, हा दौरा आटोपून दोन ऑक्टोबरला भारतात परत आले. सरते शेवटी भारताच्या संरक्षणाचा प्रश्न योग्य त्या लोकनियुक्त प्रतिनिधींपर्यंत पोचला ! इथून पुढे भारत–चीन युद्धाचे उच्च पातळीवरचे (!) धोरण संरक्षण मंत्र्याचेप्रतिनिधी (Deputy Minister) ठरवणार होते की ज्यांचं मुख्य काम संरक्षणविषयक सामुग्री निर्माण करणं हे होतं. लढाई कशी करायची हे ठरवण्याचे काम त्यांचं नव्हतं. ते काम लष्करी अधिकाऱ्यांचं होतं.

पंडित नेहरूंच्या मते राजकीय–लष्करी परिस्थिती आता कळसास पोचली होती. चिन्यांनी चावटपणा केल्यामुळे विरोधी पक्ष गरम झाले होते. त्यांच्या प्रखर विरोधास तोंड देता देता नेहरूंच्या नाकी नऊ येत होते. विरोधी पक्ष साऽरखे नेहरूंना पराणी टोचत होते की "ये क्या तमाशा है ! चिन्यांना हुसकून द्या !" सहाजिकच चिन्यांना हुसकून द्या ! याचा ' लष्करी ' अर्थ काय आहे याचा विचार न करताच नेहरूंनी निर्णय घेतला की ' चिन्यांना हुसकून द्या !' आतापर्यंत पंडितजींचा चीन–भारत प्रश्नाकडे फक्त टेलीफोन्स, टेलीग्राम्स आणि संरक्षणमंत्री मेनन यांच्याबरोबर लंडनमध्ये झालेली एक प्रासंगिक भेट इतपतच संबंध होता. मेनन आणि त्यांना खाऊ की गिळू असा विचार करणारे विरोधी पक्षाचे लोकनियुक्त प्रतिनिधी यांनी पंडित जवाहरलाल नेहरूंना धोक्याचा लाल कंदील दाखवून इशारा दिला की ' पंडीतजी ! आता स्वस्थ बसून चालणार नाही. जनता खवळली आहे. चिन्यांना आणखी पुढे येऊ देऊ नका. त्यांना हुसकून द्या !' पंडितजींच्या पुढे असं सुंदर गुलाबी चित्र रंगवलं गेलं, की चिन्यांना हुसकून लावणं हा आपल्या डाव्या हातचा मळ आहे. आणि आपण नक्कीच जिंकू (किंवा मरू ! हे तेव्हा कोणीच बोलत नव्हत) लष्करी अधिकाऱ्यांनी ' चिन्यांना हुसकून ' देण्याच्या निर्णयाला सौम्यसा विरोध करून पाहिला पण जनरल थापर यांचं व्यक्तिमत्व कमी पडलं. भावनाविवश पंतप्रधानांवर ते प्रभाव पाडू शकले नाहीत कारण सूत्र हातात होती ती संरक्षण मंत्री मेनन यांच्या. नेहरू आल्याबरोबर एका दिवसात जनरल कौल यांची रजा रद्द करून त्यांना परत बोलावलं गेलं. भारताचं भवितव्य आता जनरल कौलच्या-एकट्याच्या हातात होतं.

जनरल उमराव यांनी नैतिक बळाच्या जोरावर सांगितलेल्या सत्य परिस्थितीमुळे जनरल सेन यांची भांडखोर वृत्ती ओसरत चालली होती. दोन ऑक्टोबरला त्यांनी संरक्षण मंत्र्यांना अशी माहिती पुरवली की ' थागला प्रदेशात चिन्यांची आत्ता एक बटालियन आहे तर आघाडीवर आपल्या तीन बटालियन्सची जमवाजमव केली गेली आहे.' जनरल सेननी पुढे असंही म्हटलं की ' मात्र आपल्या सैन्यांची संपूर्ण जमवाजमव आणि तयारी होईपर्यंत १० ऑक्टोबर उजाडेल.

जनरल सेन यांचं हे आश्वासन नक्कीच जनरल उमराव यांच्या माहितीवर अवलंबून होतं कारण आघाडीवर किती अन्न ' वरून ' खाली टाकलं गेलं याच्या ' आकडेवारी ' हिशोबाखेरीज जनरल सेनना आघाडीची काहीच माहिती नव्हती. ' ताजी खबर ' त्यांना कळत नव्हती.

असं म्हणतात की जनरल सेननी भारत सरकारचं एका गोष्टीकडे लक्ष वेधून घेतलं की ' चांगल्या हेतूने का होईना चिन्यांवर शस्त्र उगारण्याची आपली ही पहिलीच वेळ आहे. (आत्तापर्यंत बिनविरोध ' हिन्दी चिनी भाई भाई 'ची पोकळी निर्माण झाली होतीच) सहाजिकच त्याचे परिणाम कदाचित गंभीर स्वरूपाचे

होतील. या मन खिन्न करून टाकणाऱ्या अंधःकारमय परिस्थितीबाबत मेननसाहेबांची प्रतिक्रीया काय होती हे पहाणं नमुनेदार आणि पुढचं भविष्य सांगणारी ठरेल मेननसाहेबांनी त्यांच्या 'हुकूम' या शब्दात सांगितलं की चिनी नेफा विभागात स्थिरस्थावर करीपर्यंत हिवाळ्यापूर्वीच चिन्यांवर हल्ला करायचा हे सरकारचं धोरण आहे ! जनरल सेन यांनी जनरल उमराव यांच्या माहितीवरूनच आपल्या संरक्षण मंत्र्यांना आणि 'चीफ'ला मार्गदर्शन केलं असलं पाहिजे असं धरून चालायला जागा आहे. तसं नसेल तर मात्र जनरल सेननी चूक केलेली आहे. दूरगामी परिणाम घडवून आणू शकणारा जनरल उमराव यांचा सल्ला त्यांनी मानला नसेल तर तेच दोषी ठरतात. जनरल उमराव यांचा सल्ला जनरल सेननी मानला असेल (तसं होणं कठीणच आहे म्हणा !) तर चिन्यांवर हल्ला करण्याच्या बाबतीत मेननसाहेब बोलत असलेल्या मोघम भाषेला काही अर्थच उरत नाही. कारण नेहरू परदेशात असताना अशा महत्त्वपूर्ण प्रश्नावर D D C (Defence Committee of the Cabinate) तडकाफडकी निर्णय घेणं शक्यच नव्हतं. मेननंनी त्यांच्या अधिकाराचं उल्लंघन केलं असाच अर्थ निघू शकेल. काही का असेना, कुठल्याही परिस्थितीत भारत सरकारच्या या हुकमाचा अधिक स्पष्ट अर्थ लावणं आवश्यक होतं. कारण 'चिन्यांवर हल्ला करा !—त्यांना हुसकून द्या !' हा कागदावरचा हुकूम आणि तो अमलांत आणण्याच्या शक्यतेची लष्करी पात्रता यात फार फरक होता. विशेषतः आघाडीवरचे सर्व कमांडर्स (मी एकटाच नव्हे) हे काम आपल्या ताकदीच्या बाहेरचं आहे, असा वेळोवेळी इशारा देत असता तो हुकूम सोडणं म्हणजे कठीण काम होतं. प्रकार चालू होता तो हा की पुन्हा पुन्हा उजाळा देऊन तोच हुकूम सोडायचा. कुठला ? तर 'चिन्यांना हुसकून द्या !'

जनरल थापर, जनरल सेन आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांची एक बैठक त्याच वेळी झाली असे म्हणतात. नेहरूंच्या त्याच वेळी लक्षात आले की, जनरल सेन आणि जनरल थापर स्पष्ट बोलायला कां कू करताहेत, ते नाराज आहेत. आता ही वेळ आली होती कि जेव्हा 'घाबरट' जनरल्स्च्या कपाळावर 'अमृतांजन' चोळून त्यांना शांत करायचे होते आणि खऱ्या शूर वीर जनरल्सबद्दल शंका उपस्थित करून त्यांना निष्प्रभ करायचे होते. याच बैठकीत पंडितजी त्या दोघांना असं म्हणाले की 'माझा काही विशिष्ट कारणामुळे असा विश्वास आहे की चिनी भारताविरुद्ध कुठलीही गंभीर स्वरूपाची हालचाल करणार नाहीत.' जिनेव्हा येथील भेटीत आपले संरक्षण मंत्री व्ही. के. कृष्णमेनन यांना चीनचे मार्शल चेन-यी यांनी दिलेल्या आश्वासनाचा चीन फायदा उठवीत होता की, पंडितजी अजूनही त्याच सुखद कल्पना विश्वात वावरत होते की, चीनला युद्ध नको आहे ? थागला मधे ५९ मधे जो 'प्रकार' घडला त्यापेक्षा चिनी जास्त काही करणार नाहीत असं तर नेहरूंना वाटत नव्हते ना ? सगळ्या जगात गाजलेल्या शांती-दूतावर

हल्ला करण्याची कुठल्या राष्ट्राची हिंमत आहे, असं तर नेहरू समजत नव्हते ना ? अशा विचारसरणीने कधीही शौर्य निर्माण होत नसतं. याच विचारसरणीने लष्करी अधिकाऱ्यांचे यथायोग्य सल्ले कचऱ्याच्या टोपलीत फेकून दिले. सगळा भरंवसा काय होता तो राजकारणावर. लष्करी ताकदीवर नव्हे. चिन्यांना हुसकून देण्याचं काम कठीण आहे असं म्हणणाऱ्या लष्करी अधिकाऱ्यांना वेळोवेळी चिन्यांच्या चांगुलपणाची (!) उदाहरणं दिली जात होती. हेतू हा होता की त्या पश्चिमी राष्ट्रांचे हस्तक असलेल्या आणि उगाच सैन्यात घबराट माजवणाऱ्या(!) लष्करी अधिकाऱ्यांना असं सांगावं की "उगाच चिंता करू नको रे ! मूर्खा ! चिनी काही करणार नाहीत ! " (Don 't be silly ! the chinese won 't do anything) जेव्हा जेव्हा तज्ञ लष्करी अधिकारी काही स्पष्ट सल्ला देत तेव्हा तेव्हा त्यांना बेशुद्ध पाडणारा हा मंत्र म्हटला जात असे की 'चीनला युद्ध नको आहे ते काही करणार नाहीत.'

आपले निर्णय अमलात आणण्याचा आव आणा. पण कमीत कमी युद्धशास्त्र आणि लष्करी तंत्र यांचे नियम तर पाळाल की नाही ? उद्या पहाटे उठून निसर्गावर सुंदर कविता करायची असा निर्णय घ्या. पण राजा हो ! ह्यासाठी आधी प्रतिभा लागते आणि मुख्य म्हणजे पहाटे उठलं पाहिजे ! हे पाळायला नको ? लष्करी डावपेच म्हणजे काय हे न समजून घेताच राजकारणी लोकांनी आम्हा लष्करी लोकांना हुकूम सोडायचा कि 'जा ! एकदम पुढे जा ! आणि चिन्यांना हुसकून दे ! ' दोन्हीकडच्या लढाईच्या तयारीत इतकी भयानक विषमता असताना चिन्यांच्या सापळ्यात अडकवून घेण्याची काही जरूर नव्हती ... पण सरकार त्यांच्या 'निर्णय घेण्याच्या' हक्कापासून एक इंच मागे हटायला तयार नव्हते आणि घेतला ! भारत सरकारने 'निर्णय' घेतला की आघाडीवर एक कोअर 'निर्माण' करायची, (म्हणजे काहीही करून एका कोअरची अक्षरशः जमवाजमव करायची) आणि तिचे कमांडर कोण ? तर जनरल कौल. चिन्यांना हुसकून देण्याची कामगिरी आता जनरल कौल पार पाडणार होते. कारण भारतसरकारने तसा 'निर्णय' घेतला होता. मग काय विचारता ? सरकारी प्रतिनिधी तुफान प्रचार करू लागले की 'जनरल कौल आता चिन्यांना हुसकणार. चिन्यांना हुसकून देण्याची दिव्य भव्य आणि उदात्त कामगिरी आता जनरल कौल-वर सोपविलेली आहे.' आघाडीवरच्या जनरलला असा मधेच बदलण्यात पंडित-जींचा थोडा तरी हात होताच. जनरल कौल परत बोलावले गेल्यामुळे 'ड्युटी'वर हजर झाले आणि आघाडीवर घडलेल्या प्रसंगांची माहिती गोळा करायला त्यांनी सुरुवात केली. त्यापूर्वी त्यांचं कामकाज पाहणारे (Officiating C. G. S.) मेजर जनरल जोगिंदरसिंग धील्लन यांनी जनरल कौलना थोडक्यात सर्व माहिती पुरवली. मेजर जनरल जोगिंदरसिंग यांनी कौलना नक्की कुठल्या शब्दात काय

सांगितलं ते कळायला मार्ग नाही. आपण फार फार तर असं धरून चालू शकतो की जनरल कौलना त्यांनी आघाडीवर घडलेल्या घटनांची संपूर्ण आणि स्पष्ट माहिती कळवली असावी. चिन्यांना हुसकून देण्याचा भारत सरकारचा हुकूम अमलांत आणण्यात का उशीर झाला आहे याची कारणे सांगून त्यांचं स्पष्टीकरण जनरल कौल यांच्याजवळ मेजर जनरल जोगिंदरसिंग यांनी नक्कीच दिलं असलं पाहिजे. सप्टेंबरपासून भारतसरकार भारतीय लष्करावर दबाव आणीत होतं की 'चिन्यांना हुसकून द्या !'

जनरल उमरावसिंग यांनी बारा सप्टेंबर आणि ३० सप्टेंबरला लिहून पाठवलेली दोन महत्त्वाची पत्रे मेजरजनरल जोगिंदरसिंगांनी जनरल कौलना कदाचित दाखवली असतील किंवा कदाचित नसतीलही दाखवली ! त्यांनी नक्की काय केलं ते मी कसं सांगू ? आपल्याला फक्त इतकच ठाऊक आहे की जनरल कौलनी असं लिहून प्रसिद्ध केलय की 'गेल्या काही आठवड्यात माझ्या अपरोक्ष काय काय घटना घडल्या याची हकीकत मला मेजर जनरल धील्लन यांनी सांगितली.' पाहिलंत कसं वाक्य आहे ते ? या वाक्यात जेवढी माहिती उघड केलेली आहे तेवढीच माहिती दडवलेली आहे ! कारण मेजर जनरल धील्लन यांनी नक्की कुठल्या शब्दात काय सांगितल, काही कागदपत्र दाखवली काय, याचा बोध या वाक्याने होत नाही. एक गोष्ट निर्विवाद आहे की तीन ऑक्टोबरला पंडित जवाहरलाल नेहरू जनरल कौलना बोलावून घेतात आणि त्यांना सांगतात की "आपली जी काही तयारी असेल त्या तयारीनिशी आपण चिन्यांशी सामना दिलाच पाहिजे. आपण असं काही केलं तर जे काय समजायचं ते समजून चिनी सैनिक घोला सोडून देऊन मागे जातील आणि जर का ते मागे हटले नाहीत तरी देखील जास्तीत जास्त शक्ती पणाला लावून आपण आपल्याच भूमीवरून त्यांना हुसकून दिलं पाहिजे किंवा हुसकून लावण्याचा निदान प्रयत्न तरी करायला पाहिजे. (We would have to expel them from our territory or at least try to do so to the best of our ability) आपण जर का हे पाऊल उचललं नाहीं तर सरकार भारतीय जनतेचा विश्वास संपूर्णपणे गमावून बसेल !"

सगळ्या जगाच्या प्रश्नांच्या बाबतीत दूरदृष्टीने विचार करणाऱ्या पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्वतःच्या मायभूमीच्या प्रश्नाबाबत इतका निष्काळजीपणा दाखवून अदूरदृष्टीने विचार करावा हे विलक्षण आहे. तीन ऑक्टोबर उजाडलेला होता. त्या वेळी भारतीय लष्कराच्या तथाकथित तयारीतल्या उणीवांची भरपूर चर्चा झाली होती आणि चिन्यांनी भारतीय प्रदेशावर आक्रमण करून भारत सरकारच्या कर्तव्यच्युतीचा पुरावा जनतेपुढे ठेवला होता. भारत सरकारचा बुरखा आणि नक्षा चिन्यांनी उतरवला होता आणि अशा त्या आणिबाणीच्या वेळी पंडित नेहरूंना देशापेक्षा त्यांच्या सरकारचीच जास्त काळजी होती हे मी तुम्हाला सांगून-

देखील तुमचा त्यावर विश्वास बसणार नाही. भारत सरकार आणि त्या सरकारचे प्रमुख लोकनियुक्त प्रतिनिधी (!) यांच्या भवितव्यापेक्षा भारतीय लष्कराचा संभाव्य दारूण पराभव आणि त्याचे दुर्दैवी परिणाम हे या देशाच्या हिताच्या दृष्टीने फारच अनर्थकारक होते. ज्या कल्पना मनात धरून जनरल कौलच्या मार्गदर्शनाखाली हे लष्करी धाडस करायचं ठरलं, त्या मागे या देशाच्या हिताचा विचारच नव्हता. विचार होता तो फक्त राजकीय दृष्ट्या त्यांचं स्वतःच आणि त्यांच्या पक्षाचं भवितव्य काय, एवढाच.

'The History of Militarism' या पुस्तकाचा लेखक Alfred Vagts म्हणतो "लोकनियुक्त प्रातिनिधिक सरकारच्या महत्वाकांक्षा, राग–लोभ, मनोविकार, आणि घोडचुका यामुळेच अनेकदा लष्करी माणसं युद्धात ओढली जातात! लष्कराच्या मागण्यांकडे केलेलं दुर्लक्ष आणि संभाव्य लष्करी कारवाईच्या निर्णयाच्या मर्यादा याचं त्यांना कवडीच ज्ञान नसत आणि त्यामुळेच अखेर त्या 'सरकार'चा पराभव होतो!" किती अचूक वाक्य आहे हे?–विषेशत: आपल्या भारतसरकारच्या बाबतीत!

अखेर तेच झालं! भारताचा आणि भारत सरकारचा पराभव झाला. आणि तो अटळ अनर्थ ज्या वेळी घडून आला त्या वेळी पंडित नेहरूंना, आपल्या सर्व चुका कबूल करून "या नामुष्कीला जबाबदार मी आहे. पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन मी लोकांचा माझ्या अपराधाबाबत कौल मागतो!" असं सांगण्याच नैतिक धाडस झाले नाही. पंतप्रधानकीचा राजीनामा राहू द्या बाजूला! पंडित नेहरूंनी भारत–चीन युद्धाच्या या यज्ञात त्यांच्या राजकीय आणि लष्करी 'दोस्तांचीच' आहुती दिली. पंडित नेहरुंची तोंड फाटेपर्यंत स्तुती करणाऱ्या जगातल्या (!) त्यांच्या 'दोस्तां'ना देखील हे आवडलं नाही. नेहरूंचे जगातले मित्रच त्यांच्यावर नाराज झाले. नाहीतर तो इजिप्तचा नासर बघा! त्या प्रेसिडेंट नासरचं लोकशाहीवर फारसं प्रेम आहे असं नव्हे; पण जून १९६७ मध्ये इस्त्राएल सारख्या छोटया राष्ट्राने इजिप्तची अब्रूच घेतली. इजिप्त आणि प्रेसिडेंट नासर यांची सगळ्या जगात नाचक्की झाली...पण प्रेसिडेंट नासरने मात्र आपली स्वतःची अब्रू बचावली! 'इजिप्तच्या या दारुण पराभवाला मी जबाबदार आहे! चुका माझ्या हातून घडल्या आहेत, दोष माझा आहे!' असे म्हणून त्याने राजीनामा दिला आणि इजिप्तच्या जनतेने त्याला 'माफ' करून पुन्हा एकदा त्यालाच निवडून दिला.

जनरल उमरावसिंग यांची आकस्मिकरीत्या बदली करून त्यांच्या जागी जनरल कौलना आणणे या निर्णयावरच आता इथुन पुढचा गाडा चालणार होता. आघाडीवरच्या या बदलीबाबत एका रात्रीत ठरलेल्या निर्णयाचं समर्थन करण्यासाठी अनेक उलट सुलट आणि गोलमाल कारणे सांगण्यात येतात. पण त्यात काही दम

नाही. राज्यकारभाराच्या व्यवस्थेच्या तथाकथीत कारणांच्या ढिगाखालीदेखील भारत सरकारला आणि आर्मी चीफना ही घोडचूक गाडून टाकता येणार नाही. ती कारणे पटण्यासारखी नाहीत. भारत सरकारच्या अर्धवट जर–तर च्या भाषेतच सांगायचं तर सर्वात मोठ्ठा 'जर' हा होता की केवळ नेहरूंच्या मताने जर (!) जनरल कौलच्या हातात आघाडीची सूत्र गेली नसती तर चिन्यांबरोबर गोळागोळी होऊन प्रत्यक्षात युद्ध झाले असते काय ? चिन्यांना हुसकून देण्याची ही असाध्य कामगिरी जनरल कौलवर सुखेनैव सोपविण्यात आली आणि त्यांनी ती अगदी आनंदाने स्वीकारली. जनरल कौलनी ज्या वेळी ही कामगिरी स्वीकारली त्या वेळी त्यांना हे ठाऊक होते की त्यांच्या हाताखाली दिली गेलेली कोअर म्हणजे राजकीय निर्दयपणा आहे. आधुनिक लष्करात खऱ्या अर्थाने जिला कोअर म्हणतात त्या अर्थाशी जनरल कौल यांच्या कोअरचा सुतराम संबंध नव्हता. जनरल कौल यांच्या जवळ फक्त दोन ब्रिगेडस् होत्या. एक पायदळ तुकडी क्रमांक ५ आणि दुसरी पायदळ तुकडी क्रमांक ७. जिवावर उदार होऊन भारत सरकारने जुगारी निर्णय घेतला होता. त्यातली महत्वाची कामगिरी आपण का स्वीकारली याचे समर्थन जनरल कौलनी स्वत:च काय शब्दात केलेले आहे ते पाहा. जनरल कौल म्हणतात, " काहीही चमत्कार करून मी तावडतोब लढाई सुरू करावी अशी माझ्याकडून सरकारची अपेक्षा होती. भारताचे भवितव्य धोक्यात असताना लष्करी कारवाईच्या अडचणीच्या बाबतीत मला सरकारशी भांडताही येत नव्हते आणि म्हणूनच झाकली मूठ सव्वालाखाची या विचाराने भारत सरकारने अपुऱ्या साधनानिशी प्राप्त परिस्थितीला कुठल्याही तऱ्हेने शक्यतो तोंड देवून मला माझी कमाल दाखवण्यास भाग पाडले. तथाकथित देशभक्तीच्या घोषणांपेक्षा प्राप्त परिस्थितीत चीनच्या आणि भारताच्या लष्करी तयारीतली तफावत कशी दूर होईल याचीच चिंता त्या वेळी कुठल्याही कमांडरला पडली असती. आघाडीवरचा प्रदेश, तुलनात्मक बळ आणि व्यवस्था हे विषय नुसतेच सरकारशी भांडण करण्याचेच नव्हते तर ते लढाईचा निर्णय करणारे होते. भयंकर अनर्थाची अपेक्षा बाळगण्याचे धाडस करूनच फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करता आले असते. 'जिंकू किंवा मरू !' ही ओळ प्रत्यक्षात 'मरू किंवा जिंकू ! ' अशी होती. जर जनरल कौल यांनी असे अपेशी धाडस करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचे ठरवलं होतं तर मग पराभवाची जबाबदारी संपूर्ण भारतीय लष्करावर टाकण्यात अर्थ नाही. जे करता येण शक्य नाही असं मत इतर लष्करी अधिकारी व्यक्त करीत होते तेच नेमके राजकीय दडपणामुळे जनरल कौल यांनी करण्याचा निष्फळ प्रयत्न केला. जनरल उमराव त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीशी प्रामाणिक राहून सरकारशी भांडायला तयार होते. देशाच्या हिताच्या दृष्टीने त्यांच्यातल्या लष्करी अधिकाऱ्याचा भांडण्यावर जास्त विश्वास होता. अशा या जनरल उमरावांचा का बळी घेण्यात आला ?

जनरल उमराव यांची आघाडीवरून अचानक बदली झाल्याचं एक कारण जनरल कौल असं देतात की "जनरल उमरावांपेक्षा अधिकाराने वरिष्ठ असलेल्या जनरल सेन बरोबर त्यांच वाकडं होतं. जनरल थापर आणि लेफ्टनंट जनरल सेन यांनी जनरल उमरावची बदली करण्याचा निर्णय घेतला. कारण जनरल उमराव आणि लेफ्टनंटजनरल सेन यांच पटत नव्हतं." पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री यांच्या परवानगीशिवाय असा अचानक बदल करता येत नाही. दुर्दैवाने पंतप्रधान आणि संरक्षणमंत्री यांचा या बदलीला कितपत आशीर्वाद होता हे जनरल कौल सांगत नाहीत. मी असं म्हणतो याला कारण आहे. मेनन साहेबांच्या कारकिर्दीत या हक्कांच सरकारचे विशेष हक्क म्हणून डोळयात तेल घालून रक्षण केलं जात असे. जनरल उमराव यांची बदली का करण्यात आली हा कडवट प्रश्न अजूनही कुणी सोडवू शकलेला नाही. जनरल कौल यांच्या हातात आघाडीची सूत्र सोपवण्याचा निर्णय घेण्यापूर्वीच जनरल उमराव यांची बदली करण्यात आली? का जनरल कौलना जागा करून देण्यासाठी जनरल उमरावना हटवण्यात आले? तीस सप्टेंबर ते दोन ऑक्टोबर या कालखंडात नक्की काय घडले तो इतिहास अजूनही अंधारात आहे.

जनरल उमराव हा लष्करी अधिकारी या नात्याने नालायक इसम आहे, या कारणामुळे जनरल सेननी त्यांची बदली केली असती तर जनरल उमरावना ३३ व्या कोअरची सूत्र सोडून देण्याचा हुकूम व्हायला हवा होता. नालायक इसम त्याच अधिकारावर—पण दुसऱ्या ठिकाणी—कसा काय राहू शकतो? ज्याचा नावलौकिक आणि प्रतिष्ठा धुळीला मिळालेली आहे असा कोअर कमांडर त्याच अधिकारावर, त्याच दर्जाने राहू शकत नाही. या बाबतीत असंही सूचीत केलं जातं की, आसाम, नागालँड आणि नेफा या तीन प्रदेशांच्या संरक्षणाचा भार एकट्या जनरल उमराववर——फक्त एका कमांडरवर टाकणं योग्य नव्हतं. आणि म्हणून त्यांची बदली करण्यात आली. जनरल कौल म्हणतात "आतापर्यंत जनरल उमराव यांचा नेफा विभागाशी संरक्षणाच्या दृष्टीने संबंध होता. नेफा विभाग हा प्रदेश फारच विस्तीर्ण होता आणि इतक्या अफाट प्रदेशाचं संरक्षण करण्याच्या प्रश्नाच्या मानाने त्यांच्याजवळ असलेली साधनं अपुरी होती!" मला वाटतं जनरल उमराव यांच्या बदलीच्या बाबतीत इतकं अविश्वसनीय विधान दुसरं कोणतेही नसेल. जनरल कौल त्या वेळी CGS (chief-of-the General staff) होते आणि आघाडीवरच्या संरक्षणासाठी आवश्यक ती साधनं पुरवणं हे त्यांच कर्तव्य होते. साधनांचा तुटवडा हा एका रात्रीत झालेला चमत्कार नव्हता. आपल्याकडे संरक्षणाच्या दृष्टीने साधनांचा तुटवडा आहे हे वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना ठाऊक नव्हतं असं थोडच आहे? जनरल उमराव यांची बदली करून काय अचानक संरक्षणाची साधनं एकदम वाढणार होती? जनरल उमराव गेले आणि जनरल कौल आले. पंत मेले, राव चढले. जनरल कौलनी सूत्र हातात घेतली तेव्हा ते देखील ज्या

परिस्थितीत जनरल उमराव कामकाज करणार होते त्याच परिस्थितीत होते. स्वत: जनरल कौल आणि त्यांचे स्टाफ ऑफिसर्स या व्यतिरिक्त दुसरी कुठलीही नवीन 'साधनं' संरक्षणासाठी पुरवली गेली नव्हती. तीन ऑक्टोबरची रात्र आणि चार ऑक्टोबरची पहाट या एका रात्रीत 'बदल' घडला तो एवढाच. जनरल कौल देखील आता संरक्षणाच्या साधनांसाठी बांडगुळाप्रमाणे दुसऱ्या कुणावरतरी अवलंबून राहणार होते. आसाम आणि नागलँडच्या संरक्षणाची जबाबदारी दुसऱ्या कुठल्यातरी कमांडरवर सोपवून ज्या नेफा विभागाची जनरल उमरावना चांगली माहिती होती त्या नेफाच्या संरक्षणासाठी जनरल उमरावना आहे त्याच जागी कायम ठेवता आलं असतं. जनरल उमराव यांची जबाबदारी कमी करणं—त्यांचा भार कमी करणं—हा त्याला मार्ग होता. जनरल उमराव यांची बदली करणं हा नव्हे! एका धट्टाकट्टया हमालाला ५–६ पोती एकदम उचलता येत नसतील तर त्याच्या टाळक्यावरची पोती कमी करायची का तो हमाल 'बदली' करून आणि वजन तेवढच ठेवून दुसरा हमाल तिथे आणायचा? त्याचा उपयोग काय? पुढचा मागचा विचार न करता एखाद्या माथेफिरू माणसाप्रमाणे 'मी चिन्यांना हुसकून देऊ शकतो!' अशी बढाई जनरल उमरावनी मारली असती तर त्यांची बदली झाली असती काय? मला अजून हे कोडं उलगडलेलं नाही की भारत सरकारने जनरल कौल सारख्या 'धाडसी आणि चपळ' व्यक्तीचीच ३३ व्या कोअरचा कमांडर म्हणून नेमणूक करून यांच्याच ताब्यात आसाम आणि नागालंडच्या संरक्षणाचा प्रश्न का दिला नाही? ३३ व्या कोअरला अतिशय लायक आणि पराक्रमी ब्रिगेडीयर लाभला होता (तो ब्रिगेडीयर जे. पी. दळवी नव्हता!) त्या कोअरच्या तुकडया कुस्ती मारायला समर्थ होत्या. त्या कोअरचा कमांडर म्हणून जनरल कौल यांची नेमणूक का करण्यात आली नाही?

यावरून एकच अटळ अनुमान काढता येत की जनरल उमराव यांच्या बदलीचं 'दिल्लीला' फारसं महत्व वाटत नव्हतं. लोकनियुक्त प्रतिनिधी आणि लष्करी अधिकारी यांच्यातल्या गंभीर स्वरुपाच्या मतभेदाच, गृहच्छिद्र जगजाहीर होऊन या देशाच नीतिधैर्य खचू शकेल यांची चिंता तर भारत सरकारला नव्हतीच नव्हती. जनरल उमराव सांगत होते की, 'इतक्या लवकर चिन्यांना हुसकून देण्याच्या भरीस पडू नका. आधी जय्यत तयारी करा.' आणि भारत सरकारला तर थांबायला वेळ नव्हता.! का? कारण जनता खवळली आहे! चिन्यांना लवकर हुसकून द्या! नाहीतर आमचं सरकार ठिकाणावर राहणार नाही!' भावना-प्रधान भारतीय जनतेने भारत सरकारचा गळा पकडला होता. जनता सरकारला दमात घेऊन विचारीत होती. की 'आपल्या पवित्र भूमीवरून चिनी राक्षसांना हुसकता की घेऊ तुमच्या 'खुर्च्या' काढून? खरं बोला!'...आणि खरं तर बोलता येत नव्हतं. मग? आघाडीवरचा जो जनरल हे 'खुर्च्या वाचवण्याचं'

काम लवकरात लवकर करायला नकार देईल त्याची बदली करून त्याच्या जागी पोलीटिकल जनरल आणायचा! भारतीय हद्दीत घुसलेल्या अहिंसक चिन्यांना हुसकून देण्यासाठी जनरल कौल यांची पंडित जवाहरलाल नेहरूंनी केलेली नेमणूक याच खरं कारण आणि स्पष्टीकरण हे असं होतं. जनरल कौल म्हणजे काय कुणी सामान्य जनरल नव्हता की दुसऱ्या कुठल्या प्रदेशाच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवावी. ते आघाडीवरच पाहिजेत.

थागला प्रदेशात ताबडतोब चिन्यांशी टक्कर द्या, या मताकडे झुकणारे जनरल उमराव नव्हते म्हणूनच त्यांची 'पॅसेंजर' साइड ट्रॅक करून जनरल कौलची 'डेक्कन क्वीन' भारत सरकारने पुढे काढली. या बद्दल माझी आता खात्रीच पटली आहे. भारत सरकारने जनरल उमराव यांना दिलेली वागणूक सरकारला शोभली नाही. राजकीय खेळ खेळणारा 'कुणीतरी' जनरल भारत सरकारला हवा होता आणि जनरल कौल तर 'जवळच' होते. भारत सरकारची वकिली करण्यात 'आघाडी' वर असलेले जनरल कौल भारत सरकारला एकदम पसंत होते. ज्या फॉरवर्ड पॉलिसीला इतर तज्ज्ञ लष्करी अधिकाऱ्याचा विरोध होता ती फॉरवर्ड पॉलिसी जनरल कौलना मान्य होती. फक्त फरक इतकाच की या सरकारी डावपेचाचे समर्थन जनरल कौल फॉरवर्ड पॉलीसीलाच पोझिशनल वॉरफेअर असे म्हणून करणार होते.

ज्या वेळी सगळ्या जगाला हे कळलं की जनरल कौल यांच्या हाताखाली खऱ्या अर्थाने 'कोअर' अशी नव्हतीच, त्या वेळी सगळ्या जगात आपली नाचक्की झाली. चिन्यांना हुसकून देण्याच्या कामगिरीसाठी आपण खास फौजफाटा निर्माण केला आहे हे जाहीर करण्याची काय जरूर होती? काही काही गोष्टी गुपचूप करायच्या असतात तरच त्या यशस्वी होतात. चिन्यांनी आपल्या ह्या जाहीर खबरीच्या संधीचा फायदा उठवला. कारण अत्यानंदाने भारत सरकारने वर्तमानपत्रात अशी बातमी दिली होती की 'चिन बरोबर होणारा सामना आता जवळ येऊन ठेपला आहे!' जणू काही सर्व जगाला भारत सरकारला हे कळवायचं होतं की चीन बरोबर लढण्याची तयारी आम्ही वर्षानुवर्ष करीत होतो. जपानमध्ये अशी एक लष्करी म्हण आहे की 'युद्ध ही नेहमी गुपचूप आणि निनावी करायची असतात!' बोलेल तो करील काय, असं म्हटलंय ते काय उगाच? चिन्यांना आमच्या जमिनीवरून (नशीब! 'आमच्या जमिनीवरून' एवढं तरी म्हटलं होतं!) आम्ही हुसकून देऊ, असं भारताने जाहीर केलं मात्र, चिन्यांनी त्या संधीचा गैरफायदा उठवला. कारण जगातल्या आपल्या सर्व दोस्तांचा आपल्या 'त्या' आंतरराष्ट्रीय शांतते (!) वर असलेल्या विश्वासावरचा विश्वास उडाला. आम्ही चिन्यांना हुसकून देऊ, असं आपण जाहीर केल्याबरोबर चिन्यांनी धोकेबाजी करून आपल्यालाच हुसकून दिले. आपल्या नागड्या उघड्या कारभाराची जबरदस्त किंमत

आपल्याला द्यावी लागली. तरी बरे, की चिन्यांना हुसकून देण्याच्या कामगिरीची सूत्र एका सरकारमान्य (!) असामान्य जनरलच्याच ह्यातात होती. या पराभवाला जबाबदार असलेल्या राजकीय आणि लष्करी अधिकाऱ्यांनी भारतालाच जबरदस्त दुखापत करून भारताची कधीही भरून न येणारी नुकसानी केली. इतिहास त्यांना दया दाखवणार नाही.

चीन–भारत युद्धाच्या भीषण नाटयाच्या रंगभूमीवरून जनरल उमराव यांची कामगिरी संपून ते 'प्रेक्षकां'पासून आता दूर झाले होते. तरीदेखील हा लष्करी नट किती थोर होता ते मला सांगितलेच पाहिजे. कारण, त्यांच्या कामाकडे आत्तापर्यंत द्यायला पाहिजे होते तितके लक्ष दिले गेलेले नाही. उलट त्यांना अनुल्लेखाने 'मारण्यात' आलेले आहे. या शोकपर्यायी नाटकाच्या आरंभापासूनच त्यांच्या शहाणपणाच्या लष्करी सल्ल्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. यांच्या योग्य उपदेशाकडे कोणी लक्षच दिले नाही.

कसे आहेत जनरल उमराव ? जनरल उमराव हा एक उदात्त व्यक्तीमत्त्वाचा 'उंच नींच' देखणा जनरल आहे आणि होता. ज्या राजस्थान बद्दल अनेक दंतकथा उपलब्ध आहेत त्या राजस्थान मधल्या जयपूर मधील एका खानदान राजपूत कुटुंबात त्यांचा जन्म झालेला आहे. पिढचान पिढचा त्यांच्या घराण्यात. वीर पुरुष निर्माण झालेले आहेत. त्यांचा वारसा सांगणारे एक जनरल उमराव चीन–भारत युद्धात त्यांची आणि माझी प्रथमच गांठ पडली. ते अतिशय शांत आणि संयमी आहेत. त्यांची उपस्थितीच आत्मविश्वास वाढवण्यास कारणीभूत ठरत असे. हा माणूस छक्के पंजे खेळणारा नव्हता. आंत एक बाहेर एक असला कारभारच नाही. ते सरळ सरळ सांगायचे की, जनरल सेनचं आणि माझं जमणार नाही. अस्सल बदमाश माणसे आपल्या शत्रूबद्दल देखील मुद्दामच गोड बोलून त्याची स्तुती करतात. पण अंत:करणापासून सरळ असणारी माणसे आपला शत्रू जाहीर करतात कारण मनात काही पाप नसते. जनरल सेन यांच्या बरोबरच्या या जाहीर वैमनस्यामुळे जनरल उमराव यांना असह्य मनःस्ताप सोसावा लागला. भारतीय लष्कराच्या माथ्यावर लबाडीने मारली गेलेली असाध्य कामगिरी पार पाडण्याचा प्रयत्न करीत असताना मधल्या मधे त्यांचे दिवस भरले. त्यांच्यावर अन्यायाने नाही नाही ते आरोप केले गेले. ते चिन्यांना घाईघाईने हुसकून देऊ शकले नाहीत. शक्यच नव्हतं ते ! म्हणून गोष्टी या थराला गेल्या की 'जनरल उमराव सुस्त, चेंगट आहे !' तरी देखील जनरल उमरावनी त्यांचा संयम न सोडता परिस्थितीचं लष्करी पृथ:करण चालू ठेवलं. आपला दोष नसताना लोक आपल्याबद्दल वाट्टेल ते बोलतात हे कळल्याबरोबर हात पाय गाळतो तो माणूस कसला ? त्यांनी आपली लष्करी भूमिका विसरून राजकीय स्वरूप स्वीकारण्यास निग्रहाने साफ नकार दिला. आणि लोकनियुक्त प्रतिनिधींना शांत करण्यासाठी ते कधी राजकीय दबावाखाली गाडले गेले

नाहीत. त्यांची मते ते निर्भयपणे आणि परिणामकारकरीत्या मांडीत राहिले. वेळप्रसंगी आपली स्पष्ट मते लेखी देण्याचे नैतिक धाडस दाखवणारा या भीषण नाटकातला जनरल उमराव हा एकमेव 'नट' होता. 'न ब्रूयात सत्यम अप्रियम' हे त्यांना कळलं नाही. खरच खरं बोलल्यामुळे त्यांनी स्वतःचा आत्मनाश करून घेतलाच पण भारताचा आत्मनाश करणाऱ्या 'पॉलीसी' (!) ची प्रगती होऊ देण्यात त्यांनी एका वेगळ्या अर्थाने मदत दिली. 'मी नको तर नको ! मग आता तू येऊन काय ते करून दाखव !' असे लायक माणसाने दुसऱ्या माणसाला कधी म्हणू नये. त्यात सगळाच सत्यनाश होतो. ज्या वीरांच्या जातकुळीत ते जन्माला आले होते त्या जातकुळीला शोभेल अशा तऱ्हेने ते वागत होते. त्यांच्या हाताखालच्या जवानांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. त्यांचे एक वाक्य मी जन्मात विसरणे शक्य नाही. चीन–भारत संघर्ष घडलाच तर प्राप्तपरिस्थितीत आपण जिंकणे शक्य नाही, ही पार्श्वभूमी मनात धरून आघाडीवरच्या परिस्थितीच्या अहवालाबाबत चर्चा करीत असताना ते म्हणाले "अहवाल लिहिणाऱ्या पोरांनो ! तुमचे एक ठीक आहे, तुम्ही खरं काय ते लिहिलत या बद्दल तुमचं कौतुकच होणार आहे. अरे पण, आपले जवान फुकट मरतील त्यांचं काय ? अजून शहाणे व्हा ! सहा महिने गेले तरी हरकत नाही ! पण असा अहवाल द्या की ज्या वेळी यशाची आपल्याला निदान थोडी तरी आशा असेल !" नकळत जनरल उमराव यांच्या मुखातून फिल्ड मार्शल अचिन्लेक याच्या शब्दांचा प्रतिध्वनी उमटला. कारण फिल्ड मार्शल अचिन्लेक यांनी असं म्हटलं आहे की "जे सैनिक हल्ला करण्यासाठी जाणार आहेत त्यांना यशाची थोडी तरी खात्री आहे का ?...नसेल तर तुम्ही त्यांचा खून करता आहात !"

आघाडीवरच्या ज्या बिकट परिस्थितीत आम्ही सापडलो होतो त्या परिस्थितीत 'चिन्यांना हुसकून द्या !' या असमंजस आणि अयोग्य हुकमामुळे निर्माण झालेल्या भीषण परिस्थितीबाबत त्यांना सहानुभूतीने विचार करता येण्याची पात्रता होती. आघाडीवरच्या सच्च्या कमांडरला शोभेल अशा तऱ्हेने ते आमच्या विचाराचं समर्थन करून आम्हांला वाचवीत होते आणि त्यामागे नैतिक पाठबळ होतं. सप्टेंबर १९६२ च्या कडवट स्मृती ठेवून जाणाऱ्या दिवसांत ज्यांनी आपलं डोकं शांत ठेवून तोल संभाळला असा मला दिसलेला जनरल उमराव हा एकमेव वरिष्ठ लष्करी अधिकारी होता.

भारत सरकारने जनरल उमराव यांचा सबूरीचा सल्ला मानला असता तर भारतीय जनतेची मानखंडना बरीचशी टळली असती. लष्करी इतिहासात त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्या मोकळ्या मनाच्या उमद्या सोल्जरना जी किंमत द्यावी लागली त्यापेक्षा कितीतरी जास्त पटीने जनरल उमराव यांना किंमत मोजावी लागली. लष्करी क्षेत्रातली जास्तीत जास्त दहशत बसवणारी कडक सजा त्यांना भोगावी लागली......काहीही कारण नसताना बदली !

डयूक ऑफ मार्लबराने असं म्हटलंच आहे की, "मोहीम जवळ आलेली असताना मध्येच आघाडीवरच्या जनरलची बदली करणं म्हणजे जिवंतपणीच त्याला फटका मारून ठार करण्यासारखं आहे!"

जनरल उमराव यांना असा फटका मारण्यास जे जे कारणीभूत आहेत ते ते फार मोठे गुन्हेगार आहेत! (क्रमश:)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi
Thacker & Co. © with the Original Publisher

## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, अजूनही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (मान) पो. कतरीसराय (गया)

# आधुनिक विज्ञानेश्वरी

दत्तप्रसाद दाभोळकर

## अगा जे घडणार नाही....!

**"पाऱ्यापासून सोने तयार केले. रसवैद्य आचार्य यांचे यश!"** अहमदाबाद दि. ८ जून.– चार दिवस सतत प्रक्रिया करून पाऱ्यापासून सोने बनविण्याचा यशस्वी प्रयोग श्री. आचार्य या तरुण रसवैद्याने केला. जगद्‌गुरु शंकराचार्यांचे गुरु भिक्षू गोविंद यांनी लिहिलेल्या 'रसहृदय तंत्र' या ग्रंथातील अमोल ज्ञान वापरून त्यांनी ही किमया केली.

–मराठीतील सर्व वृत्तपत्रांतून आलेली ही हास्यास्पद विनोदी बातमी वाचून विज्ञानेश्वरीची मात्र खूप करमणूक झाली. विज्ञानेश्वरीला थोडे वाईटही वाटले. खरे पाहता आपल्या देशात या असल्या विनोदी भंपक बातम्या तशा काही कमी नसतात. एखादा हटयोगी अधीमधी पाण्यावरून चालून दाखवतो! एखाद्या मलंगासमोरचा दगड फकिराच्या कृपेने चक्क हवेत तरंगतो! एखादे बाबा आपल्या हातात दैवी कृपेने सरळ 'स्विस् मेड' घड्याळे निर्माण करतात! आणि या सर्व गोष्टी आमच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे श्रेष्ठत्व दाखवतात, असे आपण अभिमानाने सांगतो.

विज्ञानेश्वरीला भारतीय परंपरेचा आणि संस्कृतीचा अभिमान नाही असे नव्हे. मानसीक सामर्थ्य ही फार मोठी शक्ती आहे हे पण विज्ञानेश्वरीला मान्य आहे. विज्ञान जगातही अशक्य अद्‌भूत वाटणाऱ्या गोष्टी अनेकदा घडतात. पण या सर्वांला काही मर्यादा आहेत. या विश्वात काही मूलभूत नियम आहेत. त्या नियमांविरोधी घटना घडू शकत नाहीत. गुरूत्वाकर्षण हा असा एक मूलभूत नियम आहे. याच नियमाचा अभ्यास आणि वापर करून माणूस अचूकपणे चंद्रावर वा अन्य ग्रहावर उतरू शकतो. अशा वेळी एखाद्या फकीराच्या कृपेने एखादा दगड गुरुत्वाकर्षणाचे नियम दूर लोटून हवेत तरंगू शकणार नाही. दगड हवेत तरंगवणे ही एक सोपी

शास्त्रीय कसरत असते. विज्ञानाचे नियम जाणणारा कोणीही सोम्यागोम्या ती करू शकतो. शून्यापासून कोणतीही गोष्ट निर्माण करता येत नाही. त्यामुळेच दैवी कृपेने कोणाच्या हातात स्विसमेड घड्याळे वा सोन्याचे मोहनहार येऊ शकत नाहीत. तो एक साधा जादूचा प्रयोग असतो! – शून्यापासून गोष्टी निर्माण करण्याचे बाजूला राहू दे. या बाबांची हिंमत असेल तर चंद्रावरून अंतराळवीर जे नमुने पृथ्वीवर आणणार आहेत, ते या लोकांनी आधी पृथ्वीवर आणून दाखवावे !

या मूलभूत नियमाप्रमाणे, एखाद्या मूलतत्त्वाचे साध्या रासायनीक प्रक्रियेने दुसऱ्या मूलतत्त्वात रूपांतर करता येत नाही. प्रत्येक मूलतत्त्वाला स्वत:ची अशी एक विद्युत्‌रचना असते. प्रत्येक मूलतत्त्वात अणुकेन्द्राभोवती ठराविक ऋण विद्युत् कण भ्रमण करत असतात. अणुकेन्द्राभोवती फिरणाऱ्या ऋण विद्युत्‌कणांची संख्या एकोणऐंशी असली की पारा तयार होतो. अणुकेन्द्राभोवती फिरणाऱ्या ऋण विद्युत्-

## पाऱ्यापासून सोने .....?

सुवर्णाच्या लोभातून वेडया झालेल्या अरब किमयागारांचे तांडे मध्ययुगात या सुवर्ण भूमीत शिरले. लोखंडाचे सोने करणारा परिस या सुवर्णभूमीत कोठेतरी मिळेल ही त्यांची अपेक्षा होती. या परिसाच्या शोधात किमयागार आसेतुहिमाचल हिंडले. भारतातील धर्मग्रंथांचा त्यांनी अभ्यास केला. माणसाने प्रयत्न केला, स्वत:तील दोष काढून टाकले तर तो परमेश्वररूप बनतो या भारतीय तत्त्वज्ञानाने किमयागारांना स्फुर्ती दिली.–हिणकस धातूमधील दोष काढून टाकले तर त्या धातुला पूर्णत्व येईल, त्याचे सोने बनेल, हा सिद्धांत त्यांनी पुढे मांडला. लोखंड, पारा, सोने यांची संयुगे खाणीत काही वेळा एकत्र मिळतात. किमयागारांच्या प्रयोगाला या संयुगांनी अधिष्ठान दिले. लोखंड आणि पारा याचे सोन्यात रूपांतर करण्यासाठी मग किमयागारांनी खूप प्रयोग केले. अमाप श्रम वेचले. आपले प्रयोग किमयागारांनी गुप्तभाषेत धार्मिक ग्रंथात लिहून ठेवले. किमयागारांच्या या वेडगळ प्रयोगांना कधीच यश मिळाले नाही. पण याच प्रयोगात फॉस्फरससारख्या मूलतत्त्वांचा शोध लागला. आधुनीक रसायनशास्त्राचा पाया घातला गेला. किमयागारांना सोने मिळाले नाही पण सोन्याहून मौल्यवान अशा रसायनशास्त्राला त्यांनी जन्म दिला...पाऱ्यापासून सोने बनविण्याच्या मध्ययुगीन प्रयोगांचे हे एवढे ऋण आधुनीक विज्ञानाला मान्य आहे.

कणांची संख्या ऐंशी झाली की सोने तयार होते. ऋण विद्युतकणांची ही संख्या कोणत्याही साध्या रासायनीक प्रक्रियांनी बदलता येत नाही. त्यासाठी फार मोठ्या शक्तीची जरुरी असते. हे स्थित्यंतर घडताना पण फार मोठी शक्ती निर्माण होते. हिरोशीमा आणि नागासाकी एका क्षणात उध्वस्त करणाऱ्या अणुबॉंबने हाच सिद्धांत वापरला होता...हा नियम श्री. आचार्यांना वा ' रसहृदय तंत्र ' या त्यांच्या ग्रंथाला बदलता येणार नाही !

हे मूलभूत नियम बदलता येतात या वांझोटच्या तत्त्वज्ञानातूनच अखेर फार मोठे घोटाळे निर्माण होतात. सोमनाथाची मूर्ती ' जडत्वाचा ' नियम भिरकावून देईल आणि स्वतःच गझनीच्या महंमदाचे पारिपत्य करील असला विचार मांडणाऱ्या सोमनाथाच्या पुजाऱ्यांनी तरी यापेक्षा वेगळे काय केले ? हा विचार मांडणाऱ्या त्या पुजाऱ्यांना अखेर सोमनाथाची उध्वस्त झालेली मुर्ती पाहावी लागली. खऱ्या अर्थाने ते पुजारीच गझनीच्या महंमदाचे जवळचे मित्र ठरले ! सोमनाथाचे मारेकरी ठरले ! ! ...आणि हातातून घड्याळ निर्माण करणारे, दगड हवेत तरंगवणारे पाण्यावरून चालणारे व पाऱ्यापासून सोने बनवणारे भारतातील आजचे अवलीये हे सोमनाथाच्या त्या पुजाऱ्यांचे अत्याधुनीक अवतार आहेत !

## द्राक्ष लागवड

आपण प्रत्येकाने अभिमान बाळगावा अशी ही घटना आहे ! तासगावच्या वसंतराव आर्वे यांनी या वर्षी द्राक्ष उत्पादनात एक नवा जागतीक विक्रम गाठलाय. ' थॉमस सीडलेस ' या द्राक्षाचे अमेरिकेतील पहिल्या वर्षीचे उत्पादन असते अधिकात अधिक सात टन ! महाराष्ट्रातील या शेतकऱ्याने या वर्षी या द्राक्षांचे एकरी दहा टन उत्पन्न घेतलंय ! आणि वसंतराव आर्वे काही एकटे नाहीत. त्यांच्याबरोबर तासगावचे गणपतराव म्हैत्रे, केशवराव लुगडे, विट्याचे भगवानराव पवार यांनीही असेच उच्चांक प्रस्थापीत केलेत. या चोघांची व इतर द्राक्षप्रेमी लोकांची एक टोळीच आहे म्हणा ना ! या टोळीचे नाव आहे ' वैज्ञानीक द्राक्ष कुल ' विज्ञानातील अत्याधुनिक माहिती वापरून आणि नवनवे प्रयोग करून द्राक्षाचे अधिकात अधिक उत्पन्न घेण्यास ही टोळी प्रतिज्ञाबद्ध आहे.

अजून अमेरिकेतही प्रयोगावस्थेत असलेले ' जिबरेलीक ॲसिडचे ' आणि ' गर्डलिंगचे ' तंत्र या लोकांनी आपल्या बागायतीत यशस्वीपणे वापरले. काही नवे प्रयोग करून त्या तंत्रात सुधारणा पण केली. ' गर्डलिंग ' म्हणजे झाडाची साल काढणे. घड फुलोऱ्यातून बाहेर पडल्यावर या मंडळींनी फळ धरलेल्या काडीची

साल छाटली. अशी साल छाटल्यामुळे काडीतून रस मुळाकडे जाण्याऐवजी तो फळाकडे वळतो. फळे अधिक चांगली येतात. अमेरिकेत 'गर्डलिंग 'मध्ये खोडाची साल छाटतात. खोडाऐवजी काडीची साल छाटणे हा या लोकांनी केलेला बदल आहे. हा बदल अधिक फायद्याचा आहे असा या लोकांचा दावा आहे. 'गर्डलिंग'. साठी एक विशिष्ट स्वरूपाची कात्री लागते. भारतात ती उपलब्ध नव्हती. परकीय चलन असल्या साध्या गोष्टीसाठी मिळणे शक्य नव्हते ! –पण अखेर तासगावच्या एका लोहाराने त्या कात्रीचे चित्र बघून तसली कात्री लगेच तयार केली. ती कात्री झकास काम देते आहे. घड लहान असताना या लोकांनी घडांना 'जिबरॅलीक ॲसिड 'चा शिडकावा दिला. यासाठी त्यांनी ५० पी. पी. तीव्रतेचे 'जिबरॅलीक ॲसिड ' वापरले. या तीव्रतेचे ॲसिड तयार करण्यासाठी १ सी. सी. इथाइल अल्कोहोलमध्ये ५० मिलीग्रॅम ॲसिड घालून त्यात एक लिटर पाणी मिसळावे लागते. म्हणजे दहा लिटर द्रावण तयार करण्यासाठी फक्त अर्धा ग्रॅम 'जिबरॅलीक ॲसिड ' लागते व तेवढे द्रावण एका एकरासाठी पुरेसे असते.

'गर्डलिंगच्या ' प्रयोगात या लोकांना गारगोटीच्या ' स्वाश्रय संशोधन केंद्राने ' मदत केली. 'जिबरॅलीक ॲसिड 'च्या प्रयोगात निपाणीच्या 'स्वाश्रय संशोधन केंद्राने ' त्यांना मार्गदर्शन केले. मोठी प्रयोगशाळा हाताशी नसताना, सरकारी यंत्रणेचे खास पाठबळ नसताना, जागतीक विक्रमाची किमया घडून आली. माणूसच्या कोणा वाचकाला या प्रयोगाची अधिक माहिती हवी असल्यास गार-

### वीर सावरकर म्हणाले होते......

युरोपने बायबलला दूर सारून विज्ञानाची कास धरताच, युरोप गेल्या चारशे वर्षांत आमच्यापुढे चार हजार वर्षे निघून गेला. तसे आमच्या भारतीय राष्ट्रासही होणे असेल तर 'पुरातनी' युगाचा ग्रंथ मिटून, विज्ञानयुगाचे पान आपण उलटले पाहिजे. त्या ग्रंथाचा 'काल काय झाले ?' इतकेच सांगण्यापुरता अधिकार. आज काय योग्य ते सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ प्रयोगक्षम विज्ञानाचा ! अद्यावत्पणात मागच्या सर्व अनुभवांचे उपयुक्त सारसर्वस्व सामावलेले असते. पण श्रुतिस्मृतिपुराणोक्तात अद्यावत् ज्ञानाचा लेशही नसतो. यास्तव आमचे पुरातन धर्मग्रंथ आम्ही आदराने सन्मानतो, पण ऐतिहासीक ग्रंथ म्हणून; अनुल्लंघ्य धर्मग्रंथ म्हणून नव्हे ! त्यातील सारे ज्ञान-अज्ञान, आजच्या आमच्या विज्ञानाच्या कसोटीला आम्ही लावणार. आम्ही अद्यावत् बनणार. अप-टू-डेट बनणार !

गोटीच्या स्वाश्रय केंद्राने त्याला ती पुरवण्याचे मान्य केले आहे. त्यांना पन्नास पैशाची पोस्टाची तिकिटे पाठवून आपण ती माहिती मिळवू शकाल. पुढील तीन-चार महिन्यात या प्रयोगाचे संपूर्ण निष्कर्ष बाहेर येतील, आणि त्यावेळी तो संपूर्ण प्रयोग विज्ञानेश्वरीतून माणूसच्या वाचकांसमोर मांडला जाईल. तुर्तास, आपण पुन्हा एकदा या ' वैज्ञानीक द्राक्षकुला 'चे अभिनंदन करू या !

# भूकंपाचे भविष्य....

पुराणकालीन माणूस विजेचे तांडव, सूर्याचे ग्रहण, भूकंप, साथीचे रोग या गोष्टींनी केवढा घाबरला असेल. या प्रत्येक घटनेमागे त्याने दैवी शक्तीचा संबंध जोडला. या दैवी शक्तींना खुश करून त्यांना लाच देऊन या संकटातून आपली सुटका होऊ शकते अशी त्याने स्वतःच्या मनाची समजूत काढली. आज ग्रहणे, विज, साथीचे रोग यांची शास्त्रीय कारणे आपणाला माहीत आहेत. या संकटांशी मुकाबला कसा करावयाचा हे विज्ञान जाणते. पण अजून एका गोष्टीत आपण पुराणकालीन माणसाच्या जवळपास आहोत. भूकंपाबद्दलचे आपले ज्ञान (किंवा अज्ञान !) अजुनही बरेचसे जुनेपुराणे आहे !




डॉ. जॉर्ज रस पृथ्वीचा गोल आणि काल्पनीक वर्तुळे यांच्या साहाय्याने न्युयॉर्कच्या वृत्तपत्र परिषदेत स्वतःचा सिद्धान्त समजावून देत आहेत.

भूकंपाबद्दलच्या आपल्या अज्ञानाचा बिमोड करण्याचे काम सध्या काही तरुण शास्त्रज्ञांनी अंगावर घेतलेले आहे. त्या तरुणांचा म्होरक्या आहे डॉ. जॉर्ज रूस 'कोलार्डो' विद्यापीठातून रसायन आणि भूगर्भशास्त्र या दोन विषयात डॉक्टरेट घेऊन बाहेर पडलेल्या या तरुणाजवळ काही नव्या कल्पना आहेत. त्याच्या मते आणखी काही वर्षांनी भूकंपाचे भविष्य आधी वर्तवता येईल! नुकतीच न्यूयॉर्कला वृत्तपत्रपरिषद घेऊन डॉ. रूसने स्वतःचे विचार इतरांना पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मते पृथ्वीवरील भूकंप होणारे विभाग काही विशिष्ट वर्तुळात सामावलेले असतात. रुसने आणखी एक गोष्ट शोधून काढली आहे. पृथ्वीचा गोल आणि पृथ्वीवरील ही वर्तुळे यांना ज्या लंबाकृती रेषा छेदून जातात त्या विभागात जड खनीजे साठवलेली असतात. रुस म्हणतो, 'पृथ्वीची गुरुत्वाकर्षणाची व भ्रमणाची शक्ती आणि पृथ्वीच्या मध्यातील चुंबकीय शक्ती यांच्या तणावातून ही वर्तुळे तयार होतात. त्या तणावामुळेच ही जड खनीजे या लंबाकृती रेषेत फेकली जातात आणि या तणावामुळेच या वर्तुळात भूकंप निर्माण होतात." आता गुरुत्वाकर्षणाच्या आणि चुंबकीय शक्तीत तणाव कोठे व केव्हा निर्माण होणार हे जर आपण गणिताने सांगू शकलो तर, आपण भूकंपाचे भविष्य वर्तवू शकू.

डॉ. रूसचा हा सिद्धान्त अनेकांना पटलेला नाही. हा सिद्धान्त स्वीकारला जाईल अशी चिन्हे आज तरी दिसत नाहीत. पण भूकंपाबद्दल काही नवे सिद्धान्त मांडले गेले पाहिजेत. ते पारखून घेतले पाहिजेत. भूकंपाचे भविष्य वर्तविता आले पाहिजे. हे या वृत्तपत्र परिषदेमुळे अनेक शास्त्रज्ञांना जाणवले. या गोष्टीची निकड त्यांच्या लक्षात आली. आणि डॉ. रुस या तरुण शास्त्रज्ञाने मिळवलेले हे यशही काही थोडेथोडके नाही. ■■




# तुमचे भविष्य आमचा अंदाज



श्री. गो. जोशी, सायनाचार्य

## जुलै महिन्याचे भविष्य

**मेष** : मंगळाची मार्गी अवस्था आणि सूर्याची पराक्रमस्थानातील उपस्थिति यामुळे हा महिना आपण चांगलाच गाजवून सोडाल. कला, क्रीडा क्षेत्रात आवाज उठवाल. शैक्षणिक कार्यात प्रतिष्ठा मिळवाल. वृत्तपत्रीय प्रसिद्धिही चांगली लाभावी.

साडेसातीची बाधा सध्या तरी होण्याची शक्यता नाही. आठव्या मंगळाचेही हृदय परिवर्तन झाल्यासारखे जाणवेल.

पहिल्या आठवड्यात दूरचा प्रवास घडेल, नवे क्षेत्र हाती गवसेल.

पण एक गोष्ट लक्षात ठेवावी, खूप परिश्रम केल्याशिवाय अपेक्षेप्रमाणे काहीच घडणार नाही. साडेसातीचा एवढा परिणाम होणारच.

खर्चाचे प्रमाण खूपच वाढेल. नव्या कार्यक्रमात भाग घ्यावा लागेल. व्यवहार धंद्याचे तंत्र थोडेफार बदलावे लागेल.

दि. ३ ते ५, १३ ते १९, २७ ते ३१ सर्वच गोष्टीत चांगले यश मिळेल.

**वृषभ** : जुलैच्या ८ तारखेला मंगळ मार्गी होईल आणि बरेच दिवसांची मंगळाची डोकेदुखी एकदाची थांबेल. शिवाय दुसऱ्या पंधरवड्यात सूर्य पराक्रमस्थानी येणार असल्यामुळे आपली सारी स्थगित कामे गती घेऊ लागतील.

सांपत्तिक अडचणी दूर होतील. बदली बढतीचे योग स्पष्टपणे दिसू लागतील. इष्टमित्रांचे सहकार्य कोणत्याही क्षणी मिळू शकेल.

गेल्या २।३ महिन्यातील साऱ्या अडचणी आणि विवंचना पूर्णांशाने नाहीशा झाल्यामुळे आपला प्रगतीचा मार्ग निर्वेध-निष्कंटक बनेल.

राहत्या जागेसंबंधीच्या अपेक्षा सफल होतील. तुम्हापैकी काहींना परदेशास जाण्याचीही संधी लाभावी. यांत्रिक, विद्युतक्षेत्राशी संबंध यावा. व्यवसाय धंद्यातील भागीदारीतील संघर्ष पेटू शकतील.

दि. १ ते ५, ११ ते १५, २० ते २८ या काळी अनेक कामात यश मिळेल.

**मिथुन** : मंगळाच्या मार्गीपणामुळे तुमचा सारा अनिष्ट काळ संपला असं

म्हणायला मुळीच हरकत नाही. सूर्य एकदा तुमच्या राशीतून पुढे निघून गेला की, उरला सुरलेला अनिष्ट कालही संपून जाईल.

दुसरा पंधरवडा सर्वच दृष्टीने लाभाचा, अपेक्षा-साफल्याचा जाणवेल. गुरू-हर्शल युती होताच (२० जुलै) आपल्या बऱ्याचशा योजना गती घेऊ लागतील.

कौटुंबिक कटकटी, व्यावसायिक मतभेद, स्थावराच्या भानगडी बऱ्याच प्रमाणात मिटतील आणि त्यामुळेच व्यवसाय-धंद्यात तुमचे मन रमेल.

साहित्य, वृत्तपत्र व्यवसाय, ग्रंथ प्रकाशन इत्यादि बाबतीत आपण भरीव व प्रशंसनीय कार्य करून दाखवू शकाल.

दि. ३ ते ७, ११ ते १९, २० ते २७ हे सर्व दिवस प्रगतीला पोषक ठरतील.

**कर्क** : दैवी कृपा आणि प्रयत्नांची शिकस्त यामुळे हा महिना आपणास विशेष प्रयत्नाचा जाणवेल. विशेषत: शुक्र हर्शल त्रिकोणापासून (७ जुलै) आपल्या साऱ्या योजना वेग घेऊ लागतील. हुकलेल्या संधी पुन्हा लाभतील. घसरलेला डाव सावरला जाईल.

नोकरीधंद्यातील प्रतिष्ठेचे स्थान फारसा प्रयत्न न करता मिळवू शकाल. उद्योग-धंद्यात उत्क्रांती घडवून आणण्याचे तुमचे विचार या महिन्यापासूनच आकार घेऊ लागतील.

शेती, रासायनिक द्रव्ये, प्रवाही पदार्थ यात आजवर कधीहि न मिळू शकलेले यश आपल्या पदरी पडू शकेल.

नोकरी-धंद्यात दूरचे प्रवास करावे लागतील. सरकारी सहकार्य कोणत्याहि क्षणी लाभेल.

दि. ५ ते ११, १६ ते २१, २४ ते २७ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**सिंह** : वक्री मंगळाची असह्य डोकेदुखी मंगळ मार्गी होताच एकदम थांबेल आणि त्यामुळेच भविष्य काळात आपण काही नवे भव्य कार्य करू शकू असा आत्मविश्वास निर्माण होऊ लागेल. गेल्या ४ महिन्यात या वक्री-मंगळाने तुम्हाला बरेच खच्ची केले.

सूर्य-बुध लाभस्थानी आल्याने या महिन्यापासूनच नव्या आशा अंकुरायला लागतील, नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. व्यवसायक्षेत्रात सर्वत्र आशादायक वातावरण दिसू लागेल.

सांपत्तिक बाबतीत आता यापुढे फारशी काळजी करावी लागणार नाही. नोकरीतील पिछेहाट थांबेल. डुबलेला धंदा पुन्हा उभारला जाईल. अनपेक्षित धनलाभाच्या आशा सफल होण्याची लक्षणे दिसू लागतील.

दि. ७ ते १४, १८ ते २२, २४ ते २९ या काळात अपेक्षेप्रमाणे सर्व काही घडावे.

**कन्या** : या महिन्यात अंतरिक्षीय ग्रहक्षेत्रात अनेक क्रांत्या-उत्क्रांत्या घडून येणार आहेत. त्यांचा आपल्या जीवनावरही पडसाद उमटल्याशिवाय राहणार नाही. मंगळाची मार्गी स्थिती ७ जुलै, सुर्याचे तुमच्या लाभस्थानी आगमन १६ जुलै, आणि राहूचे राश्यंतर या साऱ्याबद्दल त्या अवस्थेमुळे तुमच्या आचार-विचारात, व्यव-

सायात अनुकूल व अपेक्षित बदल घडून येतील.

दुसरा पंधरवडा स्मरणात ठेवण्यासारखा अनुकूल व लाभाचा जाणवेल. आपल्या प्रगतीच्या योजना आकार घेऊ लागतील, नव्या व्यवसाय-धंद्यात घवघवीत लाभ होण्याची लक्षणे दिसू लागतील आणि स्थानांतरामुळे आपल्या व्यावसायिक अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

दि. २ ते ५, १० ते १८, २० ते २९ हे सारे कालखंड नवी दिशा, नवा मार्ग दाखवतील.

**तूळ :** जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात सूर्य-बुध भाग्यस्थानातून संचारत आहेत, तोपर्यंत आपण आपल्या कार्यक्षेत्राला विशेष रंगरूप देऊ शकाल. मंगळाची अनिष्टता आता ओसरलेली असल्यामुळे, सांपत्तिक बाबतीतही आता कसलीही काळजी करण्याचा प्रसंग उद्भवणार नाही.

या महिन्यात आपला नव्या व्यवसायधंद्यांशी संबंध येईल. कलाक्षेत्रात काही भरीव कार्य करण्याची संधी लाभेल. संशोधनक्षेत्राशी आपला संबंध असला तर आपले महत्त्व वाढणाऱ्या अनेक गोष्टी घडून येतील.

जुलै महिन्यापासून तुमचा सारा अनिष्ट काल संपला, असे म्हणायला हरकत नाही.

दि. ३ ते ८, १३ ते २०, २३ ते २८ या काली अपेक्षित यश पदरी पडावे.

**वृश्चिक :** मंगळाचे हृदयपरिवर्तन झालेले आणि सूर्याचे भाग्यस्थानी आगमन घडलेले इतकी चांगली ग्रहस्थिती मला वाटते कित्येक दिवसांनंतर आताच आपण अनुभवणार आहात. मंगळाबद्दल आता ना खेद ना खंत. अकराव्या गुरुचे खरे सामर्थ्य याच महिन्यात आपल्या प्रत्ययास यावे. २४ जुलैला सूर्य-गुरूंचा लाभयोग घडताच आंतरिक सुप्त भावना आकार घेऊ लागतील. सांपत्तिक लाभही अपेक्षेबाहेर घडेल. आपल्या व्यवसायधंद्याचे क्षेत्रफळ विस्तारेल आणि त्यामुळे आपल्या प्राप्तीचा आलेख सतत उंचावू लागेल.

२० जुलैचा गुरु-हर्शल योगही आपल्या जीवनात अनन्यसाधारण प्रगत घटना घडवून आणील. जुलैचा दुसरा सारा पंधरवडा नोंद करण्यासारखा प्रगतीचा जाणवेल.

दि. ७ ते १२, १९ ते २९ या कालाची नोंद ठेवा.

**धनू :** वक्री मंगळाने तुमचे रस्ते रोखून धरलेले होते. तुम्हाला त्याने पुढे सरकूच दिले नाही. तो मार्गी झाला आणि तुमच्या प्रगतीच्या मार्गातील अडसर दूर झाला लवकरच राहूही चतुर्थातून पसार होत आहे.

आता निर्धाराने पुढे जाऊ लागलात तर अपेक्षित यश फारसे दूर नाही, असे तुम्हाला वाटू लागेल.

नोकरीधंद्यातील साऱ्या समस्या भराभर सुटायला लागतील. इष्टमित्रांचे सहकार्य कोणत्याही क्षणी लाभेल. सांपत्तिक ताण निश्चितच कमी होईल. भंगलेल्या साऱ्या अपेक्षा सांधल्या जातील.

दूरच्या प्रवासाचे मात्र काही काल लांबणीवर टाका. मंगळ संपूर्णपणे वृश्चिक राशीतून निघून गेल्याशिवाय कोणत्याही साहसाला उद्युक्त होऊ नका.

दि. ४ ते ९, १५ ते २४, २७ ते ३१ या काली अपेक्षित यश पदरी पडावे.

**मकर :** गेल्या ३–४ महिन्यांत मंगळ लाभस्थानी असूनही मंगळाच्या अचाट सामर्थ्याचा आपणास प्रत्यक्ष येऊ शकला नसेल–तो मार्गी होताच (दि. ८ जुलै) त्याचे सामर्थ्य आपल्या प्रत्ययास यायला लागेल. दुसरा पंधरवडा आपणास नोंद घ्यावी असाच जाणवेल.

सारी स्थगित कामे गती घेऊ लागतील. नव्या आशा अंकुरायला लागतील. इष्ट-मित्रांचे हार्दिक सहकार्य मिळू लागेल आणि वैचारिक संघर्ष मिटल्यामुळे प्रगतीचा मार्ग निर्वेध बनू लागेल. गुरू भाग्यस्थानी आहे तोपर्यंतच काहीतरी लोकविलक्षण कार्य करण्याची संधी आहे.

नोकरी-धंद्यात अभिनव आकर्षक असे घडू लागेल.

दि. ५ ते १५, २० ते २८ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ :** दशमातील मार्गी मंगळाचा तुमच्या अंगीकृत व्यवसायावर निश्चितच चांगला परिणाम जाणवायला लागेल. नवे व्यवसायक्षेत्र हस्तगत कराल. त्या नव्या वातावरणात काही लोकोत्तर असे कार्य करून दाखवू शकाल. आता तुम्हाला घोळ घालीत बसायला वेळच नाही. उद्योगधंद्यात जगाचे तुमच्यावर लक्ष वेधेल, असे काही करण्याची संधी मिळेल.

आपल्या कित्येक दिवसातील असफल आशाआकांक्षा बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

साहित्य-संशोधन ही तुमची खास क्षेत्रे, त्यात आवाज उठवू शकाल. सांपत्तिक दृष्टीनेही हे दिवस अनुकूल जाणवतील.

दि. ६ ते १५, १९ ते २५, २७ ते ३० हे फारच अनुकूल.

**मीन :** भाग्यस्थानातील मार्गस्थ मंगळाचे महत्त्व येथूनच तुमच्या प्रत्ययास यावे. सारी स्थगित कामे निमिषार्धात होऊन जातील. स्थानांतराच्या व स्थित्यंतराच्या घोळात पडणारा प्रश्न झटपट सुटू शकेल. अनेकांच्या सहकार्यामुळे सामाजिक क्षेत्रातील अनेक समस्या सुटू लागतील. व्यवसायधंद्यात नवे पर्व सुरू झाल्याचा साक्षात्कार घडू लागेल.

नाट्य–नभोवाणी, चित्रपट सृष्टी या बाबतीत तुमचे महत्व नव्याने सिद्ध होईल. एकाएकी दूरच्या प्रवासाचे ठरेल. सांपत्तिक योगही सुधारू लागतील.

दि. ५ ते ११, १४ ते २१, २४ ते २७ या काली बऱ्याच अपेक्षा सफल व्हाव्यात.

■■



# प्रचंड

पृष्ठ ७ वरून

---

महाराष्ट्र लढ्याचा ताण पडला आहे.

त्या सरशी ते वृद्ध आणखीच कळवळून म्हणाले, अरेरे ! त्यांना म्हणावे, एवढा ताण घेत जाऊ नका. प्रकृतीला बरा नव्हे तो.

बाबुराव यावर ' सांगेन सांगेन ' अशा अर्थी गंभीरपणे मान हलवीत राहिले आणि या कुटुंबाला घेऊन ते अधिकारी गृहस्थ कसेबसे गडबडीने बाहेर धावले. जाताना दार नीट लावून घेण्याला मात्र ते विसरले नाहीत.

माझ्या ' हिरो 'चे हे आणखीच एक निराळे अनौपचारिक रूप दिसले होते. परंतु हे येथेच संपले नाही. नंतर जेमतेम दोन तासांनी पुन्हा ' इंटरकॉम ' घुमला मला बोलवले होते. आता आणखी काय दिसेल म्हणून मी केबिनमध्ये जपूनच शिरलो. ' साहेब ' टेबलामागच्या खुर्चीत नेहमीप्रमाणे बसलेले होते. बाबुराव पेंढारकर गेले होते. मला पाहताच माफक स्फोट झाला, तो × × × महामूर्ख माणूस आहे ! कधी कुणाला कुठे आणावे हे त्या गाढवाला बिलकुल कळत नाही. जरा दिलगीर स्वरात मी म्हणालो, पण माझ्याही हातून चुकून दार उघडेच राहिले होते. ' साहेब ' म्हणाले, तेच तर मी तुमच्या नजरेला सारखा आणून देण्याचा प्रयत्न करीत होतो, पण तुमचे आपले पुन्हा पुन्हा ' काय ?' आता ' काय ' काय कपाळ ! जाऊ द्या...आणि त्यांनी कामाचा विषय चालू केला.

एकदा माझ्याकडे अग्रलेख लिहिण्याचे काम आले. विषय आठवत नाही पण त्यात पाजव्या उंदराचा काही संदर्भ उपमेदाखल मी दिला होता. दुसऱ्या दिवशी घरून फोन खणखणला. सवाल विचारण्यात आला, हा कुठला शब्द तुम्ही काढला ? पाजवा म्हणजे काय? मराठीत असा शब्दच नाही ! मी तसा शब्द असल्याचे हळूच सांगितले आणि तो लहानपणापासून ऐकत असल्याचेही म्हटले. त्यावर उद्गार आला, शक्य नाही ! मराठी शब्द आम्ही ऐकलेला नाही असे कसे शक्य आहे ? असला शब्द वापरू नका. दुसऱ्या दिवशी म्हणाले, शब्द आहे—कोकणाकडला आहे त्यामुळे आम्ही तो ऐकला नव्हता. पण यानंतर सर्वांना कळतील असेच शब्द वापरा. आपला ' मराठा ' सगळे वाचणार !

रविवारच्या ' मराठा 'चे संपादन माझ्याकडे होते. त्या काळात त्यात पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत राजकीय—तेही काँग्रेस विरोधी आणि समितीवादी—लेखच असत. त्यातले अनेक केवळ आक्रस्ताळे तर काही जडजवाल शब्दातले, क्लिष्ट आणि भाषांतरवजा अँग्लो मराठी कम्युनिस्ट लेखनशैलीचे असत. ते वाचताना माझाच दम निघून जाई तर वाचकांना रविवारी हा ' डोस ' केवढा भारी होत असेल याची कल्पना केलेली बरी. पण रविवार अंकात साहित्य-विषयक मजकूर टाकावा असे सुचवले की तात्काळ ' साहेब ' हाडाच्या राजकारणी पुरुषासारखे म्हणत, आता साहित्य वाचतो कोण ? राजकारण पाहिजे. काँग्रेसला महाराष्ट्रातून उखडून टाकल्यावर मग साहित्य. सध्या राजकारण—बस्स.

त्या काळात त्यांच्या टेबलावर किंवा हाती साहित्यविषयक पुस्तक दिसत नसे. साहित्य विषयक चर्चा होत नसे. दिवस रात्र त्यांना राजकारणाचाच ध्यास लागून राहिलेला. परंतु मध्येच एक दिवशी कामासाठी मी गेलो असता टेबलाच्या ड्रॉअरमधून त्यांनी भक्कम बांधणीची जाडी जाडी पुस्तके काढली. माझ्यापुढे ती रचून म्हणाले, बघा. सुंदर पुस्तके आहेत. दीडशे रुपयाला हे एक घेतले. हे शंभरचे. वृत्तपत्र संपादनाच्या तंत्रावरची ती पुस्तके होती. कोरीच होती. मी ती उभ्या उभ्या चाळली. ते म्हणाले, संपादनाचे केवढे प्रचंड शास्त्र आहे पहा. फार मोठे शास्त्र आहे ते. सवड मिळाली की ही वाचणार आहोत आम्ही आता. हे म्हणताना नव्या वर्षी आणलेली शाळेची पुस्तके विद्यार्थी जशी हाताळील तशी अपूर्वाईने, प्रेमाने ती पुस्तके ते हाताळीत होते. नंतर पुन्हा त्यांनी ती ड्रॉअरमध्ये ठेवून दिली. ठेवताना म्हणाले, अशी कितीतरी सुंदर सुंदर पुस्तके त्यांच्याकडे असतात. प्रत्येक शास्त्रावर हजारो पुस्तके असतात. ती वाचली पाहिजेत. वर्तमानपत्रातल्या माणसांनी प्रथम प्रत्येक शास्त्रावर पुस्तके वाचली पाहिजेत. ही शूड बी वेल रेड ! पण आपल्या तरुण मुलांना हौसच नाही. खूप वाचले पाहिजे. आधी वाचणे आणि मग पहाणे. आता आम्हाला वाचनाची हौस फार आहे. पण हल्ली वेळ कुठे मिळतो ? हे काँग्रेसवाले सवड कुठे देतात ? यांना किती उघडे करा, हे म्हणणार काय उकाडा !

एकदा चित्रपटांचा विषय निघाला. मी त्यांना नुकत्या पाहिलेल्या एका पाश्चात्य चित्रपटाविषयी सांगितले. चांगले आहे, छान आहे. असे म्हणून ते पुढे म्हणाले, मागे आम्ही खूप चित्रपट बघत होतो. चाप्लिन म्हणजे तर चमत्कार ! असे चित्रपट पुन्हा निघणेच शक्य नाही. आता अलीकडे काही पाहायला वेळ होत नाही. काँग्रेसचा पाडाव कोण करील ? तो केलाच पाहिजे ! त्या शिवाय महाराष्ट्राचा तरणोपाय नाही बघा.

आपल्या मूळच्या अव्वल साहित्यिक पिंडालाच त्यांनी या काळात अंतर्बाह्य राजकारणी पाणी दिले होते. त्यांची उक्ती, कृति, लेखन आणि चिंतन देखील अंतर्बाह्य

राजकारणी झाले होते. त्यांचे भोवतालचे वर्तुळ सर्रास राजकारणीच होते. त्या पहिल्या दिवशी सकाळी घरी ऐसपैस अरबट चरबट आणि अनेक विषयांवर गप्पा ठोकणारे ते उघडेबंब ऐसपैस खुले व्यक्तिमत्व मराठाच्या परिसरात राजकारणी पुढाऱ्याच्या वेषात कुठे तरी हरवल्यासारखे वाटत होते. माझा अपेक्षा भंग होत होता.

१९६२ मध्ये पुण्याच्या लोकसभेच्या निवडणुकीत नानासाहेब गोऱ्यांनी त्यांना पाडले आणि त्यांच्या राजकारणी अवसानाला पहिला मोठा तडा गेला. त्याहीपलीकडे कुठे तरी वर्मी ही गोळी लागली असावी. कारण तो निर्णय लागला त्या दिवशी सकाळी ते मुंबईत होते. मराठाच्या कचेरीत आपल्या खोलीत सकाळी लौकर येऊन बसले होते. मीही कामानिमित्ताने लौकर पोचलो होतो आणि इंटरकॉम दणाणला, कोण आहे खाली ? वर या. स्वर जड होता, मूड वाईट होता. कचेरीत वृत्तखात्याचा एक उपसंपादक आणि दुसरा मी एवढेच त्या वेळी हजर होतो. मी वर गेलो. ते केव्हापासून कोण जाणे पीत होते. हातवाऱ्यानेच त्यांनी मला बसवून घेतले. खलास ! सगळे खलास ! एवढे एकच पालुपद अतिशय विषण्णतेने ते घोळवीत होते, पीत होते आणि तडफडत होते. आता कशाला काम करता ? मराठा कशाला ? काय उरले आहे ? असे ते पुन्हा पुन्हा विचारीत होते. नजरेत घायाळ भाव होता. मुद्रेवरच्या नशेतही वेदना होती. एरवी वजनदार वाटणाऱ्या देहाचे पोते बनले होते. मध्येच ते टेबलावर डोके टेकून पडत. मग म्हणत, काही तरी सांगा. गप्प काय बसलात ? आता करायला काय राहिले ? काही नाही. पेपर बंद करू या आता. सगळे घरी जा. व्हॉटस् देअर ? व्हॉटस् देअर टु फाइट फॉर ? काही नाही...... नथिंग......

मी काहीतरी सबब सांगून खाली आलो. माझ्या जागी जाऊन बसलेला उपसंपादकही नंतर खाली आला. खाली फोन येत होते. पुण्याच्या निवडणुकीचे काय झाले ? आचार्य अत्रे निवडून आले काय ? आचार्य अत्रे पडले काय ? आम्हीच उत्तरे देत होतो. पण सुमारे दोड तासाने अत्रे डचमळत खाली आले. टेलिफोनशीच बसले. आमच्या पोटात गोळा उठला. त्यांनी टेलिफोन घेतला तर त्यांना नको तेच ऐकावे लागणार ! तेवढ्यात फोन घणाणला. त्यांनी घेतला. होय, अत्रे पडले. पडले–ऐकू येत नाही काय ? मी अत्रेच बोलतोय. आमचा पराभव झाला. सपशेल !

पुन्हा नवा फोन. आणखी नवा. एकापाठोपाठ फोन्स आणि ती एकच चौकशी. आचार्य अत्रे स्वतः सगळे फोन्स घेत होते. उत्तरे देत होते. आम्ही पडलो. अत्रे पडले. दणदणीत पडले. कसे पडले ? काही माहीत नाही. सपशेल पराभव झाला. होय. अहो 'खरे काय' काय विचारता ? मी अत्रे बोलतोय. सपशेल पराभव झाला आमचा. सर्वांना ओरडून सांगा......

फोन्समध्ये बोलून, आधीच बसू लागलेला त्यांचा आवाज पार घोगरा झाला. तरी एका चिडीने प्रत्येक फोनला ते स्वतः उत्तर देत होते. स्वतःचा पराभव स्वतः

हट्टाने जग जाहीर करीत होते. तडफडत होते, चिडत होते, विकल होत होते. आणि कोणीही त्यांना, स्वतःलाच रक्तबंबाळ करून घेण्याच्या त्या कृतीपासून परावृत्त करू धजत नव्हते. मग केव्हातरी तेच उठून कसेबसे वर गेले आणि नव्याने पिऊ लागले.

त्याच दिवशी त्यांच्या दादरच्या विधिमंडळ निवडणुकीची मतमोजणी सुरू झाली. त्या निवडणुकीत डॉ. नरवणे यांच्याविरुद्ध ते जिंकण्याची शक्यता त्यांच्या गोटात गृहीत धरली जात होती. परंतु त्यांना त्यात मुळीच रस उरला नव्हता. त्यातही आपण पडणार, असे त्यांनीच टेलिफोनवरून कित्येकांना सांगून टाकले होते. त्या रात्री ते या निवडणुकीत अल्प मतांनी जिंकले पण त्यांना त्याचा आनंद वाटू शकला नाही. पुण्याच्या पराभवाची वेदना याहून कितीतरी मोठी होती, असह्य होती, खोल आणि वर्मी झोंबलेली होती.

माझ्या दृष्टीने येथून त्यांचा राजकारणातला रस कमी होऊ लागला. त्यांचे संवेदनाक्षम मन त्याबाहेर वाट शोधू लागले. त्यानंतरही दीर्घ काळ त्यांनी राजकारण केले, लिहिले पण त्यापूर्वी जसे त्यांचे सर्वस्व त्यात गुंतलेले दिसे तसे नंतर



ते दिसेनासे झाले. मराठाच्या परिसरातही ते इतर विषय आवर्जून काढू लागले. ग्रंथांचे वाचन ध्यासाने करू लागले, साहित्यजीवनातल्या आठवणी कचेरीत उपसंपादकांना सांगताना रंगू लागले, महाराष्ट्राच्या राजकारणाबाहेरचे जग उत्सुकतेनें पाहू लागले, त्याची चौकशी करू लागले. राजकारण त्यांना थोडे तरी विसरण्याची इच्छा आहे असे आता वाटे. कधी कधी स्वपक्षीय राजकारणी मंडळींचीही ते नकलासह टवाळी करीत. खुद्द आपल्या पुढारीपणाकडे विनोदाने पाहत. एकदा एका प्रचारफेरीहून आले. कोणीतरी विचारले, गर्दी खूप होती ना? पन्नास लाख! —उत्तर आले आणि पुढे म्हणाले, आम्ही असे पुढे आणि मागून गल्लीतली पाचपंचवीस पोरेटोरे—बस्स! पुढे आम्ही बोंबलत होतो आणि मागे ती नाचत होती. त्यातला कोणीतरी जाड्या जाड्या म्हणत होता. मग त्यांना 'ए, चूप' करायचे की पुन्हा प्रचार चालू. की पुन्हा काटर्यांचा दंगा चालू! काही विचारू नका. कसली समिती नि कसला प्रचार......

याच काळात ठाण्याच्या नगरपालिका निवडणुकीत समितीचा नगराध्यक्ष निवडून आला. त्याबद्दल सत्कार सभा जाहीर झाली. 'एस. एम. जोशी यांना जोड्याने मारले पाहिजे' या मराठाच्या एका अंकावरील खळबळजनक ढळढळीत शीर्षकापासून प्रजासमाजवादी दुखावलेले होते आणि ठाण्यात त्यांचे बळ बऱ्यापैकी होते. ही सभा उधळण्याचा प्रयत्न होणार अशा वावड्या उठल्या होत्या. अत्र्यांनी या सभेचे अध्यक्षपद स्वीकारले होते. ठरल्याप्रमाणे ते ठाण्यात आले. स्टेशनपासून बँड लावून त्यांची वरात काढण्यात आली. सभेच्या जागी मोठा जनसम्मर्द जमलेला होता. त्याला बँड सकट एक फेरी मारून या जमावातूनच अत्रे व्यासपीठाकडे गेले. अशा वेळी त्यांचा अवतार वक्त्यासारखा नव्हे, तर कुस्तीच्या उस्तादासारखा असे. तसेच ते चालत. तसे जमावाला उद्देशून हात वर करीत. त्यांचा जयकार झाला. व्यासपीठावर ते बसले. आणि त्यांनाच मानपत्र अर्पण करण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. मानपत्राचे ठरीव कंटाळवाणे प्रदीर्घ वाचन सुरू झाले. जमाव कंटाळला. अत्रेही कंटाळलेले उघड उघड दिसत होते. मानपत्राचे वाचन संपताच मानपत्राला आचार्य अत्रे आता उत्तर देतील असे सांगण्यात आले. उत्सुकतेने गर्दी अत्र्यांच्या ठरीव मैदानी, आक्रमक, खुसखुशीत, हिंस्र वक्तृत्वासाठी कान टवकारून बसली. अत्रे उभे राहिले आणि मानपत्राला उत्तर म्हणून त्यांनी त्यांच्या आयुष्यातले एक अतिशय नम्र निरुपद्रवी, धीरगंभीर, राजकारणाविषयी, राजकीय पक्षांविषयी वा व्यक्तीविषयी ब्रही न काढणारे, तत्त्वचिंतनाचा स्पर्श असलेले अतिशय कृतज्ञ भाषण केले. सुमारे वीस एक मिनिटे हे असले विशुद्ध 'शाकाहारी' भाषण अस्खलितपणे करून ते खाली बसले तेव्हा जनसर्म्मदाची निराशा प्रचंड होती उघडउघड ती व्यक्त होत होती. अत्र्यांना नावे ठेवीत लोक पांगू आणि परतु लागले. अत्र्यांकडून असल्या सात्विक, शुचिर्भूत, अंतर्मुख, प्रकट चिंतनाची

अपेक्षाच कोणी तेव्हा करीत नव्हते. अत्र्यांची हिंस्र, जंगली, ज्वलंत, खुनशी प्रतिमाच त्यांना प्रिय होती.

पहिली सभा संपल्याचे जाहीर झाले आणि पाचेक मिनिटात 'नगराध्यक्ष—सत्काराची' दुसरी सभा त्याच जागी सुरू होत असल्याचे जाहीर करण्यात येऊन आचार्य अत्रे पुन्हा भाषणाला उभे राहिले. किंचित्कालापूर्वीचेच नम्र, निरुपद्रवी, तत्त्वचिंतक, कृतज्ञ, धीरगंभीर अत्रे अद्याप त्या सभास्थानाच्या वातावरणातून पुरते निवळलेही नसतील तो उग्र, बलदंड, आक्रमक अत्रे आसुरी अवसान घेऊन उभे राहिले आणि त्यांनी प्रजासमाजवादी पक्ष, त्याचे नेते, त्यांची साधनशुचिता, त्यांचे राजकारण यांच्या चिंधड्या चिंधड्या उडविणारे एक भयंकर निर्घृण आणि प्रसंगी असभ्य, असंस्कृत, बीभत्स असे भाषण दीर्घकाळ केले. टाळ्यांवर टाळ्या पडत होत्या. मुले, स्त्रिया एकाग्रतेने ऐकत होत्या. जमाव खूष होता. नंतर श्रोते तृप्त कानांनी घरोघर गेले.

माझ्या परिचयाच्या अत्र्यांचे जनसम्मर्दात बसून अगदी अल्पावधीत दिसलेले हे दोन परस्परविरुद्ध अवतार पाहून मी चकित होतो आणि अस्वस्थ होतो. यातला कुठला खरा ? कुठला उपरा आणि प्रसंगोपात धारण केलेला ? की दोन्ही खोटे ? की दोन्ही खरे ? आणि मीच पाहिलेल्या या माणसाच्या इतर चित्रांचे काय ? त्यात ही दोन चित्रे कुठे आणि कशी बसतात ? जवळून दिसणारे अत्रे आणि हे लांबचे अत्रे यांची सांगड कशी घालता येते ?

येथवर अत्र्यांची प्रत्यक्ष स्तुती मी कटाक्षाने टाळली होती. ती खुषमस्करी ठरेल ही भीती मला होती आणि मला तसल्या लाचार पलटणीत जमा होण्याची इच्छा नव्हती. हे न करता होईल तेवढीच आपली 'मराठा'तील नोकरी असे आरंभीच मी मनाशी ठरवून ठेवले होते आणि योगायोग असा की या दृष्टीने एकही लहान मोठा अनवस्था प्रसंग माझ्यावर आलेला नव्हता. पुढे माझ्या असे लक्षात आले की अत्र्यांनीच तो येऊ दिलेला नव्हता.

'मराठा'त मी असताना 'नवयुग' साप्ताहिक चालू होते. त्यात मी एक पान लिही. नाटके आणि चित्रपट याविषयीच ते प्रामुख्याने असे. माझ्यावर कोणतेही बंधन नव्हते. एकदा एक नाटककर्तीने मला आपल्या नाटकाला बोलावले. मी त्या नाटकावर 'नवयुग'मध्ये लिहावे अशी तिची इच्छा होती. ही नाटककर्ती अत्र्यांच्या मोठ्या परिवारातील होती. मला वाटेल तेच मी लिहीन या अटीवर मी नाटकाला गेलो. नाटकाविषयी नवयुगसाठी सविस्तर परीक्षण लिहिले. नाटक मला पटलेले नव्हते. माझा मजकूर छापला जाण्याआधीच माझ्या अपरोक्ष येऊन नाटककर्त्या बाईंनी वाचला आणि त्यांना तो आवडला नाही. त्या अत्र्यांना भेटून रडल्या. नाटक अत्र्यांनीही अर्धवट पाहिलेले होते. माझे परीक्षण त्यांनी मागवून घेतले. ते वाचून ते म्हणाले की हे तर काहीच नाही. तुझे नाटक याहून भिकार आहे !

पण मी लिहिलेला मजकूर त्यांनी रद्द केला आणि नवा स्तुतिपर मजकूर कोणाला तरी लिहिण्याला सांगून तो 'नवयुग'मध्ये प्रसिद्ध होण्याची व्यवस्था केली. तो मजकूर छापूनही आला. पुढील अंकापासून मी 'नवयुग'मध्ये लिहिणे थांबवले. त्यानंतर काही आठवडे गेले. अत्र्यांनी परस्पर इतरांकडे मी लिहीत नाही याचा उल्लेख केला. का कोण जाणे असेही ते म्हणाले. माणूस चमत्कारिक आहे असाही एक शेरा याच संबंधात त्यांनी मारल्याचे माझ्या कानी आले. 'मराठा'च्या कामानिमित्ताने मी रोज अत्र्यांना भेटत होतो पण विस्मरणाने वा दुसऱ्या काही कारणाने मला विचारणे त्यांना जमत नव्हते. एक दिवशी जरा रागातच त्यांनी कुणाला तरी या संबंधात ऐकवले. त्यांना उत्तर मिळाले की तेंडुलकर आता खाली आहेत. त्यांनाच का विचारीत नाही ? त्याच झटक्यात मला बोलावणे आले. मी वर खोलीत गेलो. ते मला काय विचारणार असावेत याचा अंदाज मी त्यांना पाहताच केला. त्यावरचे माझे उत्तरही तयार होते. त्यांनी माझ्याकडे एकदा रागाने पाहिले आणि टेबलावरच्या कागदांची उलथापालथ केली. 'कोण टेबलावर सगळे उलट-सुलट करून ठेवते कळत नाही' असे काही ते कुरकुरले. मग पुन्हा माझ्याकडे पाहिले. नजरेतली नाराजी स्पष्ट होती. आणि फाडदिशी त्यांनी विचारले, 'मराठा'त ते मी अमूक तमूक यायला पाहिजे असे म्हटले होते, त्याचे पुढे काय झाले ? मी या प्रश्नाचे योग्य ते उत्तर शांतपणे दिले. परंतु त्यांना हे विचारायचे नाही हे मला स्पष्टपणे कळत होते. पुन्हा मी उत्तर तयार ठेवून त्यांच्या मनातल्या प्रश्नाची वाट पाहू लागलो, नवयुगमध्ये तुम्ही अलीकडे का लिहीत नाही ? पण त्यांनी बरे आहे, जा तुम्ही असे म्हणून माझी सरळ पाठवणी केली आणि समोरच्या कागदात डोके खुपसले.

कधीही तो प्रश्न मला त्यांनी विचारला नाही परंतु 'नवयुग'मध्ये मी लिहावे असे त्यांना वाटे आणि ती खंत ते इतरत्र व्यक्त करीत.

माझे 'मी जिंकलो, मी हरलो' नाटक मुंबईत लागले होते. हे नाटक अत्र्यांना मानवणार नाही असे गृहीत धरून मी त्यांना औपचारिक आमंत्रण देण्याच्याही भानगडीत पडलो नव्हतो, मग आवर्जून बोलावणे दूरच राहिले. तेच एक दिवशी कामानिमित्ताने मी गेलो असता म्हणाले, तुमचे नाटक मला पाहायचे आहे. मी व्यवस्था केली. मी स्वत: त्या खेळाला हजर होतो. सकाळच्या त्या खेळाला जरा उशीराच अत्रे आधी सांगितल्यापेक्षा मोठा परिवार घेऊन आले. खेळ चालू झाला होता. जास्त खुर्च्या पहिल्या रांगेत मी राखून ठेवल्या नव्हत्या. तसेच मी सर्वांना आत नेले. अत्र्यांनी पहिल्या रांगेत खुद्द त्यांच्यासाठी ठेवलेल्या दोन खुर्च्यांवर मुलीला आणि जावयाला बसविले. पत्नीला आणि इतर मंडळींना दुसऱ्या तिसऱ्या रांगेतल्या राखीव खुर्च्यांवर बसविले. ते स्वत: उरले. चौथ्या की पाचव्या रांगेत अगदी कडेच्या एका रिकाम्या खुर्चीत ते बसले. मला ते पाहावले नाही.


त्यांनाही ते कमीपणाचे वाटणारेच होते. मी म्हटले, आपण मागे का बसता ? पण त्यांनी लक्ष दिले नाही.

पहिला अंक संपेपर्यंत पहिल्या रांगेत आणखी दोन आसनांची व्यवस्था मी खटपटीने, धावपळ करून केली आणि अंक संपताच आत घुसून अत्र्यांना गाठून म्हटले, आपल्यासाठी पुढे व्यवस्था केली आहे. चला.

ते म्हणाले, तुमचा आग्रह का ? मी इथे अगदी कम्फर्टेबल आहे. नाटक छान चालले आहे. तुम्ही जा. मी इथूनच पहातो.

आणि त्या मागल्या, बाजूच्या खुर्चीतून त्यांनी माझे नाटक पाहिले. दुसऱ्या दिवशी नाटकावर अग्रलेख आला. त्यात माझी भरभरून स्तुति होती. इतकी की मीही ती वाचून संकोचलो.

त्यानंतर त्यांनी नाटकाचे पुस्तक माझ्याकडून मागून घेतले. त्याबद्दल माझ्याशी उत्साहाने चर्चा केली. पुन्हा एकवार स्वतःच्या इच्छेने त्या नाटकाला येऊन नटांचे भरपूर कौतुक केले. आणि तेव्हापासूनच माझ्याबाबतीत त्यांच्या वागण्यात एक सुस्पष्ट बदल झाला. त्यांचा नोकर म्हणून त्यांनी नंतर मला वागवले नाही. मीहि वेगळ्या नात्याने वागावे, बोलावे अशी त्यांची इच्छा असे. परतु मला ते जमत नसे. माझ्या दृष्टीने मी त्यांचा नोकरच होतो आणि त्यांच्या दृष्टीने मी त्यांचा तरुण मित्र म्हणून त्यांना हवा होतो. त्यांच्या बैठकीत मी अधिकाधिक येणे त्यांना हवे होते आणि मी ते कचेरीच्या शिस्तीसाठी टाळीत असे. त्यांच्या अधिक जवळ जाण्याचे भयही वाटे. मला त्यांचा पुरेसा थांग लागला आहे असा आत्मविश्वास मला वाटत नव्हता आणि याशिवाय एकादे व्यक्तिगत नाते जुळते वा टिकते हे मला पटत नव्हते. त्यांचा एक प्रकारचा धाक



मी मनाच्या कोपऱ्यात बाळगून त्यांना मंत्रमुग्धपणे एका अंतरावरून न्याहाळीत होतो.

पानशेतच्या पुराची वार्ता 'मराठा' कचेरीत प्रथम धडकली तेव्हा मी होतो. ती सकाळची वेळ होती. लकडी पुलाच्या सहा फूट वरून पाण्याचा लोंढा आला हे ट्रंककॉलवर 'मराठा'च्या पुण्याच्या प्रतिनिधीनें सांगताच प्रथम सर्वांना, सवयीने आमचा प्रतिनिधी अत्र्यांच्या 'मराठा'ची हातखंडा अतिशयोक्ती करतो आहे असेच वाटले. नंतर अत्र्यांना ही बातमी कळविताच ते बसल्या जागी बधिर आणि निःशब्द झाले. पांढरेफटक पडले आणि नंतर त्याचदिवशी, पूरग्रस्त पुण्याकडे धाव घेण्याऐवजी ते नागपूरला निघून गेले. पुण्याच्या विध्वंसाच्या कल्पननेही त्यांचे सारे अवसान गळावे इतके पुण्यात त्यांच्या पूर्वायुष्याचे धागे गुंतले होते. एरवी विध्वंस पाहू शकणाऱ्या, प्रसंगी तो करू शकणाऱ्या अत्र्यांची जी मोजकीच मर्मस्थाने होती त्यातील पुणे हे एक होते. दुसरे त्यांची कन्या शिरीष हे होते. या दोन बाबतीत त्यांना हळवे, दुबळे झालेले, असहाय्य होऊन तडफडत असलेले मी पाहिले आहेत. 'मराठा'च्या जुन्या फायली चाळताना, सत्ताधाऱ्यांविरुद्ध थरकाप उडविणाऱ्या झुंजी बेबंदपणे घेणारे मला जाणवलेले अत्रे, स्वतःच्याच काही कारणांनी कोणा-कोणावर अक्राळविक्राळपणे, क्वचित गलिच्छपणे चालून जाणारे अनेकांना जाणवणारे अत्रे आणि हे घायाळ अत्रे यातली तफावत एका वेळी जाणीवेत ठसू न शकण्याइतकी अफाट होती तरीही खरी होती. तसेच बाबू ड्रायव्हरचा मृत्यू घडला त्या दिवशी त्याच्या निमित्ताने स्वतःच्या दुरावलेल्या एका आयुष्यासाठी घळघळा रडणारे अत्रे आणि स्वतःच्याच गतायुष्यातील खुसखुशीत प्रसंग (यात स्वतःच्या फजितीचे अनेक असत.) रंगवून रंगवून सांगून पोटभर हसणारे आणि हसविणारे अत्रे हीही दोन चित्रे एकमेकांशी एका जुळ्या नात्याने निगडित आहेत असे वाटे. एस. एम. जोशी यांना जोड्याने मारले पाहिजे असे शीर्षक 'मराठा'च्या शिरोभागी छापण्यासाठी अत्र्यांनी लिहून खाली पाठविले ती रात्र आठवते. त्यांच्या टपोऱ्या अक्षरातील ते भयंकर शीर्षक वाचून कचेरीतील एकूणएकांच्या डोळ्यांवरील झापड उडाली. तोंडचे पाणी पळाले आणि सगळे हडबडून गेले. एस. एम. हे समितीतील एक अध्वर्यू आणि शिवाय निरलस, सज्जन नेते म्हणून ख्यातनाम. त्यांची ही नियोजित संभावना 'साहेबां'नी शुद्धीत केलेली असणे शक्यच नाही अशी प्रत्येकाची मनोमन खात्री होती. शिवाय याचे परिणाम समितीवर आणि 'मराठा'वर कोणते होतील त्याच्या कल्पनेने सगळेच पुरते गडबडले. परंतु 'साहेबां'ना सांगावे कुणी? एवढ्यात खुद्द 'साहेब'च आले. ते पूर्ण शुद्धीत होते. शीर्षक असलेले छपाईसाठी तयार असलेले पान त्यांनी मागून घेतले. ते नीट बघितले. कुजबुजल्या स्वरात कोणीतरी धीर करून तेवढ्यात स्वतःशीच म्हणावे तसे म्हटले, शीर्षक जरा जहालच वाटते...

त्याची प्रतिक्रिया... दुसरे कोणीतरी इतकेच म्हणून घुटमळले.

मला वाटते बदलावे... तिसरा एक धाडस करून अस्पष्ट पुटपुटला.

आचार्य अत्रे ते अपूर्व आणि सरळ सरळ मवाली वृत्तीचे शीर्षक शिरोभागी टाकलेले 'मराठा'च्या दर्शनी पानाचे मुद्रित समोर धरून शांतपणे उभे होते.

असेच जाऊ द्या – ते पुढल्या क्षणी म्हणाले. पूर्ण विचार करूनच आम्ही ते दिले आहे.

आणि मुद्रित उपसंपादकाहाती देऊन ते संथपणे निघून गेले. त्या शीर्षकाने उडविलेली दरोबस्त खळबळ आणि निर्माण केलेला संताप त्यांनी याच अविचल-पणे अंगावर घेतला.

ते शीर्षक त्यांनी नेमक्या कोणत्या कारणाने दिले ते कळले नाही; परंतु सर्व-साधारणतः अविचारी आणि बेछूट मानली जाणारी त्यांची एखादी कृती कधी कधी इतकी योजनाबद्ध असते या धक्क्यातून सावरण्याला मला जरा अवधी लागला. हे अत्रे आणखीच वेगळे आणि नवे होते.


याउलट त्यांचे एक बालिश, विलोभनीय रूप होते. त्यांच्या महाकाय व्यक्ति-मत्त्वामुळे ते आणखीच विलोभनीय ठरे. ते इंग्लंडहून एकदा आले तेव्हा आपल्या बरोबर त्यांनी बरीच पुस्तके खरेदी करून आणली. कचेरीत टेबलावर त्यांचा ढीग रचला. येईल त्याला ती पुस्तके दाखवून ते म्हणत होते, बघा! एवढी सगळी इंग्लंडहून आणली. एकेक पुस्तक म्हणजे विचारूच नका. फार महाग! पण सुंदर आहेत. नाटके आहेत, चरित्रे आहेत, पत्रव्यवसायावर आहेत, सगळे आहे. यातले हवे ते न्या. पण परत करा.

दोनप्रहरपर्यंत त्या ढिगातली निम्मी पुस्तके कमी झाली. केव्हातरी त्यांच्या लक्षात आले की ढीग सकाळइतका नाही. तेव्हा त्यांनी चौकशीला सुरुवात केली. कचेरीत ज्याला त्याला ते विचारीत, माझ्या टेबलावरची पुस्तके इतकी कमी कशी झाली? कोणी सांगू शकेना. कोणी म्हणाले, तुम्हीच तर अमुकतमूकांना सांगत होतात, हवे तर न्या म्हणून. पण त्याने इतकी पुस्तके कमी कशी होतील? –'साहेबां'चा प्रश्न. सकाळी हा ऽ एवढा ढीग होता आणि आता पहावे तर इतकाच!

पुस्तके कचेरीत तर कोणी घेतलेली नाहीत असे सांगूनही त्यांची समजूत पटेना. दर वेळी सकाळी हा ऽ एवढा ढीग होता म्हणताना त्यांचा हात आणखी आणखीच उंच होत होता आणि टेबलावरचा शिल्लक ढीग त्यांना फारच क्षुद्र, नगण्य वाटत होता. संध्याकाळी कामासाठी मी खोलीत गेलो तेव्हा ते यांत्रिकपणे कसलातरी मजकूर लिहित बसले होते. मला पाहून वैतागल्या स्वरात म्हणाले, काय करायचे? आपल्या कचेरीत कोणीच प्रामाणिक नाही! एकजात सगळे डांबिस आहेत.

हसू लपवीत मी विचारले, काय झाले?

उद्रेक व्हावा तसे, स्वतःच्या डोक्यापेक्षाही उंच हात करून ते म्हणाले, सकाळी हा ऽऽ एवढा ढीग होता. चांगला इतका तरी नक्कीच. आता कुठे आहे ? गेला ! सगळा ढीग गेला. ही एवढीच आहेत. इंग्लंडहून आणलेली माझी सगळी पुस्तके चोरली ! आणि सर्वस्व गमावल्यासारखा चेहरा करून ते हैराण बसून राहिले. किंचित्काळ असे बसून एकदम बदललेल्या उत्तेजित स्वरात मला म्हणाले, यावरून तुम्हाला एक गोष्ट सांगतो. बसा. आणि एका आयरिश पुस्तक चोराची कुठेतरी वाचलेली चित्तवेधक हकीकत त्यांनी अतिशय खुलवून सांगण्याला सुरुवात केली. त्यात ते स्वतःही पाहता पाहता खुलले. मूळचा 'मूड' कुठल्या कुठे गेला. वेळ कसा गेला, कळले नाही. मग म्हणाले, जा आता. हा मजकूर लिहिला पाहिजे. आणि एका खुषीत नाइलाजाने कामाला लागले.



चौथी सचित्र आवृत्ती

□□

राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन

माझी 'मराठा'तील तीन वर्षे अशी झरझर गेली.

मी राजीनामा घेऊन त्यांच्याकडे गेलो तेव्हा ते 'कऱ्हेचे पाणी'चा मजकूर आपल्या खोलीत एकटेच टेबलाशी बसून लिहित होते.

काय आहे ? —त्यांनी व्यग्र सुरात विचारले.

मी राजीनामा हाती दिला.

ठीक आहे, असू द्या. त्यांनी तो टेबलावर बाजूला न वाचता ठेवून दिला आणि पुन्हा ते लिहू लागले.

मी घुटमळलो.

बघतो नंतर. ते कामाविषयी एरवी सांगत तसे म्हणाले.

धीर करून मी म्हटले, तो राजीनामा आहे. मी नोकरी सोडतो आहे.

काय ! —ते माझ्याकडे त्यांच्या त्या विशिष्ट मूढ नजरेने चष्म्यावाटे पाहत राहिले.

मी पुढे म्हणालो, इथे माझे सगळे ठीक चालले होते. माझी काही तक्रार नाही पण नोकरीचाच कंटाळा आल्यामुळे नोकरीशिवाय जगण्याचा प्रयत्न करण्याची मला इच्छा झाली आहे. म्हणून मी जातो आहे.

ते तसेच माझ्याकडे पाहत होते. मग नाकावरचा चष्मा त्यांनी वर खाली केला आणि एकदम स्फोट व्हावा तसे ते ओरडले, महामूर्ख आहात !

मी जरा दम खाऊन म्हणालो, होय. पण तरी डोक्यात किडा आला आहे तर एकदा नोकरीशिवाय राहून बघण्याची इच्छा आहे.

जा. तुमची मर्जी. दुसरे काय. असे पुटपुटून ते पुन्हा लिहू लागले.

मी हळूच बाहेर सटकलो.

निरोपाच्या दिवशी मी गेलो तेव्हा ते केबिनमधल्या सोफावर शर्ट वर करून आडवे झोपले होते आणि डॉक्टर त्यांची प्रकृती तपासत होते. याला वेळ लागणार हे हेरून समोर उभे राहून मी म्हटले, मी निघतो आहे.

निघा की. माझे काही काम नाही. आडव्या स्थितीत आचार्यांचा जबाब.

माझ्या लक्षात पुन्हा गोंधळ आला आणि मी म्हणालो, मी उद्या येणार नाही. मी नोकरी सोडली आहे, म्हणून आपला निरोप घेण्यासाठी आलो आहे.

तीच मूढ नजर माझ्यावर किंचित्काळ रेंगाळली. शर्ट खाली करून आचार्य अत्रे उठून बसले. माझ्याकडे पाहत डॉक्टरांना म्हणाले, आमच्याशी भांडून पुष्कळ लोक गेले, पण न भांडता आमच्याकडून चाललेला हा पहिला माणूस !

मला अजूनही माझे हे वर्णन आवडते. अजूनही 'मराठा'च्या निमित्ताने या विलक्षण व्यक्तिमत्त्वाच्या सहवासात घालविलेले दिवस आठवावेसे वाटतात. आजही तोच जुना चाळा : हा माणूस होता तरी कसा, किती आणि कुठवर ?

आजही पत्ता लागत नाही. ■■

२८ जून १९६९



# फडके, खांडेकर आणि....

श्री. ज. जोशी

काही घरगुती कामाकरिता रविवार दि. १५ ला सकाळी मी कोल्हापूरला निघालो. माझ्या हातात त्या दिवशीची सर्व वर्तमानपत्रे होती. नेहमीच्या सकाळ-वर त्या दिवशी भागणारे नव्हते. पुण्या-मुंबईची बहुतेक सर्व वर्तमानपत्रे मी मुद्दाम विकत घेतली. मनात उदास विचार दाटले होते. काहीतरी हरवल्यासारखे वाटत होते. एक फार मोठी पोकळी जीवनात उत्पन्न झाली आहे, याची जाणीव होत होती. एस्. टी. ची गाडी पुढे

जात होती. मला मात्र कसल्या कसल्या आठवणी येत होत्या. गेल्या पंचवीस-तीस वर्षातल्या अनेक स्मृति सजग झाल्या होत्या...प्रेक्षकांनी तुडुंब भरलेल्या सभा... हशा आणि टाळयांचा कडकडाट... ज्ञानप्रकाशापासून ते दैनिक मराठचापर्यंत गाजलेले अनेक लेख...विजयानंद नाटचगृहात 'बालमोहन'ची चवीने पाहिलेली नाटके...लग्नाची बेडी...उद्याचा संसार...साष्टांग नमस्कार! गाडी चालली होती पण मला पुण्यातली नाटचगृहे आणि सभांचे अड्डे दिसत होते. 'लग्नाच्या बेडी'च्या वेळी अवधूतच्या कामावर खदखदून हसलेला मी, मला स्वतःच दिसत होतो...साष्टांग नमस्कारमधील 'चिचेवर चंदु चढला' हे पद आठवले...क्षणार्धात डोळयांपुढची थिएटरे वितळली आणि त्यांच्या जागी शनिवारवाडचाचे पटांगण... गोखले सभागृह...शिवाजी आखाडचातील मोठचा सभा...साऱ्या दिसल्या...अत्रे-माटे वाद...काकासाहेब गाडगीळांच्या निवडणुकीतील विजयानंतर मंडईसमोर भरलेली प्रचंड सभा...व्यासपीठाच्या खाली ओळीने लावलेले हजारो पुष्पहार... एस्. पी. कॉलेजमधील सभा...'मला मारणारे मेले पण मी अमर आहे'...अरे बापरे! जुन्या काळातलं सगळं पुणंच आठवत आहे. रत्नाकर मासिक...यशवंत... पुणेरे टांगेवाला...जांबुवंत दंतमंजन...

'सुंदरी सुरेख किती तव दात
मोजुन घ्यावे बत्तीस त्यातून
एक उणा नच त्यात
शंख, शिंपले आणिक कवडचा
फोडिशी तू निमिषात'

गाडी चाललीच होती. हातात पेपर धरून मी इतका वेळ नुसताच बसलो होतो. भूतकाळातून मन खेचून वर्तमानकाळात आणले. दृष्टी मथळयांवर गेली. जिकडे तिकडे आचार्य अत्रे दिसत होते. हजारो-लाखो लोकांनी मुंबईत वाहिलेली श्रद्धांजली चित्ररूपांनी दिसत होती. निरनिराळया लोकांनी काढलेले दुःखोद्गार ऐकू येत होते. एस. एम. म्हणाले होते, 'लोकमान्य टिळकांनंतर इतकी मोठी प्रेत-यात्रा मुंबईत निघाली नसेल.' लोकमान्य टिळक आणि आचार्य अत्रे! दोघात काही साम्य? एक जीवन चंदनासारखे झिजून गेले. त्यांची मुद्रा नेहमी गंभीर राहिली. दुसरे जीवन हसत आणि हसवीत गेले. जीवनातल्या सर्व उपभोगांना ते सामोरे गेले. दोघांवर महाराष्ट्राने केवढे प्रेम केले? गंमत आहे!

सातारला चहा प्यायला खाली उतरलो आणि मला आयुष्यातल्या योगायोगाची गंमत वाटली. दिनांक १२ ला संध्याकाळी मी आप्पासाहेब फडक्यांकडे सहज गेलो होतो. त्यांच्याकडे जाण्याचा परिपाठ माझा मुळीच नाही. मुंबईचे वसंत देशमुख माझ्याकडे आले होते; आणि त्यांच्या आग्रहाने मला आप्पासाहेबांकडे जावे लागले. आम्ही गेलो तेव्हा आप्पासाहेब दुसऱ्या मजल्यावर गच्चीत बसले होते. मध्यभागी

खुर्च्या होत्या. उजव्या हाताला गुलमोहराचे झाड होते. त्याची तांबडी चुटूक पाने लवलवत होती.

आम्ही नमस्कार केला आणि संकोचून मी नुसताच उभा राहिलो. माझ्याकडे पाहून आप्पासाहेब म्हणाले, ' बातमी कळली का ?'

मला काहीच कळले नाही.

त्यांनीच पुढे सांगितले, ' अत्रे गेले. मघाशीच फोन आला. '

माझे मानसिक विश्व एकदम हादरले. ' अत्रे गेले ! ' ...प्रथम आपण काय ऐकत आहोत, ते कळलेच नाही. मग पुढच्याच क्षणी सगळ्या जुन्या साहित्यिक आठवणी साकार झाल्या.

मी फडक्यांच्या डोळ्यात वाकून बघितले. ते फारच विमनस्क व दु:खी दिसत होते. गेल्या चाळीस-पन्नास वर्षांच्या साहित्य सेवेच्या स्मृती त्यांच्याही मनात उचंबळलेल्या असाव्यात.

त्यांना बोलके करण्याकरिता मी म्हटले, ' अत्रे गेले, ही फार वाईट गोष्ट झाली. महाराष्ट्रीय जीवनात एक फार मोठी पोकळी निर्माण झाली. '

त्यावर ते म्हणाले, ' बालगंधर्वांच्या मृत्युनंतर मराठी जीवनात जशी पोकळी निर्माण झाली तशीच पोकळी अत्रे यांच्या मृत्युने झाली आहे. '

माझ्या डोळ्यापुढे एका क्षणातच बालगंधर्वांची व आचार्यांची जीवने तरळली. एक जीवन जन्मभर स्त्री राहिले. पुरुष असून त्याने स्त्रीच्या रूपाने महाराष्ट्रीय मनावर अधिसत्ता गाजवली. ' खड्ग मारायचा झाला तर ' किंवा ' दादा ते आले ना ' या वाक्यांनी त्याने शृंगाराची कारंजी उडवली. ' चंद्र चवथीचा ! रामाच्या ग बागेमध्ये चाफा नवतीचा ' यासारख्या पदांनी वात्सल्य निर्माण केले. त्याने सिंधु होऊन महाराष्ट्राला ढसाढसा रडवले...दुसरे जीवन सारखे हसत आणि हसवतच राहिले. त्यात बायकीपणा नव्हता. ते मर्दासारखे ताठच राहिले. बालगंधर्व आणि आचार्य अत्रे ! दोन निरनिराळी जीवने. त्यांच्यात काही साम्य ? पण दोघांच्याही वियोगाने मराठी जीवनात पोकळी निर्माण झाली.

फडके मग पाच-दहा मिनिटे सारखे बोलत राहिले. वसंत व्याख्यान मालेच्या उद्घाटनाला अत्रे आले होते. तेव्हा ते मुद्दाम फडक्यांच्या घरी गेले होते. त्यांना म्हणाले होते तुमच्या घरी आल्याशिवाय मला बरच वाटत नाही. मध्यंतरी इतकी भांडणे होती पण सौ. कमलाबाईंवर ते मायाच करीत. त्यांना ते म्हणाले होते ' फडक्यांचे आणि माझे भांडण वर्तमानपत्रातलं आहे. पण तुमचं आणि माझं वितुष्ट असण्याच काहीच कारण नाही, मालवणच्या साहित्य संमेलनाच्या वेळी ते मुद्दाम कमलाबाईंशी खूप बोलले होते व किल्मिश काढून टाकण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता...फडके सांगत होते ' अत्रे यांनी स्वत:चे एक साम्राज्य निर्माण केले. सासवड येथील गरीब मुलाने आयुष्यात एवढा पराक्रम गाजवावा हे अपूर्व

आहे. मला आज फार धक्का बसला. आता ते साम्राज्य लयाला गेले आहे.'

फडके बोलत होते पण मला मात्र त्यांचे शब्द ऐकूही येत नव्हते. सात-आठ महिन्यांपूर्वीच बालगंधर्व रंगमंदिरात अत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त फडक्यांचे अध्यक्षीय भाषण झाले तो देखावा मला आठवला. एका व्यासपीठावर फडके, कमलाबाई, अत्रे, सुधाबाई अशी सर्व मंडळी बघण्याचा तो योग होता. पुण्यातल्या सुशिक्षितांनी सभागृह तुडुंब भरले होते. त्या दिवशी फडके म्हणाले होते, 'मी स्वत: वेळेला जपणारा माणूस आहे. घरातल्या टेबलाशी बसून मुळीचही वेळ न दवडता मी साहित्य निर्मिती जन्मभर केली. अत्रे यांनी वेळेची पर्वा कधी केलीच नाही. अनेक असाहित्यिक उद्योग केले. गप्पांमध्ये दिवसच्या दिवस घालवले. पण त्यांनी जी साहित्यनिर्मिती केली ती माझ्यापेक्षा कितीतरी वैचित्र्यपूर्ण आहे. अत्रे यांच्यासारखा साहित्यिक हजारो वर्षात होणार नाही.'

फडके काय बोलत होते याकडे माझे लक्षच नव्हते. ते फारसे बोलतही नसावेत. ते खरोखरीच फार दु:खी झाले असावेत. भारत गायन समाजात बालगंधर्वांच्या मृत्युबद्दल भाषण करताना फडके म्हणाले होते, 'ज्या जगात गंधर्व नाहीत त्या जगात जगण्यात मला मौज वाटत नाही.'

आम्ही तिथेही बसलो होतो. इतक्यात खालून कमलाबाई आल्या व त्यांनी सांगितले 'आताच फोन आला आहे, अत्रे गेलेले नाहीत, त्यांची प्रकृति मात्र फार गंभीर आहे. त्यांना बॉंबे हॉस्पिटलमध्ये हलवले आहे.'

तिथे असलेल्या सर्वांनीच निश्वास टाकला. 'अत्रे गेलेले नाहीत' या वाक्याने मनावर सुखद शिडकाव झाला.

मी आणि वसंतराव मग तिथून निघालो. जिना उतरताना सारखे वाटत होते गंधर्वांप्रमाणेच अत्र्यांबद्दलही फडक्यांच्या भावना असतील. 'ज्या जगात अत्रे नाहीत त्या जगात जगण्यात मौज नाही' असच फडक्यांना वाटेल.

मोटार चाललीच होती. कऱ्हाड गेले. गाडी पुढे चालली. मी सुन्न होऊन तसाच बसलो. कोल्हापुर आले. हातातले पेपर बॅगमध्ये टाकले. आणि अत्र्यांबद्दल फारसा विचार करायचा नाही असे मी ठरवले. दिवसभर मग कामातच गेला. मी काम करत होतो. पण मन आतल्या बाजूला कुठेतरी सठसत होते. बेचैनी आली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. अत्रे यांच्या मृत्युबद्दल गावात हरताळ असल्याचे कळले. कोल्हापुरात जो तो अत्र्यांबद्दलच बोलत होता. स्थानिक वर्तमानपत्रांचे अग्रलेख अत्र्यांबद्दलच्या स्तुति-स्तोत्रांनी भरभरून वाहत होते. मी त्या परक्या गावात उगीचच भुतासारखा हिंडत होतो. पुण्यात असतो तर अत्र्यांबद्दल एखाद्या साहित्यिक मित्राबरोबर खूप गप्पा मारल्या असत्या. मन मोकळे केले असते. पण कोल्हापुरात तसे कोणी नव्हते. काय करावं याचा विचार मनात चालला होता. कुठेतरी अत्र्यांबद्दल खूपस बोलाव आणि मन मोकळ कराव अस वाटत होत.

…मनात एकदम विचार आला … खांडेकरांकडे जावे व खूपस बोलावं. खांडेकरांची आणि माझी मुळीच ओळख नाही. त्यांच्याकडे जाव हा अगाऊपणा दिसेल अशी भिती वाटली. पण चमत्कारिक ओढ मनाला लागली होती. कुठेतरी मन मोकळ करायला हवच होत. काय वाटेल ते होवो, कोणी काहीही म्हणो पण खांडेकरांकडे जावे असे मनाने घेतले. आणि माझी पावलं मी राजारामपुरीकडे वळवली.

पाचव्या गल्लीला शेवटच्या टोकाला नन्दादीप नावाचा नव्या बांधणीचा ताजा-तवाना शुचिर्भूत दिसणारा बंगला दिसला. वर खांडेकरांच्या नावाची पाटी दिसली. छाती धडधडत होती, पण मी आत गेलो. भाऊसाहेबांची कृश रोगजर्जर मूर्ति बाहेर आली. मी नमस्कार केला व माझे नाव सांगितले.

त्यांनी स्नेहभावाने विचारले ' का आला होता ? '

माझे मन मी त्यांना सांगितले. फडके, खांडेकर आणि अत्रे या तिघांच्या वाङ्मयावर आमची पिढी पोसलेली आहे. अत्र्यांबद्दल फडक्यांशी बोलण्याची मला संधी मिळाली होती. आपण माझ्याशी त्या विषयावर बोलावं असं मी सुचवलं.

भाऊंनी मला बसायला सांगितलं. मी अधीरपणाने पुढे म्हणालो, ' मी तुम्हांला प्रश्न विचारतो, मुलाखतच घेतो असं म्हटलं तरी चालेल. '

खांडेकर हसले, ' मुलाखत घ्यायला हरकत नाही, पण विचारण्याजोगे प्रश्नच नाहीत. मी तुम्हांला काय सांगणार ?'

' गेली तीस-चाळीस वर्षे साहित्यिक म्हणून तुमचा एकमेकांशी संबंध आला असेल, त्याविषयीच विचारतो. '

' आमचा एकमेकांशी संबंध आला परंतु तसं फारसं सांगता येणार नाही. माझ्यात आणि त्यांच्यात, स्वभावात आणि मनोभूमिकेत फार मोठा फरक होता. त्यांना आत्मविश्वास जबरदस्त होता. मला मुळीच नव्हता. मी फार संकोची. पण त्यांचा स्वभाव प्रत्येकी बाबतीत भडक होता. माझ्या अंगात आत्मविश्वास नसल्याची एकच गोष्ट सांगतो. डॉ. भालेरावांची मी नाटक लिहावे अशी फार इच्छा होती. माझे नाटक मुंबई-मराठी नाट्यसंघाने केले असते. त्यांनी मला अनेक वेळा गळ घातली पण नाटक लिहिण्याचा मला धीर झाला नाही. याउलट अत्र्यांचे. निर-निराळ्या क्षेत्रात ते सहज उतरले. आणि सगळे मान-सन्मान त्यांनी खेचून आणले. त्यांचे आणि माझे वय जवळ जवळ एकच. मी नाट्यक्षेत्रात जायला ज्या दिवसात घाबरत होतो त्याच दिवसात स्वतःची नाटके गाजवून त्यांनी ते क्षेत्र सोडलेही होते. '

' हे खरे आहे, पण त्यांनी तुमच्यावर कधीही टीका केलेली मला आठवत नाही. इतर कित्येकांना त्यांनी आपल्या लेखणीने धोपटून काढले पण तुम्हांला मात्र मोकळे सोडले. '

'मला अगदीच मोकळे सोडले असे नाही. दोन-तीन वेळी त्यांनी माझ्यावर टीका केलीच. १९५२–५३ साली अत्रे–फडके वाद फार जोरात होता. वसईला एका व्याख्यानाच्या वेळी लोकांनी मला प्रश्न केला, 'अत्रे आणि फडके इतके का भांडतात ?' त्या भांडणात मला पडायचं नव्हतं. विषयाला बगल देण्यासाठी मी सांगितले, 'अत्रे आणि फडके हे फार थोर आहेत, या विषयात मी काय सांगणार.' पण एवढेदेखील अत्र्यांना खपलं नाही. त्यांनी लगेच दुसऱ्या दिवशी लिहिलं, 'अत्रे–फडके थोर आहेत मग खांडेकर काय पोर ?' पुढे एकदा डोंबीवलीला उपनगर साहित्य संमेलन झाले होते. तेव्हा मी अध्यक्षपदातून निवृत्तीची भाषा काढली होती. त्या वेळीही त्यांनी माझ्यावर टीका केली. भाऊ हसले व म्हणाले, 'त्यांच्या टीकेचे आणि स्तुतीचे सर्वच विलक्षण होते. १९६१ साली मला ययाति कादंबरीबद्दल बक्षीस मिळाले तेव्हा साहित्य संघात अत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माझा सत्कार झाला. त्यांचे भाषण जवळ जवळ तासभर झाले. त्यात बहुतेक सर्व फडक्यांनाच शिव्या होत्या. मी माझ्या आभाराच्या भाषणात सांगितले, 'आज अत्र्यांचे फडक्यांवर व्याख्यान होते का खांडेकरांवर होते हेच मला समजले नाही.' त्या वेळी ते थोडेसे चिडले होते. परंतु दुसऱ्या दिवशी त्यांनी शिवशक्तीवर एक खाजगी समारंभ करून माझा सत्कार केला. त्यावेळी बाबुराव पेंढारकर वगैरे मंडळी हजर होती. आम्ही खूप खेळीमेळीने बोललो. त्याचा वृत्तांत वर्तमानपत्रात येण्याची काहीही जरूरी नव्हती. परंतु दुसऱ्या दिवशी सकाळी मी मराठा उघडला तेव्हा त्याच्यात आठ कॉलमी मथळा दिसला 'अत्रे–खांडेकर भाऊ भाऊ' खांडेकर खूप हसले व म्हणाले, 'हिंदी–चिनी भाई भाई' यासारखाच तो मथळा होता. आठ कॉलमी तो मथळा बघून मला मात्र लाजल्यासारखेच झाले.

'पण तरीही तुम्हांला त्यांनी फारसं दुखवलं नाही हे नक्की.'

'त्याचं बरचसं श्रेय माझ्या गरीब स्वभावालाच आहे. या बाबतीत मागे एका सभेत मी हितोपदेशातली गोष्ट सांगितली होती. रानामध्ये ससा आणि सिंह राहत असतात. ससा घाबरून आपल्या बिळात राहत असतो. सिंहाच्या भितीने तो बाहेर पडतही नाही. सिंह गुहेत राहतो आणि वनात संचार करतो. त्याला भक्ष म्हणून अनेक पशू मिळतात. त्याला सशाला मारण्याची जरूरच पडत नाही. माझे आणि त्यांचे संबंध जवळ जवळ तसेच होते. माझ्या स्वभावामुळे मी त्यांच्या वाटेला कधी गेलोच नाही.'

आम्ही दोघेही खूप हसलो. मी विचारले, 'कॉलेजात असताना तुमची ओळख झालेली असेल नाही ?'

'१९१४ साली मी फर्ग्युसनमध्ये गेलो. अत्रे १५ साली आले. मी कॉलेजला फार हुशार म्हणून गाजलो होतो. मॅट्रिकला मी सातवा होतो. त्यामुळे अत्रे मला ओळखत होते. पण मी त्यांना ओळखत नव्हतो. त्यांना कॉलेजमध्ये बघितल्याचे मला

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते

तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये

मुळीच आठवत नाही. फक्त कॉलेजच्या त्रैमासिकात त्याच दिवसांत त्यांची चांदणी नावाची कविता आली होती. ती वाचल्याचे मात्र मला स्मरते. ती मला आवडली होती. त्या कवितेवर बालकवींची छाप स्पष्ट दिसत होती.'

'ती कविताही केशवकुमार या टोपण नावानेच लिहिली होती काय ?'

'अहो तेव्हा टोपण नावे सर्वच घेत. ती एक फॅशनच होती. मीही टोपण नाव घेतले होते. मुलांनी टिंगल करू नये म्हणून कवीला टोपण नाव घ्यावेच लागे. टोपण नावाची ही परंपरा थेट अगदी अलीकडे म्हणजे कुसुमाग्रजांपर्यंत आहे. पण बोरकरांनी मात्र स्वतःच्या नावाने कविता लिहिण्यास प्रथम सुरुवात केली.'

'मागे एकदा या विषयावर वाद झाला होता. तुम्ही कॉलेजात असताना रुमाल बांधत होता असे अत्र्यांनी लिहिले होते.'

मी रुमाल कधीही बांधत नव्हतो. अत्र्यांची ती कल्पना घालवून टाकण्यासाठी मी पत्र लिहिले. पण खांडेकर आणि रुमाल त्यांच्या डोक्यात घट्ट बसले होते. शेवटी ते म्हणाले, 'तुम्ही नसलात तर तुमचे भाऊ रुमाल बांधत होते. पण खरे सांगायचे तर भाऊही रुमाल बांधत नव्हता.'

'कॉलेजात तुम्ही त्यांना बघितले नसेल पण गडकऱ्यांच्याकडे तुमच्या गाठी-भेटी नक्कीच होत असतील.'

'तसेही नाही. मी १९१४ जून ते १९१६ अखेर गडकऱ्यांकडे जात होतो. त्यांच्या आणि आमच्या अनेक गप्पा होत पण तिथे मला अत्रे कधीही दिसले नाहीत. आमच्याबरोबर तेव्हा कमतनूरकही असत. त्यांनाही अत्र्यांना पाहिल्याचे आठवत नाही, गडकऱ्यांच्या बोलण्यात अत्र्यांचे नाव कधीही एकले नाही.'

'आश्चर्य आहे. अत्रे तर म्हणत तुम्हांला त्यांनी कित्येक वेळा तिथे पाहिले आहे.'

'मला तरी आठवत नाही. एक सांगतो, अत्रे यांची कल्पनाशक्ती फार तरल होती. त्यामुळे त्यांना तसे वाटत असेल. कित्येक गोष्टीत आपण त्या वेळी हजर होतोच असे त्यांना वाटे. ते खोटे असे असे नाही, पण कल्पनेने ते तिथे असत.... बाबुरावांचा एक गुण मला फार आवडतो.'

'तो कोणता ?'

'दुसऱ्यांच्या गुणांविषयी मात्र त्यांना खरे खरे प्रेम असे. एखाद्या पतंगाने दीपज्योतीवर झडप घालावी त्याप्रमाणे ते गुणांकडे आकर्षले जात. फडक्यांच्या लेखनशैलीबद्दल त्यांना प्रथमपासून फार आदर वाटे. ते नेहमीच त्यांची फार स्तुती करीत.'

'पण पुढे मग बिनसायला कारण काय झाले ?'

'अत्रे यांची शेपटी फार नाजूक होती. कुणाचा थोडा जरी धक्का लागला तरी ते गय करीत नसत. श्लील-अश्लील वादावरून फडक्यांशी त्यांचे बिनसले, मग

त्यांनी त्यांची काही बाकी ठेवली नाही. विनायकांचेही तसेच. माझ्या मत्स्यगंधा चित्राच्या वेळी काही भांडण होऊन अत्रे कंपनीतून निघून गेले आणि मग विनायकांवर त्यांनी टीकेची फेर धरली. जीवनाची एवढी आसक्ती दुसऱ्या कोणातही नसेल. ती आसक्ती कधी कमी झालीच नाही. गंधर्वांची नाटके गाजण्याच्या अनेक कारणांपैकी त्यांच्या अत्तराचा वास पिटामध्ये दरवळे हेही आहे असे ते म्हणत. एका दृष्टीने जन्मभर ते Over-viatality ने ग्रस्त होते. ते कधीच दमले नाहीत. एक सांगतो. मला तर राहून राहून वाटते की अत्र्यांना अंथरूणावर खितपत पडावे लागले नाही हे त्यांचे फार मोठे भाग्य. तसे झाले असते तर मात्र त्यांना फार त्रास झाला असता. त्यांची सहनशक्ती फार कमी होती. खर तर आजारपण कोणाच्याच वाट्याला येऊ नये. पण कोणाला तरी ते भोगावे लागतं. मला ते लागलं. पण मी जात्याच शांत म्हणून ते सहन करू शकलो. अत्र्यांना मात्र ते फार जड गेलं असतं.'


'तुमच्यात आणि त्यांच्यात साम्य असे नाही. तुम्ही गांधीवादी आहात. गरीबांविषयीचा तुमचा कळवळा निराळा वाटतो.'

अत्र्यांनी दारिद्र्य बघितले होते. पण गरीबीचा माझ्यासारखा कळवळा त्यांच्यांत नसावा. प्रतिभेच्या जोरावर ते आपली पात्रे निर्माण करीत. माझे राजकीय वाचन तसे फारसे झाले नाही. पण मला गांधीवाद आणि समाजवाद यांच्याबद्दल प्रेम होते. अत्र्यांबद्दल तसे सांगता येणार नाही. मागे मानवेंद्रनाथ रॉय व सुभाषचंद्र बोस हे दोन्ही नेते बलवान असताना त्यांनी मला या दोघांच्यापैकी कोणाच्यामागे जावे हा प्रश्न केला होता.'

'अत्र्यांच्या नाटकाविषयी तुम्हाला काय वाटते ?'

'त्यांची विनोदबुद्धी फार प्रखर होती. ती इतर भावनांवर आक्रमण करी. त्यांची नाटके समुहमनाला आकर्षित करीत. एखादा सामाजिक विषय घेऊन तो चुटपुटीतपणाने मांडायचा आणि समाजात बघीतलेली तऱ्हेतऱ्हेची पात्रे नाटकात गुंफायची असे त्यांचे तंत्र होते. मला स्वत:ला केस हिस्टरी (Case history) वर आधारीत वाङमय आवडत नाही. 'मी मंत्री झालो' किंवा 'डॉ. लागू' अशी नाटके मला आवडत नाहीत. कलेच्या दृष्टीने ही नाटके लिहिली गेली नसती तर बरे झाले असते. 'तो मी नव्हेच'च्या प्रस्तावनेत प्रौढ कुमारीकेच्या प्रश्नाबद्दल त्यांनी लिहिले आहे. खरे तर हे नाटक शारदेसारखे व्हायला हवे होते. पण तिथे मुख्य विषय बाजूला राहून लखोबा लोखंडे हेच पात्र टाळ्या घेते. पण ते काहीही असले तरी अत्रे म्हणजे महापूर होते. लग्नाची बेडी सारखी त्यांची नाटके उत्तम आहेत. परंतु कवितेचा एक्का मात्र त्यांच्या हातात राहील. त्यांनी रविकिरण मंडळाचे विडंबन केले. तीन चतुर्थांश रविकिरण मंडळ आज विसरले गेले पण झेंडुची फुले मात्र अजून टवटवीत आहेत.'

'तुम्ही काल संध्याकाळच्या तुमच्या भाषणात म्हटले आहे अत्रे एक का



# व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
| --- | --- | --- |
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | अठरा रुपये |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २

अनेक प्रश्न पुढच्या पिढयांना पडेल '

'ते खरेच आहे. इतक्या विविध कर्तृत्वाचा मराठी साहित्यिक दुसरा नाही. त्यांनी लेखणीची मशिनगन व वाणीची स्टेनगन चालविली. ते स्वतःच एक कादंबरीचा विषय होत.'


'ते सर्व खर, परंतु अत्र्यांची मराठी भाषेच्या दृष्टीने मुख्य कामगिरी कोणती असं तुम्हाला वाटत ?"

'कवि, नाटककार, पत्रकार या दृष्टीने ते अजरामर आहेत. परंतु प्रसन्न शैली-मुळे त्यांचे यश चिरकालीन राहील. त्यांच्यावर केळकरांची व बालकवींची छाप होती. कल्पकता व विनोद या दोन्हींचे तिच्यात मिश्रण आहे. अशी 'क्लासिक' शैली आता लोपत चालली. माडखोलकरांची तशी आहे. ललित वाङ्मय सोडल्या-वर मराठ्यातील अग्रलेख लिहिताना त्यांनी त्याच शैलीचे ग्रामीण रूपांतर केले. आणि बहुजनसमाजात उत्तम वाचन करण्याची प्रेरणा निर्माण केली. फडके यांची शैली पांढरपेशा वर्गापर्यंतच सीमित आहे. परंतु अत्रे यांनी विष्णुशास्त्र्यां-पासून सुरुवात झालेल्या लेखनशैलीला ग्रामीण जनतेपर्यंत पोचविले.'

अजून मला खूप विचारायचे होते परंतु मी संकोच केला व बोलणे आवरते घेतले. खांडेकर मात्र पुढेही बराच वेळ मराठी साहित्यातील जुन्या काळाबद्दल बोलत होते. मराठी साहित्याचा गेल्या पन्नास-पाऊणशे वर्षांचा इतिहास त्यांनी सहज बोलता बोलता माझ्यापुढे उभा केला.'

मी त्यांचा निरोप घेतला आणि निघालो. बाहेर आलो व कोपऱ्यावर स्वस्थ उभा राहिलो. मनातली पोकळी भरून गेली होती. अत्र्यांबद्दल खांडेकर माझ्याशी बोलले होते यातच मी धन्य झालो होतो.

मी पुण्याचा रस्ता धरला. ■■



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यानी संगम प्रेस. प्रा. लि., १७ ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H-649




" कितीही दिवस का होईनात, पण शांततापूर्ण मार्गानंच चालू आहेत ना निदर्शनं ? मग त्यांना आताच माझ्याकडे घेऊन यायची एवढी काय घाई होती ? "